
जानेवारी २०२४/पाने ६८/किंमत ₹१०

# लोकराज्य



## संकल्पपूर्ती महाराष्ट्राची

### नवनिर्मिती सुराज्याची!

# ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना २०२३ चा

# महाराष्ट्र भूषण






महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा सन २०२३चा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना जाहीर झाला आहे. 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार हा राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. यासंदर्भातील घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि २५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अशोक सराफ यांनी नाटक आणि चित्रपटांच्या माध्यमातून केलेल्या कला क्षेत्रातील कामगिरीचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह विविध मान्यवरांनी या पुरस्काराबद्दल अभिनेते अशोक सराफ यांचे अभिनंदन केले आहे.

'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार हा राज्य शासनाकडून देण्यात येणारा सर्वात मोठा पुरस्कार आहे. आरोग्यसेवा, उद्योग, कला, क्रीडा, पत्रकारिता, लोकप्रशासन, विज्ञान आणि समाजसेवा या क्षेत्रांत केलेल्या विशेष योगदानासाठी हा पुरस्कार दिला जातो. या क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव देशात आणि जगभर नेणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यास सन १९९५ पासून सुरुवात झाली. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या नाट्य-चित्रपट क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. आपल्या विनोदी शैलीने त्यांनी अनेक चित्रपटातून रसिकांना खळखळून हसायला लावले. त्याचबरोबर संवेदनशीलतेने भूमिका साकारताना रसिकांना आपल्या अभिनयाने मंत्रमुग्ध केले.

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ हे मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी आणि दमदार अभिनेता म्हणून अवघ्या चित्रपटसृष्टीत परिचित आहेत. मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाने वेगळे अस्तित्व निर्माण केले. व्यावसायिक नाटकापासून त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर 'पांडू हवालदार', 'राम राम गंगाराम', 'अशी ही बनवाबनवी', 'धुमधडाका', 'नवरी मिळे नवऱ्याला', 'आत्मविश्वास', 'गंमत जंमत', 'आयत्या घरात घरोबा', 'एक उनाड दिवस', 'शुभमंगल सावधान', 'आई नंबर वन' अशा विविध चित्रपटांतून विविधरंगी भूमिका करून प्रेक्षकांच्या मनात स्वत:चे स्थान निर्माण केले. स्वत:च्या कामाचे क्षेत्र मर्यादित न ठेवता त्यांनी विनोदी, खलनायक; तसेच गंभीर पात्रेही पडद्यावर साकार केली आणि त्यातून वेगळी शैली निर्माण केली. त्यांच्या या कारकिर्दीचा गौरव राज्य शासनाने या पुरस्कारासाठी त्यांची निवड करून केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, डॉ. अनिल काकोडकर, वासुदेव कामत, डॉ. गो. ब. देगलूरकर, डॉ. शशिकला वंजारी, ॲड. उज्ज्वल निकम आणि समितीचे सदस्य सचिव बिभीषण चवरे यांचा समावेश होता.

### यांना मिळाले 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार

राज्य शासनाने प्रख्यात लेखक पु. ल. देशपांडे यांना पहिला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन त्यांच्या साहित्यसेवेतील योगदानाबद्दल गौरविले होते. त्यानंतर गानसम्राज्ञी लता मंगेशकर (संगीत), ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावसकर (क्रीडा), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर (विज्ञान), क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर (क्रीडा), पंडित भीमसेन जोशी (कला/संगीत), सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग व राणी बंग (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर (विज्ञान), उद्योगपती रतन टाटा (उद्योग), रा. कृ. पाटील (समाज प्रबोधन), कविवर्य मंगेश पाडगावकर (साहित्य), नानासाहेब धर्माधिकारी (समाज प्रबोधन), ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर (मराठी चित्रपट), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर (विज्ञान), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर (विज्ञान), शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (साहित्य), ज्येष्ठ गायिका आशा भोसले (संगीत) आणि निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी (समाज प्रबोधन) यांना राज्य शासनाने यापूर्वी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन गौरवले आहे.

## ६ लोकार्पणाचे महापर्व

महाराष्ट्र हे जगभरातील उद्योगक्षेत्रासाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. २०२४ च्या दुसऱ्याच आठवड्यात १२ जानेवारी रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अटल सेतूचे उद्घाटन करून मुंबईतील वाहतूक क्षेत्रातील नवा विक्रम देशाला अर्पण केला.

## १० विकसित भारत@२०४७

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळातील येणाऱ्या २५ वर्षांत तरुणांनी २०४७ पर्यंत सामर्थ्यवान व कौशल्याधारित होऊन विकसित भारत घडवण्याचा इतिहास रचावा, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांना केले.

## १६ 'अटल सेतू'

मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारे अंतर कमी करणारा आणि प्रवासाच्या वेळेत बचत करणारा 'अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू' चे लोकार्पण प्रधानमंत्री यांच्या हस्ते १२ जानेवारी २०२४ रोजी झाले.

## ३२ माझी शाळा, सुंदर शाळा

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबवण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## ३४ मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी रुग्णांसाठी वरदान!

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशीलतेमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीमध्ये अनेक विविध आजारांचा समावेश करण्यात आला आहे.

## ३८ रस्ता सुरक्षा, जीवन रक्षा!

अपघातांच्या वाढत्या प्रमाणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासन विविध प्रयत्न करत आहे. रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण बघता या काळात 'रस्ता सुरक्षा' ही काळाची गरज बनली आहे.

## ४० संविधान साक्षरतेचा जागर

भारतीय संविधानाची निर्मिती करताना भारतातील धर्म, जात, पंथ, भाषा, प्रांत, संस्कृती, रुढी-परंपरा, भौगोलिक वेगळेपण अशा अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ ठेवण्याचे काम भारतीय संविधान करत आहे.

## ४५ राष्ट्रीय मतदार दिवस

स्वतंत्र भारत देशात केंद्रीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. त्यामुळे तो दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

## ४७ युवक कल्याणार्थ योजना

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी युवकांना विविध क्षेत्रातील ओळख निर्माण करण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे. नव विज्ञान, माहिती, तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी जागतिक स्तरावरील प्रशिक्षण देण्याचा युवक कल्याण विभागाचा प्रयत्न आहे.

## ५८ कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन

२९ नोव्हेंबर २०२३ रोजी भौगोलिक उपदर्शन पत्रिका (जिओग्राफिकल इंडिकेशन्स जर्नल) मध्ये महाराष्ट्रातील नऊ उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या भौगोलिक मानांकनात लातूर जिल्ह्यातील पानचिंचोलीच्या पटडी चिंचेला, बोरसुरी येथील बोरसुरी तूर डाळीला आणि आशिव येथील कास्ती कोथिंबीरचा समावेश आहे.

## ६० पुस्तकांचा बगिचा

आजपर्यंत आपण वनस्पतींचा बगिचा बघितला असेल, फुलांचा बगिचा बघितला असेल, फळांची बाग बघितली असेलच; त्याप्रमाणे 'पुस्तकांचा बगिचा' ही राज्यातील पहिली नावीन्यपूर्ण संकल्पना एरंडोल नगरपरिषदेने सुरू केली आहे.


लोकार्पणाचे महापर्व ६
विकसित भारत@२०४७ १०
हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती... १३
'अटल सेतू' १६
नौदल दिन सोहळा सामर्थ्यशाली सागरी आरमार १८
औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्राला पसंती २२
पुरवणी मागण्या मंजूर २४
अनेक विषयांवर चर्चा २८
माझी शाळा, सुंदर शाळा ३२
मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी रुग्णांसाठी वरदान! ३४
करिअर मार्गदर्शनाची व्याप्ती ३६
रस्ता सुरक्षा, जीवन रक्षा! ३८
संविधान साक्षरतेचा जागर ४०
विविधतेत एकता ४३
राष्ट्रीय मतदार दिवस ४५
युवक कल्याणार्थ योजना ४७
समाजशिक्षिका सावित्रीबाई ४८
स्वामी विवेकानंद : व्यक्तिमत्त्व आणि प्रेरकत्व ५०
राजमाता जिजाऊ... ५२
महानायक सुभाषचंद्र बोस ५३
झाले बहु..होतील बहु..परि या सम हा..! ५५
'सत्याग्रही' महात्मा गांधी ५६
कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन ५८
पुस्तकांचा बगिचा ६०
कल्याणकारी निर्णय ६२

वर्ष ७५ वे | अंक २ | जानेवारी २०२४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# ‘रिंगाण’ कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार

नामवंत लेखक व कादंबरीकार कृष्णात खोत यांना ‘रिंगाण’ कादंबरीसाठी मराठी भाषेकरिता साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करण्यात आला. अकादमीचे सचिव के. श्रीनिवासराव यांनी साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा केली.

देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च संस्था म्हणून नावलौकिक असणाऱ्या साहित्य अकादमीने, नवी दिल्ली येथील कोपर्निकस मार्गस्थित साहित्य अकादमीच्या रवींद्र सभागृहात वर्ष २०२३ साठी साहित्य पुरस्कारांची घोषणा केली. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत देशातील २४ प्रादेशिक भाषांसाठी साहित्य अकादमी साहित्य पुरस्कारांची निवड व घोषणा करण्यात आली.

## कृष्णात खोत यांच्या लेखनकार्याविषयी...

मूळचे कोल्हापूर येथील कृष्णात खोत हे पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी येथील रहिवासी आहेत. पन्हाळा विद्यामंदिर येथे त्यांचे शिक्षण झाले आहे. सध्या ते कळे येथील कनिष्ठ महाविद्यालयात शिकवितात. कृष्णात खोत यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रदेशसमूहनिष्ठ कादंबरी लेखनाने ‘कादंबरीकार’ म्हणून स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. श्री. खोत यांनी मराठीत लक्षणीय ठराव्यात अशा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ‘गावठाण’ (२००५), ‘रौंदाळा’ (२००८), ‘झड-झिंबड’ (२०१२), ‘धूळमाती’ (२०१४), ‘रिंगाण’ (२०१८) या त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्या असून, या कादंबऱ्यांमधून बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. याशिवाय ‘नांगरल्याविन भुई’ हे त्यांनी लिहिलेले ललित व्यक्तिचित्रण प्रकाशित झाले आहे. गावसंस्कृती आणि बदलत्या खेड्यातील जीवनसंघर्ष त्यांच्या लिखाणाचा विषय आहे. त्यांना राज्य शासनासह अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत.

## ‘रिंगाण’ या कादंबरीविषयी...

‘रिंगाण’ या कादंबरीला मराठी भाषेकरिता साहित्य अकादमी हा पुरस्कार २०२३ साठी जाहीर झाला. प्रकल्पासाठी घरादारावर पाणी सोडून उठवलेल्या माणसांची परवड हा ‘रिंगाण’ कादंबरीचा एक धागा आहे. तो धागा पुढे नेत ही कादंबरी माणसांचे जग ओलांडून मुक्या जनावरांच्या भावविश्वातही घेऊन जाते. गाव सोडताना वांझ म्हणून मागे सोडून दिलेल्या म्हशींचे काय होते? माणसांच्या सहवासात वाढलेल्या जनावरांवर एकाएकी जंगलात राहण्याची वेळ येते, तेव्हा आलेल्या प्रसंगाशी ती जनावरे कशी जुळवून घेतात? जनावरांशी नाते तोडून नव्या गावाची वाट धरणाऱ्या देवाप्पाला पुन्हा त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी कशी झुंज द्यावी लागते, ती देता देता आतून तुटून तो कसा उद्ध्वस्त होत जातो, या विस्थापितांच्या दु:खांची तीव्रता या कादंबरीतून वाचकांपर्यंत पोहोचवली आहे. केवळ तेवढ्यापुरती ही कादंबरी मर्यादित राहत नाही, तर माणूस आणि पाळीव प्राणी यांच्यातील संबंधांचा एक अनोखा अनुबंध या कादंबरीतून अनुभवायला मिळतो.

## पारितोषिकाविषयी...

अभिराम भडकमकर, डॉ. संतोष खेडलेकर आणि अनुराधा पाटील या साहित्यिकांचा मराठी भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार निवडीच्या परीक्षक मंडळात समावेश होता. साहित्य अकादमी पुरस्काराचे स्वरूप ताम्रपत्र, शाल आणि एक लाख रुपये रोख रक्कम असे आहे. साहित्य अकादमी पुरस्काराचे वितरण १२ मार्च २०२४ रोजी कमानी ऑडिटोरियम येथील आयोजित कार्यक्रमात होणार असल्याची माहिती सचिव के. श्रीनिवासराव यांनी दिली.

# संकल्पपूर्ती

महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत आणि आघाडीचे राज्य आहे. अनेक क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. आज देशात पायाभूत सुविधांची सर्वाधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. देशाच्या आर्थिक वाटचालीत तिच्या या लौकिकाला साजेसे योगदान मिळाले पाहिजे, यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प दृष्टिपथात आहेत.

राज्यात अनेक पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरू आहेत. त्यातीलच नवी मुंबई-मुंबईला जोडणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू (अटल सेतू)चे लोकार्पण आणि सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी गावाच्या परिसरात ३६५ एकर जागेवर रे नगर गृहनिर्माण प्रकल्प राबवला जात आहे. यातील पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांचे वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू (अटल सेतू) हा देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी सेतू असून तो २२ किलोमीटरचा आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे, गोवा यांना जोडणाऱ्या या सेतूमुळे एमएमआर क्षेत्रातील वाहतुकीच्या पायाभूत सुविधा मजबूत झाल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील रे नगर गृहनिर्माण प्रकल्पात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ३० हजार घरकुले निर्माण केली जात आहेत. पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांचे वितरण करण्यात आल्याने अनेक वर्षांपासून स्वतःच्या हक्काचे घर असावे, हे स्वप्न पाहिलेल्या हजारो कामगारांच्या स्वप्नांची पूर्ती झाली आहे.

नाशिक येथे आयोजित २७व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाची विकसित भारत@२०४७ अशी मुख्य संकल्पना होती. ‘सक्षम युवा, समर्थ भारत’ असे घोषवाक्य असलेल्या या महोत्सवाचे उद्‌घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. २०४७ पर्यंतचा विकसित भारत घडवण्यासाठी युवकांनी ध्येयप्राप्तीचा ध्यास घ्यावा, स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षात भारत हा विकसित, वैभवशाली आणि समृद्ध घडवण्यासाठी युवकांनी आपले योगदान द्यावे, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांना केले आहे.

दावोस येथील ५४व्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रामध्ये परदेशी गुंतवणूक करण्याचा ओढा मोठ्या प्रमाणात दिसून आला. जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खार उद्योग, डेटा सेंटर, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांमध्ये यावर्षी ३ लाख ५३ हजार ६७५ कोटी रुपयांपेक्षा जास्त परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले आहेत. याशिवाय जवळपास एक ते दीड लाख कोटी रुपयांच्या आणखी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी होण्यासाठी परदेशी कंपन्यांनी स्वारस्य दाखवले आहे. या करारांमुळे राज्यात २ लाख इतक्या मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होणार आहे. त्यामुळे राज्यावर जागतिक उद्योजकांचा आणि गुंतवणुकदारांचा विश्वास वाढला आहे. राज्यात अनेक प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन होत आहे. या प्रकल्पांच्या पूर्णत्वाने राज्य शासनाने केलेले संकल्प पूर्ण होताना दिसत आहेत.

यंदाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये राज्याच्या अनेक प्रश्नांवर चर्चा व उपाययोजना करण्यात आल्या. दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूर, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध घोषणा करण्यात आल्या. विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तब्बल ४४ हजार २७८ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली. धान उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्योग, ऊर्जा, रस्ते विकास, पर्यटन, जलसंधारण, वस्त्रोद्योग अशा सर्वच क्षेत्रांत विकासाची ग्वाही देण्यात आली. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर प्रदीर्घ चर्चा करण्यात आली.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ भोसले, नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आणि महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष लेखांसह मंत्रिमंडळातील निर्णय यांचाही समावेश या अंकात करण्यात आला आहे. हा अंक आपणास नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**महाराष्ट्र हे जगभरातील उद्योगक्षेत्रासाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. पायाभूत सोयीसुविधा, रोजगार निर्मिती, कुशल मनुष्यबळ यामुळे महाराष्ट्र राज्याला पसंती दिली जात आहे. २०२४ च्या दुसऱ्याच आठवड्यात १२ जानेवारी रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अटल सेतूचे उद्घाटन करून मुंबईतील वाहतूक क्षेत्रातील नवा विक्रम देशाला अर्पण केला.**

# लोकार्पणाचे महापर्व

**डॉ. गणेश मुळे**

मुंबई महानगर परिसराच्या आसपासच्या इतर काही भागातही शहरी विकास, आर्थिक वाढ, व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्य सरकार काम करत आहे. राज्यातील खेडोपाड्यातील पायाभूत सुविधांचे जाळे भक्कम करण्यासाठी ठोस आणि सर्वंकष प्रयत्न केले जात आहेत.

## अटल सेतू

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटलसेतू हा मुंबई आणि रायगड, नवी मुंबई या मोठ्या शहरांना जोडणारा समुद्रावरील भारतातील सर्वात लांब सागरी सेतू आहे. शिवडी, दक्षिण मुंबई येथे सुरू होतो आणि नवी मुंबई नाव्हा शेवा बंदर जवळील चिरले येथे जोडला जातो. या पुलाला मुंबईत शिवडी येथे तर नवी मुंबईतील चिरले राज्य महामार्ग - ५४, राष्ट्रीय महामार्ग - ३४८ व शिवाजीनगर येथे इंटरचेंजेस आहेत. ज्यामुळे नवी मुंबई, पुणे गोवा व दक्षिण भारत आणि मुंबई या शहरांमध्ये चांगली कनेक्टिव्हिटी स्थापन झाली. या प्रकल्पामध्ये १.२ लाख टन स्ट्रक्चरल स्टिल वापरले गेले आहे. साधारण चार अखंड हावडा पूल बांधता येतील इतके स्टिल वापरले गेले आहे. या भव्य प्रकल्पामध्ये ८ लाख ३० हजार क्युबिक मीटर काँक्रिट म्हणजेच स्टॅच्यु ऑफ युनिटी मध्ये वापरण्यात आलेल्यापेक्षा ६ पट अधिक काँक्रिट आणि उत्तुंग आयफेल टॉवरच्या तुलनेत १७ पट अधिक स्टिल वापरून उभारला गेला आहे.

जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून ६५ मी. ते १८० मी. लांबीचे आणि सुमारे २८०० मेट्रिक टन एवढ्या वजनाचे ७० लाँग स्पॅनचे

### देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचे मोठे योगदान

विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. उद्योगाबरोबरच, प्रकल्पांच्या बांधकामातही महाराष्ट्र हे पायाभूत आघाडीचे राज्य आहे. शिवडी - न्हावा शेवा अटल सेतू, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) या सहा मार्गिकांच्या समुद्रावरील भारतातील सर्वात लांब सागरी सेतूला भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात आले आहे. हा पूल अटलजींच्या नावाप्रमाणेच मजबूत आणि अटल आहे. अटलजींचे नाव आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन ही या पुलाच्या मजबुतीची हमी आहे. आज देशातील पायाभूत सुविधांची सर्वाधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. राज्यात सुमारे ८ लाख ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. गुंतवणूकदार राज्यात गुंतवणूक करण्यासाठी स्पर्धा करत आहेत. महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील अडथळेही दूर झाले. या मार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली. जगातील अनेक देश आर्थिक आघाडीवर अनेक समस्यांशी लढत आहेत, तर आपला भारत मजबूत आणि संतुलित नेतृत्वामुळे आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**





ऑर्थोट्रॉपिक स्टिल डेक (ओ.एस.डी) ची उभारणी करण्यात आली आहे. ओ.एस.डी ब्रिज गर्डरची अंमलबलावणी पूर्ण करणारा अटलसेतू हा भारतातला प्रथम प्रकल्प आहे. मनुष्यबळ आणि साधनसामग्री मिळून या विराट प्रकल्पासाठी तब्बल २० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. प्रकल्प उत्तमरीत्या उभारण्यासाठी १५,००० कामगार आणि १,५०० हून अधिक अभियंत्यांचा अमूल्य हातभार लागला आहे. हा अभियांत्रिकी अविष्कार १०० कि.मी. प्रतितास वेगाने प्रवास करण्याऱ्या वाहनांसाठी तयार केला असून या रस्त्याची दररोज ७०,००० वाहने वाहून नेण्याची क्षमता आहे. हा सागरी सेतू एका बाजूला मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि दुसऱ्या बाजूला जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट असलेल्या मुंबई खाडीमध्ये स्थित असून सागरी सेतूचे घटक पुढील १०० वर्षांपर्यंत टिकून राहण्यासाठी गंजरोधक सामग्रीपासून बनलेले आहेत. भूकंप, चक्रिवादळ, वाऱ्याचा दाब आणि भरती-ओहोटीच्या प्रभावामध्ये टिकून राहण्यासाठी ही संरचना तयार करण्यात आली आहे. अद्‌भूत अभियांत्रिकीचा प्रभावी नमुना असलेल्या या प्रकल्पामध्ये अनेक प्रगत तंत्रज्ञानाचा जसे की, (बुद्धिमान) वाहतूक व्यवस्थापन प्रणालीचा समावेश आहे. ज्यामुळे विना अडथळा व प्रगत प्रवासाचा अनुभव सुनिश्चित होतो.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अनुकूल असलेल्या या पुलाच्या बांधकामामुळे इंधनाचा वापर व हरितगृह वायू उत्सर्जन कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रवाशांच्या मुंबई ते नवी मुंबई परिसरामधील प्रवास वेळेची बचत होणार आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) या प्रकल्पामुळे तिसरी मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक असा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. एमटीएचएलमुळे अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या अपेक्षित चालनेमुळे ह्या प्रकल्पाला 'गेम चेंजर' असेही संबोधले आहे. या प्रकल्पामुळे नव्याने रोजगारनिर्मिती होईल. ज्यामुळे मुंबई महानगर प्रदेशचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास शक्य होणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत आयोजित महिला मेळाव्याला संबोधित केले. या ठिकाणी अटल सेतूसोबतच विविध अन्य प्रकल्पांचे भूमिपूजन, लोकार्पण आणि उद्‌घाटन करण्यात आले. ते म्हणाले, आजचा दिवस केवळ मुंबई आणि महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर विकसित भारताच्या संकल्पाचा ऐतिहासिक पुरावा आहे. भारतातील सर्वात लांब असलेल्या अटल सागरी सेतूचे लोकार्पण हा भारताचा विकासाप्रति असलेल्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. २०१४ च्या निवडणुकीआधी रायगड किल्ल्यावर गेलो होतो. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन काही संकल्प केले होते. आज ते संकल्प पूर्ण

## चार वर्षांत मेट्रो आणि रस्त्यांचे नेटवर्क

१९७३ मध्ये या सागरी सेतूची संकल्पना मांडली होती. मात्र ४० वर्षांत हे काम झाले नाही, ते आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे शक्य झाले आहे. या अटल सेतूसाठी प्रधानमंत्री यांनी थेट एम.एम.आर.डी.ए.ला कर्ज उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. यामुळे रायगडमध्ये नवा इकॉनॉमिक हब तयार होणार आहे. ६५ टक्के डेटा सेंटर तयार झाले आहेत. या सेतूने या विभागाला कनेक्टिव्हिटी दिली आहे. मुंबईत कुठूनही ५९ मिनिटांत पोहोचता आले पाहिजे. मेट्रो आणि रस्त्यांचे नेटवर्क त्या पद्धतीने तयार होत आहे. येत्या तीन ते चार वर्षांत असे नेटवर्क तयार होईल. यापुढे रायगड, नवी मुंबई हे नवे इंडस्ट्रियल हब तयार होणार आहेत.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

## सर्वसामान्यांच्या हितासाठी...

सर्वसामान्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना, प्रकल्प राबवण्यात येत आहेत. रेल्वेचे जाळे विस्तारल्यामुळेही नागरिकांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळत आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना अंमलबजावणीवर विशेष लक्ष दिले आहे. उज्ज्वला योजना ही महिलांसाठी अतिशय उपयुक्त ठरली आहे. यामुळे महिलांचे जीवन सुखकर झाले. देशाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी प्रधानमंत्री यांच्या नेतृत्वात कटिबद्ध आहोत. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याचे उद्दिष्ट आम्ही पूर्ण करणार आहोत.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**



होताना दिसत आहेत. अटल सेतू त्याचाच एक भाग आहे. अटल सेतू बनवण्यासाठी जपान सरकारने योगदान दिले. अटल सेतू ही विकसित भारताची एक झलक आहे. अटल सेतू प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प माजी प्रधानमंत्री शिंझो आबे यांच्यासमवेत केला होता. देशासाठी गेल्या १० वर्षांत पायाभूत सुविधांसाठी ४४ लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी महाराष्ट्रात केंद्र सरकारने सुमारे ८ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण केले. स्वच्छता, शिक्षण, वैद्यकीय मदत आणि रोजगाराशी संबंधित योजनांचा महिलांना सर्वाधिक फायदा झाला आहे. देशात पीएम जनऔषधी केंद्रे, स्वनिधी, पीएम आवास आणि बचतगटांना मदत मिळून २ लाख 'लखपती दीदी' तयार होत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या योजनाही याच दिशेने कार्यरत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा विकास गतीने सुरू आहे, शासन याच निष्ठेने महाराष्ट्राच्या विकासासाठी कार्यरत राहील.

## प्रकल्पांची माहिती

### खारकोपर–उरण उपनगरीय मार्गाचे उद्घाटन (१४.६० कि.मी.) (बेलापूर–सीवूड दरवे–उरण प्रकल्प)

**ठळक वैशिष्ट्ये** : खर्च १,४३३ कोटी रुपये, लांबी १४.६० कि.मी., नवीन स्थानके ५, महत्त्वाचा पूल १, प्रमुख पूल २, छोटे पूल ३९, रोड ओव्हर ब्रिज ३, रोड अंडर ब्रिज ३.

**फायदे** : मुंबई आणि नवी मुंबई भागातून जेएनपीटी बंदरापर्यंत वाहतूक सुलभ, खारकोपर ते उरणपर्यंत उपनगरीय रेल्वे सेवेचा विस्तार केल्यास उरण परिसराची नवी मुंबई आणि मुंबईशी कनेक्टिव्हिटी मिळेल. उपनगरीय रेल्वे सेवा सुरू केल्याने विद्यार्थी, व्यापारी आणि दैनंदिन प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. अलिबाग हॉलिडे डेस्टिनेशनला चांगली कनेक्टिव्हिटी मिळाल्याने पर्यटनाला चालना मिळणार आहे.

### दिघा गाव रेल्वे स्थानकाचे उद्घाटन (एमयूटीपी-२ योजनेंतर्गत ऐरोली-कळवा एलिव्हेटेड कॉरिडॉरचा भाग)

**वैशिष्ट्ये** : **किंमत** : ९० कोटी रुपये (अंदाजे), **स्थान** : ठाणे ते ऐरोली उपनगरीय स्थानकादरम्यान, ट्रान्स हार्बर मार्गावर, **प्लॅटफॉर्म** : २ आयलंड प्लॅटफॉर्म.

**फायदे** : ठाणे आणि ऐरोलीपासून जवळ - (ठाण्यापासून ३.२ कि.मी. आणि ऐरोलीपासून २.६ कि.मी.), प्रवासी सुविधांमध्ये ६ एस्केलेटर, २ लिफ्ट, एक दिव्यांग अनुकूल बुकिंग काउंटरसह तिकीट बुकिंग कार्यालयांचा समावेश आहे. स्थानकात आसन व्यवस्था, पार्किंग सुविधा, टॉयलेट ब्लॉक, वॉटर फाऊंटन, साइनेज बोर्ड आणि विस्तृत परिसंचरण क्षेत्र आहे. याचा आयटी क्षेत्रातील कर्मचारी, स्थानिक लोक आणि विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.

### भारतरत्नम नेस्ट वन भवन

पंतप्रधान विशेष आर्थिक क्षेत्र-मेटलसांताक्रूझ इलेक्ट्रॉनिक निर्यात प्रक्रिया विभाग - येथे असलेल्या, थ्री-डी प्रिंटिंग मशिनसह जगातील सर्वोत्तम उपलब्ध मशिन्ससह भारतात सुरू झालेल्या पहिल्या रत्ने आणि आभूषणे क्षेत्राच्या 'भारतरत्न' या विशाल सर्वसाधारण सुविधा केंद्र (मेगा कॉमन फॅसिलिटेशन सेंटर) यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसह या क्षेत्रातील कामगारांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी विशेष केंद्र सुरू आहे. हे विशाल केंद्र रत्न आणि दागिन्यांच्या व्यापारात निर्यात क्षेत्राचा कायापालट करेल आणि देशांतर्गत उत्पादनालाही मदत करेल. सिप्झ विशेष आर्थिक क्षेत्र येथील नवीन उपक्रम आणि सेवा केंद्र याचेही उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

### सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (टप्पा–१)

४०३ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सूर्यनगर, मौजे वेती येथे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाची योजना पश्चिम उप-प्रदेशातील मिरा-भाईंदर व वसई-विरार शहर महानगरपालिका; तसेच याच परिसरातील ४४ गावांच्या पाणीपुरवठ्यासाठी करण्यात आलेली आहे. सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या आराखड्यानुसार सूर्या धरणाजवळील कवडास बंधाऱ्यातून उचलण्यात येणारे पाणी सूर्यानगर, जि. पालघर येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करण्यात येते. या प्रचंड उपक्रम प्रणालीकरिता कवडास येथे पाणी साठवण्याकरिता लागणारी बांधकाम रचना आणि पंपिंग स्टेशनचा समावेश करण्यात आला आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पाची लांबी - ७९.०० कि.मी. टप्पा-१ मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेस व मार्गस्थ १७ गावे यांना १८५ द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पामुळे १४ लाख लोकांच्या पाणीपुरवठ्याच्या मागणीचा प्रश्न मार्गी लागला आहे.

### नवी मुंबई मेट्रो लाईन – १

सिडको महामंडळ नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, नवी मुंबई येथे राबवत आहे. या प्रकल्पाचे संरेखन हे सिबीडी बेलापूर-खारघर-पेंधर-तळोजे एम.आय.डी.सी.-कळंबोली-खांदेश्वर-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अशा चार टप्प्यांमध्ये एकूण २६.२६ कि.मी. लांबीचे आहे. टप्पा क्र. १, नवी मुंबई मेट्रो लाईन - १ ही सिबीडी बेलापूर ते पेंधरपर्यंत ११.१ कि.मी. लांबीची असून त्यात एकूण ११

स्थानकांचा समावेश आहे.

### आर्थिक आणि सामाजिक प्रभाव

नवी मुंबई मेट्रो लाईन - १ शहराच्या मुख्य भागातून इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्क, सेंट्रल पार्क, विविध शैक्षणिक संस्था, तळोजा औद्योगिक क्षेत्र आणि सिडकोचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना यांना जोडते. त्यामुळे एक जलद, आरामदायी, मल्टिमॉडेल कनेक्टिव्हिटीसह पर्यावरणपूरक पर्यायी वाहतूक व्यवस्था नागरिकांसाठी उपलब्ध झाली आहे.

### भुयारी मार्ग

भुयारी मार्ग मुंबई शहरातील पूर्व मुक्त मार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह येथील सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान असणार आहे. या भुयारी मार्गाची लांबी ९.२ किलोमीटर, बोगद्याची लांबी ६.२ किलोमीटर असून त्याचा व्यास ११ मि. आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ८,७४२ कोटी आहे. या प्रकल्पाकरिता भुयारीकरणाचे काम ४५ मि. जमिनीखाली करण्यात येणार आहे. हा भुयारी प्रकल्प मेट्रो लाईन; तसेच मध्य, पश्चिम व हार्बर रेल्वे मार्गांच्या खालून प्रस्तावित आहे. या प्रस्तावित प्रकल्पाच्या पूर्णत्वानंतर सदर रस्ता हा दक्षिण मुंबईला पूर्व - पश्चिम कनेक्टिव्हिटीसह जोडला जाईल. या प्रकल्पामुळे पूर्व मुक्तमार्ग ते प्रस्तावित कोस्टल रोड व मरिन ड्राईव्ह इतर प्रकल्प जसे शिवडी -वरळी एलेवेटेड जोड रस्ता, अटल सेतू पूर्वमुक्ती मार्ग, बांद्रा - वरळी सी लिंक यांना जोडण्यास उपयुक्त ठरेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची कोंडी फुटणार असून सुमारे १५ ते २० मिनिटांची बचत व इंधनाचीदेखील बचत होणार आहे. पर्यायाने ध्वनी प्रदूर्षण कमी करण्यास व हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प भारतातील पहिला असून मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल आणण्यास कारणीभूत ठरेल. ज्यामुळे मुंबईच्या जनतेचे आयुष्य सुकर होणार आहे.

### मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

कार्यक्रमादरम्यान 'पंतप्रधान नमो महिला सशक्तीकरण' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाचा उद्देश महाराष्ट्र राज्यातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करणे हा आहे. केंद्र, राज्य आणि सरकारच्या महिला विकास कार्यक्रमांचे एकत्रीकरण आणि परिपूर्णता यासाठी या अभियानाद्वारे प्रयत्न केले जाणार आहेत.

### नारी शक्ती दूत ॲप

'नारी शक्ती दूत ॲप' हे एक क्रांतिकारी ॲप्लिकेशन आहे. जे गरजू महिलांना ओळखण्यासाठी, सक्षम करण्यासाठी आणि त्यांना मदतीसाठी उपयोगी ठरणार आहे. तसेच त्यांना विविध सरकारी योजनांचे लाभ मिळतील, याची खात्री करण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे** - कल्याणकारी योजनांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्याच्या उद्देशाने नारी शक्ती दूत ॲप विकसित करण्यात आले आहे. हे ॲप सरकार, नागरिक आणि लाभार्थी यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करते. सरकारी कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी हे ॲप उपयोगी ठरणार आहे. नारी शक्ती दूत ॲप हे ॲप प्ले-स्टोरवरही उपलब्ध आहे.



### ध्वजांकित

### प्रत्यक्षदर्शी महिलांच्या प्रतिक्रिया

भडगाव, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या वैशाली दीपक जगताप म्हणाल्या की, आम्ही ग्रामीण भागात राहत असलो म्हणून काय झालं, आम्हालाबी आमच्या संसारात हातभार लावायचा हाय. ग्रामीण भागात महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणी ओळखून सरकार आमच्या पाठीशी खंबीर उभं हाय, म्हणूनच आम्हाला सरकारकडून आर्थिक मदत मिळाली. त्यातून आम्ही बचतगट स्थापन केलाय. या बचतगटाच्या माध्यमातून गावातच वॉटर फिल्टर, दूध संकलन केंद्र चालू केले आहे. मायबाप सरकार खऱ्या अर्थाने आमचा आधार बनला आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातून आलेल्या अर्चना चंद्रकांत वालम यांना दोन जुळ्या मुली असून शासनाच्या सुकन्या योजनेचा लाभ मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले, तर उमेद अभियानांतर्गत बँक कर्ज मिळाल्याचे नागमठाण ता. वैजापूर येथील विजया चांगदेव घोडके यांनी सांगितले. स्टार्टअप योजनेंतर्गत खेळते भांडवल मिळाले. त्यातून त्यांनी कापड व्यवसाय सुरू करून आपल्या कुटुंबाला हातभार लावीत असल्याचे सांगितले. १५ गावे मिळून त्यांनी एक ग्रामसंघ स्थापन केला आहे, तर प्रभातसंघअंतर्गत शेतकरी कंपनी स्थापन केली आहे. मशीनद्वारे स्वच्छ करून विविध डाळी, धान्य, कडधान्य ग्राहकांना माफक दरात उपलब्ध करून देतात.

गणेशकृपा या बचतगटाच्या माध्यमातून शोभा धनाजी म्हात्रे यांनी पापड लघुउद्योग सुरू करून २५ ते ३० महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथून आलेल्या वर्षा केतकावळे आणि सायली अक्षर पांघारे यांनादेखील शासनाच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध होऊन कुक्कुटपालन व्यवसायात त्या आत्मविश्वासाने उतरल्या आहेत. मजबूत आणि पायाभूत सुविधांमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीबाबत राज्याचे नाव सर्वत्र आदराने घेतले जाईल.

उपसंचालक (माहिती) कोकण विभाग, नवी मुंबई.



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळातील येणाऱ्या २५ वर्षांत तरुणांनी २०४७ पर्यंत सामर्थ्यवान व कौशल्याधारित होऊन विकसित भारत घडवण्याचा इतिहास रचावा, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांना केले. यासाठी निमित्त होते नाशिक येथे १२ जोनवारी २०२४ रोजी संपन्न झालेल्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनाचे.

# विकसित भारत @ २०४७

**विलास बोडके**

देशभरातील युवकांना विविध राज्यांची माहिती व्हावी, त्यांच्यात आचार-विचारांचे आदान-प्रदान व्हावे, एकमेकांच्या संस्कृतीची ओळख होऊन बलशाली भारतासाठी युवकांचे योगदान मिळावे, म्हणून केंद्रीय युवक कल्याण विभागाने सन १९८४ पासून युवक कल्याणाचे कार्य सुरू केले. सन १९९५ पासून राष्ट्रीय युवा महोत्सवाला सुरुवात केली. नाशिक येथे यंदा झालेला २७वा राष्ट्रीय युवा महोत्सव होता.

नाशिक येथे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवाची 'विकसित भारत@२०४७' अशी मुख्य संकल्पना होती, तर 'सक्षम युवा- समर्थ भारत' असे घोषवाक्य होते.



महाराष्ट्राच्या भीमाशंकर अभयारण्य, महाबळेश्वर, आंबा घाटात आढळून येणारा शेकरू या प्राण्याची शुभंकर म्हणून निवड करण्यात आली होती. या महोत्सवानिमित्त नाशिक येथील महायुवाग्राम हनुमाननगर, महात्मा फुले कलादालन, महाकवी कालिदास कला मंदिर, उदोजी महाराज वसतिगृह, रावसाहेब थोरात सभागृहात लोकनृत्य, लोकगीत, कथाकथन, छायाचित्र, संकल्पनेवर आधारित वक्तृत्व स्पर्धेसह उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आले.

युवकांचे प्रेरणास्थान असणारे स्वामी विवेकानंद यांच्या १६१व्या जयंतीच्या औचित्याने मंत्रभूमी ते यंत्रभूमी म्हणून सर्वत्र ओळख असलेल्या नाशिक जिल्ह्याला यावर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे यजमानपद भूषवण्याचा मान मिळाला. यातूनच युवा पिढीच्या सामर्थ्यावर देशाला आर्थिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहून ते सत्यात उतरवण्यासाठी प्रत्येकाला आत्मनिर्भर बनवण्याचा उद्देश ठेवून काम करणारे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले.

१२ ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या त्र्यंबकेश्वरच्या सान्निध्यात वसलेल्या नाशिक नगरीला 'राष्ट्रीय युवा महोत्सव २०२४' आयोजनाचा मान मिळाला. नाशिक येथे १२ ते १६ जानेवारी २०२४ या

कालावधीत विविध उपक्रम पार पडले. या महोत्सवासाठी देशभरातील विविध २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांतून साडेसात हजारांवर युवक-युवती आणि पदाधिकारी आले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय युवक कल्याण व क्रीडामंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री निसिथ प्रमाणिक, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास व पर्यटनमंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. सुभाष भामरे, हेमंत गोडसे, माजीमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी अर्थात १२ जानेवारी रोजी युवा महोत्सवाचे शानदार उद्घाटन सोहळा पार पडला.

## मराठीतून संवाद

१२ जानेवारी म्हणजे राजमाता जिजाऊ यांचीदेखील जयंती. राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनानिमित्त प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्यासह मान्यवरांनी राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी राजमाता जिजाऊ यांना वंदन करताना मराठीतून संवाद साधत म्हणाले, 'भारतीय नारी शक्तीचे प्रतीक म्हणून राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वंदन करण्यासाठी महाराष्ट्राच्या वीरभूमीत येण्याची संधी मिळणे, हा माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे. राजमाता जिजाऊ यांना कोटी कोटी वंदन. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्राची भूमी ही पुण्य, वीर तपोभूमी आहे. याच भूमीत राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा महानायक घडवला.'

## तरुणांना इतिहास घडवण्याची संधी

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन करत देशाचा सर्वांगीण विकास आणि सन २०४७ पर्यंतचा विकसित भारत घडवण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, 'आजचा दिवस भारताच्या युवाशक्तीचा उत्सव साजरा करत आहे. हा दिवस त्या महापुरुषाला समर्पित आहे ज्याने वसाहतवादाच्या काळात भारताला नव्या जोमाने भरभरून दिले. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त नाशिकमध्ये तुम्हा सर्वांमध्ये असणे हा माझा बहुमान आहे. आपल्या देशातील ऋषी, विद्वान, संतांपासून ते सर्वसामान्यांपर्यंत सर्वांनी युवाशक्तीचे महत्त्व ओळखले होते. श्री अरबिंदो यांनी तरुणांना देशाच्या विकासासाठी स्वतंत्र विचारांनी पाऊल टाकण्यास सांगितले होते, तर स्वामी विवेकानंद यांनीही भारताच्या आकांक्षा, तरुणांचे चारित्र्य, वचनबद्धता आणि बौद्धिकतेवर अवलंबून असल्याचे नमूद आहे. त्यांचे विचार, प्रेरणा भारतातील तरुणांना सामर्थ्यशाली करण्यास मदत करतील. भारतीय तरुणांच्या सामर्थ्यामुळे भारत देश जागतिक स्तरावर पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये आहे. भारतीय तरुणांनी देशाला जागतिक पातळीवर पहिल्या तीन स्टार्टअप इकोसिस्टिमध्ये आणले आहे. एवढेच नव्हे, तर भारत विविध नवकल्पनांचा साक्षीदार असून विक्रमी संख्येने पेटंट दाखल करत आहे. तसेच जागतिक स्तरावर एक महत्त्वपूर्ण उत्पादन केंद्र म्हणून (मॅन्युफॅक्चरिंग हब) उदयास येत असून हे सर्व भारतीय तरुणांच्या क्षमता आणि पराक्रमामुळे शक्य झाले आहे,' असेही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी यावेळी सांगितले.

भारतासाठी २०२२ ते २०४७ हा कालावधी अमृतकाळ आहे. या कालावधीत तरुणांना इतिहास घडवण्याची संधी आहे.







या कालावधीत तरुणांनी अतुलनीय कार्य केले, तर त्यांचे नाव देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवले जाईल. अमृत काळात देशाचा विकास घडवण्याची जबाबदारी आजच्या युवक-युवतींवर आहे आणि ते हे साध्य करू शकतील, त्यासाठी 'मेरा युवा भारत'चे व्यासपीठ उपयुक्त ठरेल, असा सार्थ विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी व्यक्त केला आहे.

आपला भारत देश लोकशाहीची जननी, गंगोत्री आहे. तरुणांनी विविध स्पर्धा, उपक्रमांमध्ये सहभागी होतानाच लोकशाही प्रक्रियेत सहभागी व्हावे. लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी तरुणांनी मतदारयादीत नाव नोंदवणे आवश्यक आहे. नाव नोंदणीबरोबरच तरुणांनी प्रत्यक्ष मतदानप्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी यानिमित्ताने केले.

## युवा महोत्सव तरुणांसाठी प्रेरणास्रोत

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनीही युवा महोत्सवात सहभागी तरुणांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, 'क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियातर्फे देशातील पाच शहरे विकसित केली जात आहेत. त्यात नाशिक शहराचा समावेश आहे. त्या माध्यमातून स्वच्छता, शिक्षण आणि कौशल्य विकासावर भर देण्यात येत आहे. अशा या भूमीत स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी राष्ट्रीय क्रीडा महोत्सवानिमित्त देशभरातील युवक शक्ती एकत्र आली आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. स्वामी विवेकानंद यांचे जीवन तरुणांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे.

या क्रीडा महोत्सवाचे बोधचिन्ह असलेला शेकरू गतिशीलता, विविधतेचे आकर्षण असणारा आणि पर्यावरणाप्रति सजग असलेला प्राणी आहे. त्यामुळे या बोधचिन्हातून तरुणांना मैत्री, सामजिक एकतेचा संदेश देतो. हा संदेश देशभरातील तरुण नाशिकमधील युवा महोत्सवातून आपापले राज्य, शहर आणि गावात घेऊन जातील. तसेच महाराष्ट्राला कलेचा समृद्ध वारसा लाभला आहे. या कलेचा परिचय महोत्सवाच्या माध्यमातून येथे आलेल्या तरुणांना होईल,' असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला. 'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नव्या भारताची जडण घडण होत आहे. त्यासाठी राष्ट्रीय युवा महोत्सव तरुणांसाठी प्रेरणास्रोत ठरेल. याच महोत्सवातून उद्याचे सुपर स्टार घडतील,' असे सांगत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महोत्सवासाठी आलेल्या तरुणांना शुभेच्छा दिल्या.

आजचे युवक देशाची उद्याची संपत्ती आहे. युवकांच्या सक्रिय सहभागामुळे सन २०४७ पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत घडवतील, असा मला विश्वास आहे. राज्यातील तरुणांच्या सबलीकरणासाठी आणि त्यांचे कौशल्य विकसित करून त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत अधिकाधिक तरुणींनी सहभागी होण्यासाठी त्यांना भरती पूर्व प्रशिक्षणाची सुविधा याच नाशिक शहरात उपलब्ध करून दिली आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सर्वच क्षेत्रात यशस्वी होत असून क्रीडा, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारताकडे वाटचाल सुरू आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने प्रथमच शंभरावर पदकांची कमाई केली आहे. भारताला २०४७ पर्यंत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विकसित राष्ट्र आणि वैभवशाली, समृद्ध भारत घडवण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी युवकांनी सहकार्याचा संकल्प सोडावा,' असे आवाहन केंद्रीय क्रीडा व युवक कल्याणमंत्री अनुराग ठाकूर यांनी युवा महोत्सवात केले.

जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.

**सोलापूर शहरापासून साधारणत: १३ किलोमीटर अंतरावर दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी गावाच्या परिसरात ३६५ एकर जागेवर रे नगर गृहनिर्माण प्रकल्प राबवला जात आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ३० हजार घरकुले निर्माण केली जात आहेत. पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांची सर्व कामे; तसेच त्याअंतर्गत रस्ते इतर पायाभूत सुविधा आदी आनुषंगिक कामे पूर्ण झाल्यानंतर १९ जानेवारी २०२४ रोजी पहिल्या टप्प्यातील घरकुलांचे वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले व अनेक वर्षांपासून स्वतःच्या हक्काचे घर असावे, हे स्वप्न पाहिलेल्या हजारो कामगारांच्या स्वप्नांची पूर्ती झाली.**

# हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती...

**सुनील सोनटक्के**

केंद्र शासन गोरगरिबांसाठी अनेक कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे प्रधानमंत्री आवास योजनेतून रे नगर येथे निर्माण झालेला देशातील सर्वात मोठा गृहप्रकल्प होय. या गृहप्रकल्पामुळे येथील हजारो गोरगरिबांनी अनेक पिढ्यांपासून पाहिलेले स्वतःच्या हक्काचे घर असण्याचे स्वप्न साकार होत असल्याचा आनंद आहे, असे भावोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील रे नगर येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत निर्माण होत असलेल्या ३० हजार घरकुलांपैकी पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांच्या चावी वितरण कार्यक्रमात काढले. तसेच या प्रकल्पाचे भूमिपूजन ९ जानेवारी २०१९ रोजी, तर आज १९ जानेवारी २०२४ रोजी गृहनिर्माण प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण होऊन घरकुलांच्या चावी वितरणाचे भाग्यही आपल्यालाच मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

## केंद्र शासनाच्या विविध योजना

केंद्र शासनाने गरिबांसाठी सर्वोच्च प्राधान्य देऊन विविध योजना राबवल्या. त्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना देऊन मध्यस्थांची साखळी बंद केली. गेल्या १० वर्षांत ३० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम गरीब, शेतकरी, महिला आणि युवकांच्या खात्यावर थेट पाठवली. जनधन योजना, आधार आदीद्वारे १० कोटी बनावट लाभार्थ्यांना हटवण्याचे काम केले. याशिवाय गरिबांना साधन, संसाधने उपलब्ध करून दिल्यास ते गरिबीचा पराभव करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, हे लक्षात घेऊन मागील ९ वर्षांत गरिबांच्या






कल्याणासाठी राबवलेल्या अनेक योजनांमुळे २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आल्याची माहिती प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दिली.

जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व वाढत असून त्यात छोट्या उद्योगांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. विकसित भारत होण्यास आत्मनिर्भर भारत बनणे गरजेचे आहे. त्यासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका खूप मोठी आहे. त्याकरिता अशा उद्योगांना केंद्र शासन प्रोत्साहन देत आहे. त्यातून मेड इन इंडिया उत्पादकांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. अशा प्रयत्नातूनच पुढील काळात भारताची अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार आहे.

हे शासन गरिबांसाठी समर्पित होते असे २०१४ साली घोषित केले होते. त्यानुसार गरिबांची समस्या कमी होण्यासह त्यांचे जीवन सुलभ व्हावे, म्हणून अनेक योजना राबवल्या. संपूर्ण देशात ४ कोटी लोकांना पक्की घरे, १० कोटी शौचालये, देऊन त्यांचा आत्मसन्मान वाढवण्याचे काम केले. देशातील गोरगरिबांना मोफत अन्नधान्य योजना कोरोना काळापासून लागू केलेली होती. त्या योजनेला पुढील पाच



वर्षे मुदतवाढ दिलेली आहे. 'एक देश एक रेशन कार्ड' योजना राबवल्यामुळे देशभरात कोठेही गेल्यास संबंधित गरीब कुटुंबाला मोफत अन्नधान्य मिळण्याची सोय केली जात आहे. आयुष्मान भारत योजनेंतर्गत आरोग्यावरील उपचारासाठी पाच लाखापर्यंतचे मोफत उपचार, जन औषधी केंद्राद्वारे ८० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या दराने औषधे, हर घर जल योजना आदी योजना या सामाजिक न्यायाच्या योजना आहेत. संत रविदास, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिलेले सामाजिक न्यायाचे स्वप्न याद्वारे पूर्ण केले जात आहे.

### महामार्गाचे जाळे

सोलापूर शहर हे व्यापारी उद्योगांचे शहर असून येथील कापड व चादर उद्योग देशभरात प्रसिद्ध आहे. येथे कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने शासनाने सुरू केलेल्या विश्वकर्मा योजनेचा लाभ

## अनेक देश राज्यात गुंतवणुकीस उत्सुक

नुकत्याच दावोस येथे पार पडलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूक करण्याचा कल मोठ्या प्रमाणात दिसून आला आहे. महाराष्ट्र राज्यावर विश्वास असल्याने अनेक देश राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे या वर्षी ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणुकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्राच्या प्रगतीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मोठा हातभार आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात अनेक पायाभूत विकासाचे प्रकल्प येत आहेत. दावोस येथे अनेक देशांचे राजकीय नेते, प्रशासक, उद्योजक व गुंतवणूकदार यांच्या भेटी झाल्या त्यावेळी त्यांनी प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्यावर विश्वास व्यक्त केला असून श्री. मोदी हे संपूर्ण जगात देशाचे महत्त्व वाढवत असल्याचा अनुभव मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितला. सोलापूर हे देशातील सर्वात मोठे श्रमिकांचे शहर असल्याचे सांगून रे नगर येथील गृहप्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण होऊन १५ हजार नागरिकांना त्यांच्या हक्काचे पक्के घर मिळत असल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी आनंद व्यक्त करून त्या सर्व कुटुंबांना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी रे नगर फेडरेशन व गृह प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक नरसय्या आडम यांनी प्रास्ताविक केले. या गृह प्रकल्पाविषयी तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा प्रशासनाने बजावलेल्या भूमिकेची माहिती त्यांनी दिली.



येथील कामगारांनी घ्यावा, असे आवाहनही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी केले. संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग, संत तुकाराम पालखी मार्ग; तसेच विविध महामार्गांचे जाळे सोलापूर जिल्ह्यात निर्माण होत असून त्यातून विकासाची गती वाढणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अमृत योजनेंतर्गत कामाचा शुभारंभ

केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेंतर्गत भिवंडी निजामपूर, सांगली, उल्हासनगर व कल्याण-डोंबिवली या महापालिका, तर शेगाव, सातारा व भद्रावती या नगरपालिका यांच्या मंजूर असलेल्या एकूण १ हजार २०१ कोटी एक हजार रुपयांच्या खर्चाच्या पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्थापन विकासकामांचे भूमिपूजन दूरदृश्य प्रणालीद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

रे नगर गृह प्रकल्प येथील तीन लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते घरांच्या चावीचे वितरण करण्यात आले. सोलापूर महापालिकांतर्गत पीएम स्वनिधी योजनेच्या तीन लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात १० हजार रुपये कर्ज मंजुरीचे पत्रही यावेळी वितरित करण्यात आले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी, खा. रणजितसिंह निंबाळकर, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, विजयकुमार देशमुख; तसेच रे नगर हाऊसिंग फेडरेशनचे संस्थापक आणि मुख्य प्रवर्तक नरसय्या आडम आदी उपस्थित होते.

## रे नगर गृहप्रकल्प

रे नगर गृहप्रकल्प हा देशातील सर्वात मोठा गृहनिर्माण प्रकल्प आहे. हा प्रकल्प ३६५ एकर जागेवर विकसित होत आहे. या प्रकल्पांतर्गत ३० हजार घरे निर्माण केली जाणार असून प्रत्येक घर हे ३०० चौरस फूट इतके असणार आहे. या गृहप्रकल्पाचा एकूण खर्च एक हजार आठशे एकतीस कोटी इतका असून घरकूल बांधकामासाठी एकूण १,५०० कोटी खर्च होणार आहेत, तर उर्वरित ३३१ कोटी हे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खर्च केले जात आहेत. घरकुलांसाठी १ हजार ५०० कोटींपैकी ७५० कोटी लाभार्थ्यांचा हिस्सा, तर ७५० कोटी केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा आहे. कचरा उचलणारे, विडी कामगार, बांधकाम कामगार, वस्त्रोद्योग कामगार इत्यादी असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ही घरकुले आहेत. रे नगर फक्त कामगारांसाठी असलेली देशातील सर्वात मोठी कामगार वसाहत आहे. जिल्हा परिषदेच्यावतीने रे नगर येथील अंतर्गत रस्ते, ४० अंगणवाडी व एकूण सात शाळा सुरू करण्यात येत आहेत. यातील तीन शाळा उर्दू माध्यमाच्या आहेत. सोलापूर महापालिकेच्या वतीने रे नगर ते सोलापूर शहर अशी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढील काळात रे नगर नगरपरिषद अस्तित्वात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.

**मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारे अंतर कमी करणारा आणि प्रवासाच्या वेळेत बचत करणारा 'अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावाशेवा अटल सेतू' चे लोकार्पण प्रधानमंत्री यांच्या हस्ते १२ जानेवारी २०२४ रोजी झाले. मुंबईसह परिसराची सर्वांगीण उन्नती साधणारा, प्रवाशांच्या सुरक्षेची काळजी घेणारा आणि मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी साहाय्यभूत ठरणारा हा सेतू 'गेमचेंजर' ठरणारा आहे.**

# 'अटल सेतू'

**ब्रिजकिशोर झंवर**

मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. बेटांचे शहर असलेल्या मुंबईच्या रहिवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी शासनाने विविध प्रकल्प राबवले आहेत. याचाच पुढचा टप्पा म्हणून मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारा मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) अर्थात 'अटल सेतू' अस्तित्वात आले आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक जाळे विस्तारणारा हा देशातील सर्वात मोठा सागरी पूल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) उभारण्यात आला असून तो आता वाहतुकीसाठी खुला झाला आहे. हा प्रकल्प अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अभियांत्रिकी आविष्कार मानला जात आहे.

## प्रकल्पाची वैशिष्ट्ये

सागर, जमीन आणि दलदल अशा तीनही भागांमध्ये उभारलेला सुमारे २१ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी तीन स्थापत्य कंत्राटदार, एक इंटेलिजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टिम कंत्राटदार, विविध १० देशांतील विषयतज्ज्ञांनी आपले योगदान दिले असून १,५०० हून अधिक अभियंते, तर सुमारे १६,५०० कुशल मजुरांनी तीन पाळ्यांमध्ये अहोरात्र काम केले आहे. या प्रकल्पामध्ये सुमारे १.२ लाख टन स्टिल वापरण्यात आले आहे. इतक्याच स्टिलमध्ये चार हावडा ब्रिज उभारले जाऊ शकतात. प्रकल्पासाठी ८ लाख ३० हजार क्युबिक मीटर काँक्रिटचा वापर झाला आहे. स्टॅच्यु ऑफ युनिटी उभारण्यासाठी लागलेल्या काँक्रिटपेक्षा हे सहापट अधिक आहे, तर या प्रकल्पात वापरण्यात आलेले स्टिल आयफेल टॉवरमध्ये वापरल्या गेलेल्या स्टिलच्या १७ पट अधिक आहे. सुमारे एक हजार खांबांवर उभारल्या गेलेल्या या मार्गावर १०० कि.मी. प्रतितास वेगाने प्रवास करता येणार असून दररोज सुमारे ७० हजार वाहने वाहून नेण्याची याची क्षमता आहे.

अटल सेतूसाठी अत्याधुनिक जपानी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. याची एकूण लांबी २२ किलोमीटर असून यापैकी १६.५ किलोमीटरचा भाग समुद्रात आणि सुमारे ५.५ किलामीटरचा भाग जमिनीवर उन्नत स्वरूपात आहे. यावर दोन्ही बाजूंना प्रत्येकी तीन मार्गिका असणार आहेत. पूर्व द्रुतगती मुक्तमार्ग हा जोडला गेला आहे आणि पूर्व-पश्चिम असणारा वरळी-शिवडी उन्नतमार्ग हा भविष्यात अटल सेतू प्रकल्पास जोडला जाणार आहे. यामुळे मुंबई सागरी किनारा रस्त्याद्वारे दक्षिण मुंबई आणि पश्चिम उपनगरातून येणाऱ्या प्रवाशांना अटल सेतूद्वारे विनाथांबा मुख्य भूमीकडे जाणे शक्य होणार आहे. साहजिकच प्रवासाचे अंतर कमी झाल्याने आणि एक तासाहून





अधिक प्रवास वेळेची बचत होणार असल्याने हरितगृह वायू उत्सर्जनसुद्धा कमी होणार आहे.

पुलाच्या दुसऱ्या बाजूला, नवी मुंबईतील उलवे येथील शिवाजीनगर, उरण-पनवेल राज्य महामार्ग आणि मल्टिमॉडेल कॉरिडॉरवर चिर्ले येथे आंतरबदल (इंटरचेंज) करण्यात आले आहेत. याद्वारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, पुणे किंवा गोवा येथून प्रवासी जड वाहने सहजतेने मुंबईत प्रवेश करू शकतील. हा सेतू मार्ग विविध जोडरस्त्यांनी मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, वसई-विरार, नवी मुंबई, रायगड जिल्ह्याला जोडला जाणार असल्याने यामधील अंतर कमी होणार आहे. या प्रकल्पामध्ये भारतातील पहिल्या ओपन रोड टोलिंग प्रणालीचादेखील वापर करण्यात आला आहे.

अटल सेतू उभारताना पर्यावरणाचा समतोल विचार करण्यात आला आहे. या क्षेत्रात स्थलांतरित पक्ष्यांचा विशेषत: फ्लेमिंगोंचा नैसर्गिक अधिवास असल्याने प्रकल्पाच्या समुद्रातील भागात खारफुटी व दलदल इत्यादी पर्यावरणीय वैशिष्ट्यांना कमीत कमी नुकसान होईल, याची दक्षता एमएमआरडीएने घेतली आहे. सुरक्षेची बाब लक्षात घेऊन बंद पडलेली वाहने नेण्यासाठी स्वतंत्र आपत्कालीन मार्गिका, ॲण्टी-क्रॅश बॅरिअर्स असलेली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम; तसेच पक्ष्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, ध्वनी अडथळे (साऊंड बॅरिअर्स) लावण्यात आले आहेत. भूकंप, चक्रिवादळ, वाऱ्याचा दाब आणि भरती-ओहोटीच्या प्रभावामध्ये टिकून राहण्यासाठी या प्रकल्पास सक्षम बनवण्यात आले असून सागरी सेतूचे घटक पुढील १०० वर्षांपर्यंत टिकून राहण्यासाठी गंजरोधक सामग्रीपासून बनवलेले आहेत.

### प्रकल्पासमोरील आव्हाने

अटल सेतू बनवणे अतिशय आव्हानात्मक काम होते. यासाठी अत्याधुनिक जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून हा अद्वितीय पूल बांधण्यात आला. एका बाजूला मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि दुसऱ्या बाजूला जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण असलेल्या मुंबई खाडीमध्ये हा पूल उभारण्यात आला आहे. कंटेनर वाहून नेणारी मोठी जहाजे; तसेच मासेमारीच्या बोटी येथून सतत ये-जा करत असतात. त्यांची वाहतूक सुरळीत व्हावी, याबरोबरच कच्च्या तेलाची वाहतूक करणाऱ्या समुद्राखालील वाहिन्या, भाभा अणुसंशोधन केंद्र आणि बीपीसीएलच्या तेल टर्मिनल्सची सुरक्षितता आदी बाबी लक्षात घेऊन या व्ह्यू बॅरिअर्सचे नियोजन करण्यात आले आहे.

### चौफेर विस्तारासाठी साहाय्यभूत

मुंबई बेटाच्या भौगोलिक मर्यादांमुळे शहरातील जमिनीच्या टंचाईची समस्या संपुष्टात येऊन अद्याप उपनगरी रेल्वेवर अवलंबून असल्यामुळे प्रामुख्याने उत्तर-दक्षिण विस्तारलेल्या मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी हा प्रकल्प साहाय्यभूत ठरणार आहे. या परिसरात दहा विकास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षात प्रवेश करणारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई परिसरातील नागरिकांना विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देत असून अटल सेतूच्या रूपाने प्राधिकरणाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

वेळेची आणि इंधनाची बचत होणार असल्याने या प्रकल्पामुळे तिसरी मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात मोठे उद्योग, विकासात्मक प्रकल्प येऊन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक असा सर्वांगीण आणि शाश्वत विकास होण्यास मदत होणार आहे. यामुळे या भागातील पर्यटनालादेखील अधिक चालना मिळेल. अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या अपेक्षित चालनेमुळे, तसेच नव्याने होणाऱ्या रोजगारनिर्मितीमुळे हा प्रकल्प 'गेम चेंजर' ठरणार आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**भारतीय नौदलाची ताकद, नौदलाचे योगदान अधोरेखित करण्यासाठी आणि त्यांची ऊर्जा वाढवण्यासाठी, ती जगाला दाखवण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबरला नौदल दिनाचे आयोजन उत्साहात केले जाते. शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५०व्या वर्षपूर्तीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांनी सागरी आरमाराची उभारणी केलेल्या सिंधुदुर्ग नगरीत संपन्न झालेल्या देदीप्यमान सोहळ्यातून नौदलाला प्रचंड ऊर्जा मिळाली आहे. त्याचबरोबर प्रत्यक्षदर्शींसह थेट प्रक्षेपण पाहणाऱ्या करोडो भारतीयांमध्ये ऊर्जा निर्माण करणारा हा सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.**

# नौदल दिन सोहळा
# सामर्थ्यशाली सागरी आरमार

दरवर्षी ४ डिसेंबर रोजी 'नौदल दिन' साजरा केला जातो. सिंधुदुर्ग येथील 'नौदल दिन २०२३' सोहळा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समृद्ध सागरी वारशाला आदरांजली अर्पण करतो. ज्यांच्या राजमुद्रेद्वारे नवीन नौदल चिन्हाची प्रेरणा मिळाली; ज्याचा स्वीकार गतवर्षी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पहिल्या विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतच्या जलावतरणावेळी करण्यात आला.

### सोहळ्याची व्याप्ती

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्लीबाहेर लष्कर दिन, नौदल दिन इत्यादींसारखे दिन आयोजित करण्याच्या नवीन परंपरेबद्दल सांगितले, कारण यामुळे या सोहळ्याची व्याप्ती भारतभर वाढते आणि नवीन ठिकाणे आकर्षणाचे नवीन केंद्रे ठरतात.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सिंधुदुर्ग येथे आयोजित 'नौदल दिन २०२३' च्या मुख्य कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, मालवण, तारकर्ली किनारपट्टीवरील सिंधुदुर्ग हा भव्य किल्ला, वीर छत्रपती शिवाजी महाराज यांचे वैभव आणि राजकोट किल्ल्यावरील त्यांच्या नेत्रदीपक पुतळ्याचे लोकार्पण आणि भारतीय नौदलाचा जयघोष आणि ४ डिसेंबर या ऐतिहासिक दिवसामुळे भारतातील प्रत्येक नागरिकाचे मन उत्कटता आणि उत्साहाने भारावून गेले आहे, असे सांगून नौदल दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि देशासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या शूरवीरांपुढे ते नतमस्तक झाले.

### सिंधुदुर्ग किल्ला भारतीयांचा अभिमान

सिंधुदुर्गच्या विजयी भूमीवर 'नौदल दिन' साजरा करणे हा खरोखरच अभूतपूर्व अभिमानाचा क्षण आहे, असे प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले. सिंधुदुर्ग किल्ला भारतातील प्रत्येक नागरिकाच्या मनात अभिमानाची भावना निर्माण करतो. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत सांगितले की, कोणत्याही देशासाठी नौदल क्षमतेचे महत्त्व ते जाणून होते. ज्यांचे समुद्रावर नियंत्रण आहे, त्यांच्याकडे अंतिम सत्ता आहे, या छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणेचा पुनरुच्चार करत प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, त्यांनी शक्तिशाली नौदलाची उभारणी केली. कान्होजी आंग्रे, मायाजी नाईक भाटकर, हिरोजी इंदुलकर या योद्ध्यांपुढे नतमस्तक होत ते आजही



प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी नमूद केले.



## भारतीय परंपरेनुसार नौदलाचे रँकिंग

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्शाने प्रेरित होऊन आजचा भारत गुलामगिरीची मानसिकता झुगारून पुढे मार्गक्रमण करत आहे, असे प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले. नौदल अधिकाऱ्यांच्या गणवेशावरील मानचिन्ह (इपॉलेट्स) आता छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा आणि ठेवा अधोरेखित करतील. कारण हे नवीन मानचिन्ह नौदलाच्या प्रतीकचिन्हाशी साधर्म्य साधते, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. त्यांनी गेल्या वर्षी नौदलाच्या ध्वजाचे अनावरण केल्याची आठवण सांगितली.



आपल्या वारशाचा अभिमान बाळगत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी घोषणा केली की, भारतीय नौदल आता भारतीय परंपरेनुसार आपल्या पदांचे (रँक) नामकरण करणार आहे.

## सशस्त्र दलात नारी शक्तीचे स्वागत

सशस्त्र दलांमध्ये नारी शक्ती मजबूत करण्यावरही त्यांनी भर दिला. नौदलाच्या जहाजात भारताच्या पहिल्या महिला कमांडिंग ऑफिसरच्या नियुक्तीबद्दल प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी भारतीय नौदलाचे अभिनंदन केले.


१४० कोटी भारतीयांचा विश्वास ही सर्वात मोठी शक्ती आहे, कारण भारत मोठी उद्दिष्टे निश्चित करत आहे आणि पूर्ण दृढनिश्चयाने ती साध्य करण्यासाठी झटत आहे, असे प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले. विविध राज्यांतील लोक 'राष्ट्र प्रथम' या भावनेने प्रेरित होत असल्यामुळे संकल्प, भावना आणि आकांक्षा यांच्या एकत्रित सकारात्मक परिणामांची झलक दिसून येत आहे, असे प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले. देशाने इतिहासातून प्रेरणा घेतली आहे आणि उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शक आराखडा तयार केला जात आहे. नकारात्मकतेच्या राजकारणावर मात करून प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्याचा संकल्प जनतेने केला आहे. हा संकल्प आपल्याला विकसित भारताकडे घेऊन जाईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

## शासन ब्ल्यू इकॉनॉमीसाठी प्रयत्नशील

भारताच्या व्यापक इतिहासाबाबत व्यक्त होताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, हा इतिहास केवळ गुलामगिरी, पराभव आणि निराशेबद्दलचा नसून, त्यामध्ये भारताचे विजय, धैर्य, ज्ञान आणि विज्ञान, कला आणि सृजनशीलता, कौशल्ये आणि भारताच्या सागरी क्षमतांच्या गौरवशाली अध्यायांचाही समावेश आहे.

परकीय शक्तींच्या आक्रमणामुळे सर्वात प्रथम भारताची सागरी क्षमता बाधित झाल्याचे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, जो भारत नौका आणि जहाजे बनवण्यासाठी प्रसिद्ध होता, त्याने समुद्रावरील आपले नियंत्रण गमावले आणि त्यामुळे सामाजिक-आर्थिक ताकदही गमावली. भारत विकासाकडे वाटचाल करत असताना, आपण आपले गमावलेले वैभव परत मिळवायला हवे, यावर भर देत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी ब्ल्यू इकॉनॉमी, अर्थात नील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी शासन अथक प्रयत्न करत असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी 'सागरमाला' प्रकल्पांतर्गत बंदराच्या माध्यमातून होत असलेल्या विकासाचा उल्लेख केला आणि सांगितले की, भारत

'मेरिटाइम व्हिजन' अर्थात सागरी दृष्टिकोनांतर्गत आपल्या महासागरांच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्यांनी माहिती दिली की, शासनाने व्यापारी मालवाहतुकीला चालना देण्यासाठी नवीन नियम बनवले आहेत. त्यामुळे गेल्या ९ वर्षांमध्ये भारतातील सागरी व्यापाऱ्यांची संख्या १४० टक्क्यांहून अधिक वाढली आहे. सध्याच्या काळाचे महत्त्व अधोरेखित करताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले, हा भारताच्या इतिहासाचा असा काळ आहे, जो केवळ ५-१० वर्षांचा नव्हे, तर येणाऱ्या अनेक शतकांचे भविष्य लिहिणार आहे. ते म्हणाले की, गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये दहाव्या स्थानावरून झेप घेत, तो पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरला आहे आणि तिसऱ्या स्थानाच्या दिशेने वेगाने प्रवास करत आहे. जग भारताचा 'विश्व मित्र (जगाचा मित्र)' म्हणून उदय होताना पाहत आहे, असे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, इंडिया मिडल इस्ट युरोपियन कॉरिडॉरसारख्या उपायांमुळे हरवलेला मार्ग पुन्हा निर्माण होईल. त्यांनी मेड इन इंडियाचे सामर्थ्य स्पष्ट करताना तेजस, किसान ड्रोन, यूपीआय प्रणाली आणि चांद्रयान-३ यांचा उल्लेख केला. परिवहन विमाने, विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतच्या उत्पादनामुळे संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतादेखील दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.




## जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील

देशाच्या किनारपट्टी आणि सीमावर्ती भागातील गावांना, देशातील शेवटचे गाव, असे संबोधण्याऐवजी, 'देशातील पहिले गाव' समजण्याच्या शासनाच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार करताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले, आज किनारपट्टी भागातील प्रत्येक कुटुंबाचे जीवनमान सुधारणे ही केंद्र शासनाची प्राथमिकता आहे. २०१९ मध्ये स्वतंत्र मत्स्यव्यवसाय मंत्रालयाची निर्मिती आणि या क्षेत्रात ४० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा उल्लेख करून, २०१४ नंतर मत्स्य उत्पादनात ८ टक्के आणि निर्यातीत ११० टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्याशिवाय शेतकऱ्यांसाठी विमा संरक्षण २ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवण्यात आले असून त्यांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळत आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मूल्यसाखळीच्या विकासाबाबत बोलताना प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, सागरमाला योजना किनारपट्टी भागातील आधुनिक कनेक्टिव्हिटी (संपर्क यंत्रणा) मजबूत करत आहे. यावर लाखो कोटी रुपये खर्च होत असून, त्यामुळे किनारपट्टी भागात नवे व्यापार आणि उद्योग सुरू होतील. मत्स्य प्रक्रियेशी संबंधित उद्योग आणि मासेमारी नौकांचे आधुनिकीकरणही हाती घेतले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## कोकणच्या विकासासाठी

कोकण हा अभूतपूर्व संधींचा प्रदेश आहे. या राज्याच्या विकासासाठी शासनाची बांधिलकी अधोरेखित करताना प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अलिबाग, परभणी आणि धाराशिव येथील वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन, चिपी विमानतळाचे कार्यान्वयन आणि माणगावपर्यंत जोडणाऱ्या दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचा उल्लेख केला. काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष योजना तयार केल्याचेही त्यांनी नमूद केले. समुद्रकिनारी असलेल्या निवासी भागांचे रक्षण करणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या प्रयत्नात त्यांनी खारफुटीची व्याप्ती वाढवण्यावर भर दिला जात असल्याचा उल्लेख केला. खारफुटी व्यवस्थापनासाठी मालवण, आचरा-रत्नागिरी आणि देवगड-विजयदुर्गसह महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांची निवड करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

वारसा आणि विकास, हाच आपला विकसित भारताचा मार्ग आहे. कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात या वास्तूंच्या संवर्धनावर कोट्यवधी रुपये खर्च होत असताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात बांधलेले गडकिल्ले जतन करण्याचा केंद्र व राज्य शासनाचा निर्धार आहे. यामुळे या भागातील पर्यटन वाढून नवीन रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे त्यांनी नमूद केले.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी सागरी आरमाराचे महत्त्व ओळखले आणि त्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने राज्यकर्ते होते. त्यांनी स्वराज्याला सशक्त करण्यासाठी खूप मोठे योगदान दिले. यापूर्वी तीनही सेनादलांमध्ये फक्त भूदलाला महत्त्व होते; पण आता नौदलाची ताकद प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी वाढवून त्याचे महत्त्व अधोरेखित केले असल्याचे सांगितले.

नौदल दिनाचा समारंभ मालवण येथे होत असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. हे काम नौदलाने तीन महिन्यात केले ही अभिनंदनीय बाब असल्याचे सांगून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमारविषयक दृष्टिकोनाची

माहिती केंद्रीय अवजड उद्योगमंत्री नारायण राणे यांनी दिली.

## नौदलाच्या ध्वजामध्ये राजमुद्रेचा वापर

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले, ही बाब आपल्या सर्वांसाठी गौरवाची आहे. भारतीय नौदलाच्या ध्वजामध्येही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेचा समावेश केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले व महाराष्ट्रासाठी गौरवाची, अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

यावेळी महाराष्ट्राच्या पहिल्या नौदल अधिकारी म्हणून श्रीमती देवस्थळी यांची नेमणूक झाली आहे, याचाही महाराष्ट्राला अभिमान असल्याचे सांगून ते म्हणाले, देशातील महिलांच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झाले आहे. आत्मनिर्भरतेचा छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेला वारसा आणि वसा आपण सर्वजण पुढे घेऊन जात आहे. आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक महासत्ता म्हणून भारत उदयास आला आहे. आता आपल्या सामर्थ्याची नोंद संपूर्ण जगाने घेतलेली आहे.

## नौदलाची कार्यान्वयन प्रात्यक्षिके

दरवर्षी नौदल दिनानिमित्त भारतीय नौदलाची जहाजे, पाणबुड्या, विमाने आणि विशेष दले यांच्याद्वारे 'कार्यान्वयन प्रात्यक्षिके' आयोजित करण्याची परंपरा आहे. ही 'कार्यान्वयन प्रात्यक्षिके' लोकांना भारतीय नौदलाने हाती घेतलेल्या बहु-डोमेन कार्यान्वयनाच्या विविध पैलूंचे साक्षीदार बनण्याची संधी देतात. राष्ट्रीय सुरक्षेतील नौदलाच्या योगदानावर प्रकाश टाकतात आणि नागरिकांमध्ये सागरविषयक जाणीव-जागृती करतात.

या ठिकाणी आयोजित क्रियात्मक प्रात्यक्षिकांमध्ये कॉम्बॅट फ्री फॉल, हाय स्पीड रन्स, स्लिदरिंग ऑप्स ऑन जेमिनी अँड बीच असॉल्ट, एसएआर डेमो, व्हीईआरटीआरईपी आणि एसएसएम लाँच डिल, सीकिंग ऑप्स, डंक डेमो आणि सबमरीन ट्रान्झिट, कामोव्ह ऑप्स,





न्युट्रलायझिंग एनिमी पोस्ट, स्मॉल टीम इन्सर्शन - एक्स्ट्रॅक्शन (एसटीआयई ऑप्स), फ्लाय पास्ट, नेव्हल सेंट्रल बँड डिस्प्ले, कंटिन्युटी ड्रिल, हॉर्नपाइप डान्स, लाइट टॅटू ड्रमर्स कॉल आणि सेरेमोनिअल सनसेट यांचा समावेश होता.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, संरक्षण दलाचे प्रमुख जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार आदी यावेळी उपस्थित होते.

सिंधुदुर्ग किल्ल्यापासून तारकर्ली समुद्र किनाऱ्यापर्यंत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अंगावर शहारे आणणारी प्रात्यक्षिके, नौदलासह देशाची शान असणाऱ्या युद्धनौका, लढाऊ विमाने, पाणबुड्या यांचे संचलन करणारे नौदलातील विशेष सैन्यदल पाहून छत्रपती शिवाजी महाराज यांनी सामर्थ्यशाली सागरी आरमाराचे पाहिलेले स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झाल्याचे दृश्य भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर देशवासीयांनी अनुभवले, तर जगाला भारताच्या सागरी सामर्थ्याची ओळख झाली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समृद्ध सागरी वारशाला त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारून त्यांनी बांधलेल्या अभेद्य सिंधुदुर्ग किल्ल्यावर नौदल दिन साजरा करून त्यांच्या कार्याचा गौरव झाला. या दिवशी हा सोहळा पाहून संपूर्ण सिंधुदुर्ग नगरीतील नागरिक रोमांचित, उत्साहित व राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेले होते. हा सोहळा संपूर्ण भारतातील नागरिकांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रभावना वाढण्यास प्रेरणादायी ठरलेला आहे. नौदलासह, राज्य शासन व स्थानिक प्रशासनाने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करून देशवासीयांमध्ये सागरी चेतना निर्माण करण्याचे यशस्वी कार्य केले आहे.

**शब्दांकन : सुनील सोनटक्के,**
प्र. उपसंचालक, कोल्हापूर.

**दावोस येथील ५४व्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रामध्ये परदेशी गुंतवणूक करण्याचा ओढा मोठ्या प्रमाणात दिसून आला असून, यावर्षी ३ लाख ५३ हजार ६७५ कोटी रुपयांपेक्षा जास्त परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार स्वाक्षरीत झाले आहेत. याशिवाय, जवळपास एक ते दीड लाख कोटी रुपयांचे आणखी सामंजस्य करार स्वाक्षरीत होण्यासाठी परदेशी कंपन्यांनी स्वारस्य दाखवले. या करारांमुळे राज्यात २ लाख इतक्या मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होणार आहे. त्यामुळे राज्यावर जागतिक उद्योजकांचा आणि गुंतवणुकदारांचा विश्वास वाढला आहे.**

# औद्योगिक गुंतवणुकीत **महाराष्ट्राला पसंती**

**मनीषा सावळे**

जगभरातील उद्योग क्षेत्रासाठी महाराष्ट्राची भूमी सुपीक आहे. व्यवसायासाठी अनुकूल वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा, तरुण, कुशल आणि उच्च शिक्षित मनुष्यबळाची राजधानी, मजबूत कनेक्टिव्हिटी, ग्राहकांची उच्च मागणी, प्रोत्साहन आणि अनुदान यामुळे राज्य औद्योगिक गुंतवणुकीसाठी अव्वल पसंतीचे ठिकाण ठरत आहे. महाराष्ट्राने आपल्या गुंतवणूक अनुकूल धोरणांमुळे उद्योगांना आकर्षित केले आहे. उल्लेखनीय म्हणजे सन २०१६ पासून २८९८ पेक्षा अधिक सामंजस्य करार झाले आहेत. मागील वर्षी २०२३ मध्ये दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत १९ सामंजस्य करार करून १ लाख ३७ हजार ६६६ कोटी रुपयांची गुंतवणूक राज्याने आणली आहे. त्यातील ८५ टक्के उद्योगांना राज्य शासनाने जमीन आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खार उद्योग, डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध सेक्टरमध्ये उद्योजकांनी गुंतवणूक केली आहे. उद्योजकांचा महाराष्ट्रावरचा हाच विश्वास यावर्षीसुद्धा दावोसमध्ये पाहायला मिळाला. दावोस येथे झालेल्या ५४व्या जागतिक आर्थिक परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत आणि राज्य व केंद्र शासनाचे शिष्टमंडळ सहभागी झाले होते. यावर्षी झालेल्या परिषदेत अमेरिका, स्वित्झर्लंड, सिंगापूर, दक्षिण कोरिया या देशांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून यूएई, ओमान या देशांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास पसंती दर्शवली आहे.



त्याचबरोबर अर्शीया, मित्तल, जिंदाल, गोदरेज, अदानी या कंपन्यांनीसुद्धा महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली आहे. मागील सहा महिन्यांमध्ये देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक राज्यात आली आहे आणि ती गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली या तीन राज्यांच्या एकत्रित गुंतवणुकीपेक्षा जास्त आहे.

महाराष्ट्राने औद्योगिक उद्याने, माहिती तंत्रज्ञान पार्क, लॉजिस्टिक पार्क, मेगा टेक्स्टाईल हब, स्मार्ट औद्योगिक शहरे, प्लग ॲण्ड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर, औद्योगिक समूहांसाठी दळणवळण सुविधा आणि स्टार्टअपसाठी इन्क्युबेटर केंद्रे विकसित केली आहेत. उद्योगांसाठी वरदान ठरणाऱ्या विविध सुविधाही राज्य सरकारने दिल्या आहेत. यामध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करून गुंतवणूकदारांसाठी एक खिडकी सुविधा केंद्र अशा सुविधांचा समावेश आहे.

### आरोग्य सुविधांत क्रांती

एमएसटीएआर हा एक नावीन्यपूर्ण प्लॅटफॉर्म असून आयुष्मान भारत डिजिटल मिशन अनुरूप डिजिटल आरोग्य सेवा राज्यातील जनतेला देण्याची सुविधा यामध्ये आहे. यासंदर्भात दावोस येथे हिताची एमजीआरएम नेटशी भागीदारी करण्यात आली असून त्यामुळे आरोग्य क्षेत्रात परिवर्तन होईल. या भागीदारीमुळे राज्यातील आरोग्याच्या पायाभूत सुविधांमध्ये क्रांती होईल. नागरिकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सेवा मिळेल. शिवाय प्रत्येकाचे आरोग्य रेकॉर्ड अद्ययावत ठेवण्यात येईल. रिमोट पद्धतीने वैद्यकीय चाचण्या व तपासणी करण्यात येतील. हिताची एमजीआरएम नेटचा एमएसटीएआर प्लॅटफॉर्म हा नावीन्यपूर्ण उपक्रम आहे.

आरोग्य सेवा देण्यातील अडचणी ओळखून सुलभरीत्या या सेवा देण्याची व्यवस्था यात विकसित करण्यात आली आहे. या भागीदारीमुळे राज्यातील आरोग्याच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक प्रगती होऊन त्या अधिक कार्यक्षम बनतील.



### गुंतवणूक करार झालेल्या उद्योगांची माहिती व रोजगार

राज्यात पोलाद, आयटी, हरित उर्जा, कृषी, लॉजिस्टिक, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार करण्यात आले.

**१६ जानेवारी** : आयनॉक्स एअर प्रोडक्ट २५ हजार कोटी (५ हजार रोजगार), बी सी जिंदाल ४१ हजार कोटी (५ हजार रोजगार), जेएसडब्ल्यू स्टिल २५ हजार कोटी (१५ हजार रोजगार), एबी इन बेव्ह ६०० कोटी (१५० रोजगार), गोदरेज एग्रोव्हेट १००० कोटी (६५० रोजगार) अमेरिकास्थित डेटा कंपनी १० हजार कोटी (२०० रोजगार)

**१७ जानेवारी** : अदानी ग्रुप ५० हजार कोटी (५०० रोजगार), स्विस इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ११५८ कोटी (५०० रोजगार), इंडियन ज्वेलरी पार्क ५० हजार कोटी (१ लाख रोजगार), वेब वर्क्स ५ हजार कोटी (१०० रोजगार), लॉजिस्टिकमधील इंडोस्पेस, इएसआर, केएसएच, प्रगती, यांची मिळून ३,५०० कोटी (१५ हजार रोजगार), नैसर्गिक संसाधानातील कॉंगलोमिरेट कंपनी २० हजार कोटी (४ हजार रोजगार)

**१८ जानेवारी** : सुरजागड इस्पात १० हजार कोटी (५ हजार रोजगार), कालिका स्टील ९०० कोटी ( ८०० रोजगार), मिलियन स्टिल २५० कोटी ( ३०० रोजगार), ह्युंदाई मोटर्स ७ हजार कोटी (४ हजार रोजगार), कतारची एएलयु टेकसमवेत २०७५ कोटी (४०० रोजगार), सीटीआरएल एस ८६०० कोटी (२५०० रोजगार) इत्यादींचा समावेश आहे.

### आर्थिक विकासाला चालना



“ महाराष्ट्रातील गावे, शहरांमध्ये आर्थिक विकासाला मोठी गती देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार जगातल्या अनेक भागात तंत्रज्ञानाच्या जोरावर नावीन्यता जिल्हे (इनोव्हेशन डिस्ट्रिक्ट) पुढे आले आहेत. त्यामुळे त्या परिसरात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. नावीन्यपूर्ण उद्योग, व्यवसाय, संशोधन संस्था आणि उद्योजकतेची वाढ ही या जिल्ह्यांची वैशिष्ट्ये आहेत. ज्ञानाचे आदानप्रदान आणि तंत्रज्ञानाचा विकास करणारी इकोसिस्टिम या जिल्ह्यांनी तयार केली असून महाराष्ट्रातदेखील अशाच स्वरूपाची इकोसिस्टिम घडवण्यावर भर देण्यात येत आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री** ”

### हरित उर्जा प्रकल्पांसाठी करार

अमेरिकास्थित प्रेडिक्शन्ससमवेत ४ हजार कोटी, युरोपमधील हिरो फ्युचर एनर्जीमध्ये ८ हजार कोटी, जर्मनीच्या ग्रीन एनर्जी ३,००० मध्ये ४० हजार कोटी, व्हीएचएम ओमानसमवेत ४ हजार कोटींचे करार झाले आहेत. याशिवाय विविध उद्योगांनी १ लाख कोटींचे गुंतवणूक स्वारस्य दाखवले असून यात अर्सेलर निपॉन मित्तल; तसेच सौदी, अरब, ओमान येथील उद्योगांचा समावेश आहे.

### विविध उद्योग समुहांशी चर्चा

दावोस येथील महाराष्ट्र दालनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विविध उद्योग समुहांचे प्रमुख भेटले. त्यामध्ये अदानी समुहाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौतम अदानी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र दालनात भेट घेतली. यावेळी त्यांच्यात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा क्षेत्र, गुंतवणुकीच्या संधी आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ज्येष्ठ उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांच्यासोबत भविष्यातील गुंतवणुकीच्या सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर लिंकस्टाईनचे युवराज यांच्याशी देखील औद्योगिक गुंतवणुकीबाबत संवाद साधण्यात आला.

फ्रेंच वाणिज्य कंपनी असलेल्या लुईस ड्रेफसचे मुख्य धोरणकर्ते अधिकारी थॉमस कौटॉडियर आणि मुख्य वित्त अधिकारी पॅट्रिक ट्रुअर यांच्यासमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बैठक झाली. महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विस्ताराबाबत यावेळी चर्चा झाली. दक्षिण कोरियाच्या ग्योग्गी प्रांताचे गव्हर्नर किम डॉंग यिओन यांची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट होऊन त्यात उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दक्षिण कोरियाचे कौशल्य आणि कुशल मनुष्यबळाच्या क्षेत्रातील भारताची ताकद यांच्यात समन्वय करून या क्षेत्रात महाराष्ट्रात मजबूत पायाभरणी करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

चेक प्रजासत्ताकस्थित विटकोविट्झ ॲटोमिका कंपनीचे चेअरमन डेव्हिड क्रोबोक आणि मुख्यमंत्री यांच्यामध्ये छोटे मॉड्युलर अणुभट्टी तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधीबाबत चर्चा झाली. या करारांच्या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत देखील मुख्यमंत्र्यांसमवेत उपस्थित होते.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असल्याचे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात दिसून आले. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या माध्यमातून दिली. जनतेच्या हितासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मिळून एकत्र प्रयत्न करू या, असे आवाहन त्यांनी या निमित्ताने केले. अधिवेशनात विविध विषयांवर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली.**

# पुरवणी मागण्या मंजूर

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा संदेश दिला गेला. अवेळी आणि असमान पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबाबत विधानसभेत सविस्तर चर्चा होऊन शासनाने यासाठी अनुदान जाहीर केले. मराठा आरक्षणाबाबतही सकारात्मक चर्चा होऊन शासनाने आरक्षण देण्याची भूमिका स्पष्ट केल्यामुळे मराठा समाजाला दिलासा मिळाला आहे. राज्याचे पोलीस दल कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम चोखपणे पार पाडत असल्याचा विश्वास कायदा व सुव्यवस्थेबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व्यक्त झाला, तर विधानसभेत ५५,५२० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्याही मंजूर करण्यात आल्या.

## विविध प्रश्नांवर चर्चा

विधानसभेत प्रश्नोत्तरे, शासकीय विधेयके, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना, औचित्याचे मुद्दे, पॉइंट ऑफ ऑर्डर, नियम २९३ अन्वये उपस्थित झालेले प्रस्ताव, नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा, नियम २९२ अन्वये उपस्थित करण्यात आलेला अंतिम आठवडा प्रस्ताव, नियम ९४ अन्वये उपस्थित झालेल्या अर्धा तास चर्चा आदी आयुधांच्या माध्यमातून सत्ताधारी; तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी नागरिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. शासनाच्या वतीने संबंधित मंत्र्यांनी त्यावर ठोस उत्तरे देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला. या माध्यमातून नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागले असून यासाठी शासन सकारात्मक असल्याचे दिसून आले आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सभागृहातील दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी चर्चा उपस्थित केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील बळीराजाला दीड वर्षांत ४४,२७८ कोटी रुपयांची विक्रमी मदत दिल्याचे सांगून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्या हा अतिशय गंभीर विषय आहे. एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली तरी ती दुःखद असते, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी शेतकरी



आत्महत्या रोखण्यासाठी नव्याने टास्क फोर्सचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. शेतीच्या शाश्वत प्रगतीसाठी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमध्ये कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या ६.५६ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची घोषणाही त्यांनी केली. कृषी विभागाच्या प्रमुख योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जुलै २०२२ पासून तब्बल १५ हजार ४० कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनादेखील अनुदान देण्यास सुरुवात केली असून आतापर्यंत १४ लाख ३१ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सुमारे ५,१९० कोटी रुपये जमा करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. कृषी क्षेत्राचा विकासदर वाढवण्यासह विविध मार्गांनी शेतकऱ्यांना खंबीरपणे उभे करण्याचा शासनाचा सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी या विषयावर काम करणाऱ्या तज्ज्ञांची मदत घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'शेतकरी बांधवांनो, धीर सोडू नका, खचून जाऊ नका, शासन सदैव तुमच्या पाठीशीच नव्हे, तर तुमच्यासोबत आहे. आत्महत्या करून आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडू नका,' असे भावनिक आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.



### शाश्वत विकासासाठी प्रयत्न

परकीय थेट गुंतवणुकीपासून शिक्षण क्षेत्रापर्यंत राज्य पुन्हा आघाडीवर आहे. मेट्रो ट्रेन, बुलेट ट्रेन, मुंबई पुणे मिसिंग लिंक, एमटीएचएल, कोस्टल रोड या कामांना गती देण्यात आली आहे. शाळा आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासन ठोस पावले उचलत आहे. माझी शाळा, सुंदर शाळा, महावाचन अभियान आदी उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आदर्श शाळा तयार करून अतिरिक्त पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी उद्योगांच्या सीएसआर निधीतून प्रयत्न करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुंबईतील सुमारे दहा लाख रहिवाशांसाठी धारावी पुनर्विकास हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू आहे. या माध्यमातून झोपड्यांमधून जीवन व्यथित केलेल्या रहिवाशांना यातनामुक्त करून त्यांचे जीवनमान उंचावण्यात येणार आहे. मुंबईसह राज्यात प्रदूषण कमी होईल, यासाठीही प्रयत्न करण्यात येत असून स्वच्छतेला प्राधान्य दिले जात आहे. मुंबईत डीप क्लिनिंग मोहीम हाती घेण्यात आली असून, पुढील टप्प्यात राज्यातील सर्व शहरांमध्ये ही मोहीम राबवण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.



### मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन

मराठा समाजाला टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देताना अन्य समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, याचा पुनरुच्चार करतानाच राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर झाल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी याबाबतच्या चर्चेच्या उत्तरात सांगितले. मराठा समाजासाठीचे निर्णय घेताना शासनाने सर्व पक्ष आणि संघटनांनासुद्धा विश्वासात घेतल्याचे नमूद करून यानिमित्ताने राज्यात शांतता, कायदा व सुव्यवस्था, बंधुभाव कायम राखण्याचे आवाहन त्यांनी केले. बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय, अमृत या संस्थांच्या कार्यक्रम, योजनांमध्ये एकसमानता आणण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### विदर्भाचा विकास साधणार

विदर्भाचा जलद गतीने विकास करण्यासाठी या भागातील शेतकरी, उद्योजक, युवक यांसह इतर सर्व घटकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. उद्योग, ऊर्जा, रस्ते विकास, पर्यटन, जलसंधारण, खनिज संपत्तीचा विकास, वस्त्रोद्योग आदींना प्रोत्साहन देऊन विदर्भासह मराठवाड्याचाही विकास साधला जाणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

### महाराष्ट्र ड्रग्जमुक्त करणार

कायदा आणि सुव्यवस्थेसाठी पोलीस दल उत्कृष्ट काम करत आहे. त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. राज्यात २३ हजार पोलिसांची भरती करण्यात येत आहे. पोलिसांच्या घरांसाठीच्या योजना विविध टप्प्यांवर प्रगतिपथावर आहेत. ड्रग्जवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून या माध्यमातून महाराष्ट्र ड्रग्जमुक्त करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ऑनलाइन लॉटरी, सेक्स्टॉर्शन यावरही मोठी कारवाई होत असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात हरवलेल्या मुली परत येण्याचे प्रमाण सरासरी ९० टक्के, तर महिलांच्या बाबतीत ते ८६ टक्के असल्याचे ते म्हणाले. राज्यातील गुन्ह्यांचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत कमी असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबई शहरातून हिरा उद्योग सुरतला गेल्याची चर्चा होत आहे मात्र मुंबईतून एकही उद्योग सुरतला गेलेला नाही. एकही उद्योग सुरतला जाणार नसल्याचे मुंबई हिरा उद्योग संघानेही स्पष्ट केल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या उत्तरात दिली.

### ५५,५२० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ५५ हजार ५२० कोटी ७६ लाख ८५ हजार

## लक्षवेधी सूचना

राज्यातील आरोग्यव्यवस्था सक्षमीकरणासाठी आदर्श कार्यपद्धती तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयातील आरोग्य सुविधेबाबत सदस्य अबू आझमी यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. रुग्णालयातील असुविधेबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांकडे स्वतंत्र बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

मुंबई महानगर क्षेत्रातील रुग्णांसाठी मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर्करोग रुग्णालय उभारण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे मंत्री उदय सामंत यांनी सदस्य प्रताप सरनाईक यांनी मांडलेल्या लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

राज्यात १२ लाख ७० हजार यंत्रमाग आहेत. रोजगार निर्मितीमध्ये यंत्रमागधारकांचे मोठे योगदान आहे. यंत्रमागधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी अभ्यासगटाची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीत पाणी मिळावे यासाठी कर्नाटकसोबत कायमस्वरूपी पाणी वाटप करार करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ऑनलाइन जुगार चालवणाऱ्यांविरोधात विविध राज्यांत दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने अंमलबजावणी संचालनालयाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच राज्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील अशा प्रकारचे गुन्हे आणि गैरप्रकार रोखण्यासाठी आता राज्य शासन डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दूध उत्पादकांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन त्यांच्या पाठीशी आहे. त्याचप्रमाणे दूध भेसळ रोखण्यासाठी अशा व्यक्तींविरुद्ध फाशीची तरतूद करण्याचा कायदा तत्कालीन राज्य शासनाने करून केंद्र सरकारकडे पाठवला होता. तथापि त्यास अद्याप राष्ट्रपतींची मान्यता मिळालेली नसल्याचे सांगून याबाबत पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

राज्यात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांची प्रगती जाणून घेता यावी, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लवकरच पोर्टल सुरू करण्यात येत असून या माध्यमातून नागरिकांना पारदर्शकपणे कामांची प्रगती पाहता येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

अनाथ बालके ही शासनाची जबाबदारी असून त्यांच्या कल्याणासाठी शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे महिला व बालविकासमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीमधील तीन टक्के निधी महिला व बालविकासासाठी राखीव ठेवण्यात येतो. याबाबत झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन हा निधी वापरण्यामध्ये अधिक सुलभता आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर करण्यात आल्या. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात मांडलेला प्रस्ताव विधानसभेत मंजूर करण्यात आला. या पुरवणी मागण्यांमध्ये १९,२४४.३४ कोटी रुपयांच्या अनिवार्य, ३२,७९२.८१ कोटी रुपयांच्या कार्यक्रमांतर्गत व ३,४८३.६२ कोटी रुपयांच्या रकमा केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसाहाय्य आदींचा समावेश आहे.

## प्रश्नोत्तरे

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्था) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ हा कायदा आणखी सक्षम करण्यात येईल. यासाठी अभ्यासगट नियुक्त करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यामध्ये ॲप, संकेतस्थळे, विविध समाजमाध्यमे, ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचे प्रकार



घडत आहेत. अशा ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारांवर आळा घालण्यासाठी सर्वंकष असा 'डायनॅमिक (गतिमान) प्लॅटफॉर्म' तयार करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत एकूण ९७७ खासगी अनुदानित आश्रमशाळा चालवण्यात येतात. या शाळांमध्ये विज्ञान आणि गणित विषय शिकवण्यासाठी २८२ पदे भरण्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

राज्यात ३ ते १८ वर्षे वयोगटातील शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यात 'शाळेत चला अभियान' राबवण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हानिहाय बिंदुनामावली अंतिम करण्यात आली आहे. आता विद्यार्थींना पसंती क्रमांक देण्यास सांगितले जाईल. दोन महिन्यांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये पोषण आहारातील वस्तू तपासून पाठवल्या जातात. ज्या ठिकाणी मध्यवर्ती किचन आहे त्या ठिकाणी शिजवलेले अन्न तपासले जाते, त्याचा दर्जा राखण्यासाठी संबंधितांना प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत राज्यातील २५ जिल्ह्यांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले असून

लवकरच उर्वरित जिल्ह्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल. मुलांना आठवड्यातून एकदा अंडी आणि केळी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

रस्ते अपघात रोखण्यासाठी असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचे दृश्यस्वरूपात बदल दिसून येतील, अशी ग्वाही देतानाच राज्यात १७ ठिकाणी स्वयंचलित वाहन परवाना तपासणी मार्ग, २३ ठिकाणी स्वयंचलित वाहनयोग्यता प्रमाणपत्र केंद्र उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्वच्या सर्व ३१ रक्तपेढ्यांमध्ये लिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) येत्या महिन्याभरात बसवण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पीएम किसान व राज्य सरकारच्या 'नमो किसान महासन्मान' योजनेतून राज्यातील एकही पात्र लाभार्थी शेतकरी वंचित राहणार नाही, यादृष्टीने कृषी विभाग कृतिशील असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

'मागेल त्याला शेततळे' ही कृषी विभागाची महत्त्वाकांक्षी योजना असून अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना याचा अधिक लाभ मिळावा, यादृष्टीने विदर्भ, मराठवाड्यासह कोकणातदेखील या योजनेला अधिक व्यापकस्वरूप देण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

राज्यात सर्वात मोठी २३ हजार पोलिसांची भरती करण्यात आली आहे. राज्याची पोलीस प्रशिक्षण क्षमता ही ८ हजार आहे. या क्षमतेमध्ये दुपटीने वाढ करण्यात येणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अमली पदार्थविषयक गुन्हे लक्षात घेता 'ॲण्टी नार्कोटिक्स टास्क फोर्स'ची स्थापना करण्यात आली आहे. या टास्क फोर्सच्या माध्यमातून सर्व जिल्ह्यांमध्ये अमली पदार्थांचे गुन्हे नियंत्रित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

संत्रा निर्यातदार शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य मंत्रिमंडळात प्रस्ताव आणून त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे २५१ बसआगार, ५७७ बस स्थानके आहेत. महामंडळाकडे भाडेतत्त्वावर ४६७ बसेस असून महामंडळाच्या स्वमालकीच्या १५ हजार ७९५ बसेस आहेत. या बसेसमधून दररोज ५४ लाख प्रवासी प्रवास करत असतात. एवढे मोठे जाळे असलेल्या महामंडळाच्या बस स्थानकांचे दोन महिन्यांच्या आत सुशोभिकरण व पायाभूत सुविधांचा विकास करून रूपडे पालटवण्यात येणार असल्याचे मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

## निवेदन

राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेऊन सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गायीच्या दुधाकरिता दूध उत्पादकास प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्यात येईल, अशी माहिती दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील



यांनी निवेदनाद्वारे दिली. सध्याच्या परिस्थितीत राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित सर्वोच्च स्थानी ठेवून सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गायीच्या दुधाकरिता दूध उत्पादकास प्रतिलिटर रुपये पाच इतके अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना राज्यातील फक्त सहकारी दूध उत्पादक संस्थांमार्फत राबवण्यात येईल, असे मंत्री श्री. विखे यांनी सांगितले.

## हिवाळी अधिवेशनातील कामकाज

हिवाळी अधिवेशनात विधानसभेत एकूण १० बैठका झाल्या. त्यात प्रत्यक्षात १०१ तास १० मिनिटे कामकाज झाले. वाया गेलेला वेळ निरंक होता, तर रोजचे सरासरी कामकाज १० तास ५ मिनिटे इतके झाले. या अधिवेशनात सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ही ९३.३३ टक्के इतकी होती, तर कमीत कमी उपस्थिती ६४.७१ टक्के इतकी होती. एकूण सरासरी उपस्थिती ही ८१.६९ टक्के इतकी होती. अधिवेशनात एकूण ७,५८१ तारांकित प्रश्न प्राप्त झाले. त्यातील २४७ स्वीकृत झाले, तर ३४ प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. अधिवेशनात दोन विषयांवर अल्पकालीन चर्चा झाली. एकूण २,४१४ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ३३७ स्वीकृत झाल्या, तर ७० लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली. नियम २९३ अन्वये प्रस्तावाच्या तीन सूचना प्राप्त झाल्या, त्यापैकी दोन प्रस्तावांवर चर्चा झाली.

या अधिवेशनात विधानसभेत १७ शासकीय विधेयके पुन:स्थापित, तर १७ संमत झाले. मागील अधिवेशन सत्रातील एक विधेयकही संमत झाले. नियम २९३ अन्वये तीन सूचनांवर चर्चा झाली. अशासकीय ठरावाच्या एकूण २६३ सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी १८७ सूचना मान्य करण्यात आल्या.

हिवाळी अधिवेशनात विधानसभेच्या कामकाजाची सुरुवात वंदे मातरम्ने झाली. प्रारंभी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शोकप्रस्ताव मांडल्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, तर राष्ट्रगीताने कामकाजाची सांगता झाली.

**शब्दांकन/संकलन : ब्रिजकिशोर झंवर, दीपक चव्हाण, निलेश तायडे, पवन राठोड.**

**विधानपरिषदेत नागरिकांच्या विविध प्रश्नांसह धोरणात्मक निर्णयांवर साधक बाधक चर्चा होते. २०२३चे हिवाळी विधिमंडळ अधिवेशन नुकतेच नागपुरात झाले. या अधिवेशनात अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. विधानपरिषदेतही या विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा झाली. मराठा आरक्षण, राज्यातील अवकाळी परिस्थिती अशा अनेक विषयांवर विधानपरिषदेत चर्चा झाली. विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली या अधिवेशनात विधानपरिषदेचे कामकाज सुरळीत झाले.**

# अनेक विषयांवर चर्चा

महाराष्ट्र विधिमंडळामध्ये दोन सभागृहे आहेत. विधानसभा हे लोकांमधून निवडून आलेल्या प्रतिनिधींचे सभागृह असून त्याला कनिष्ठ सभागृह मानले जाते. तर विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक यांचा समावेश असतो. वरिष्ठ सभागृहाची मंजुरी असल्याशिवाय कोणतेही विधेयक पारित होत नसते. त्यामुळे विधिमंडळाच्या कामकाजात विधानपरिषदेचे महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेने नुकताच शतकोत्तरी महोत्सव साजरा केला. यावरून संसदीय लोकशाहीमध्ये या सभागृहाचे महत्त्व लक्षात येते.

विधानपरिषदेची पहिली बैठक पुणे येथील कौन्सिल हॉल येथे २० जुलै १९३७ साली पार पडली. १९५५ पर्यंत परिषदेचे पावसाळी अधिवेशन पुणे येथे भरत होते. नंतर नागपूर करारानुसार १९६० पासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे भरू लागले. विधिमंडळाने अनेक पथदर्शी कायदे संमत केले. यामध्ये विधानपरिषदेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यामध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, महाराष्ट्र कॅपिटेशन फी अधिनियम, महाराष्ट्र जलसंधारण अधिनियम, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, महाराष्ट्र गलिच्छ वस्ती निर्मूलन अधिनियम यांसह विविध विषयांवरील अधिनियम विधिमंडळाने पारित केले आहेत.

विधिमंडळाचे २०२३ चे हिवाळी अधिवेशन यंदा ७ ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत पार पडले. विधानपरिषदेचे कामकाजही या काळात झाले. विधानपरिषदेत तारांकित व अतारांकित प्रश्न, अर्धा तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, लक्षवेधी सूचना, विधान परिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा, निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवरील नियम ९३ अन्वये प्रस्ताव, नियम १०१ अ अन्वये विशेष उल्लेख, नियम २६० अन्वये प्रस्ताव, नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव, शासकीय ठराव, वैधानिक प्रस्ताव, अशासकीय कामकाज, अशासकीय ठराव अशा विविध संसदीय आयुधांद्वारे विधानपरिषद सदस्यांनी नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न शासनाकडे मांडले. अनेक विषयांवर मंत्रिमहोदयांनी सूचना देऊन ते निकाली काढले, तर काही प्रश्नांवर विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी पुढाकार घेऊन शासनाला योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील विविध मंत्रिमहोदयांनी सदस्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर समयोचित उत्तरे देऊन ते प्रश्न मार्गी लावले.



### मराठा आरक्षण, अवकाळी पाऊस यांवर चर्चा

या अधिवेशनात विधानपरिषदेत मराठा आरक्षण व अवकाळी पाऊस या विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेऊन जनतेच्या भावना मांडल्या. राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देताना अन्य समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, याचा पुनरुच्चार करतानाच राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास फेब्रुवारी २०२४ मध्ये विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात केली. तसेच मराठा समाजाला आरक्षण देताना कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यात येईल. त्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, अशी नि:संदिग्ध ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी उत्तरात दिली.

### ७१ तास चालले कामकाज

विधिमंडळाच्या या हिवाळी अधिवेशनात विधानपरिषदेच्या कामकाजाचे यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वात कमी वेळ हा वाया गेला आहे. या अधिवेशनात खूप कमी वेळा कामकाज काही कारणांमुळे बंद पडले. त्यामुळे एकूण दहा दिवस चाललेल्या कामकाजामध्ये ७१ तास ९ मिनिटे इतका वेळ प्रत्यक्ष कामकाज झाले. म्हणजेच रोज सरासरी सात तास कामकाज सुरू होते. मागील हिवाळी अधिवेशनातही दहा दिवस चाललेल्या कामकाजात ५२ तास ३५ मिनिटे सभागृहाचे कामकाज चालले. तसेच या अधिवेशनात फक्त ५० मिनिटे कामकाजाचा वेळ वाया गेला. मागील हिवाळी अधिवेशनात हीच वेळ ५ तास १५ मिनिटे वाया गेली होती.

यंदाच्या अधिवेशनातील वैशिष्ट्य म्हणजे विधानपरिषदेच्या सभागृहात सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थितीत ९५.५५ टक्के इतकी होती, तर कमीत कमी ६० टक्के उपस्थिती होती. अधिवेशन कालावधीतील सदस्यांची उपस्थितीची सरासरी ८२.६६ टक्के होती. गेल्या हिवाळी अधिवेशनात हीच टक्केवारी ७७.१९ टक्के इतकी होती.

विधानपरिषदेत यंदा १८१९ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते. त्यापैकी ४५२ प्रश्न स्वीकृत करण्यात आले. त्यातील ४७ प्रश्नांवर उत्तरे देण्यात आली, तर ४ अतारांकित प्रश्न प्राप्त झाले होते. तसेच तारांकित प्रश्नांतून ३८० प्रश्न हे अतारांकित प्रश्न म्हणून गणले गेले. प्रश्नांच्या उत्तरातून २४ अर्धा तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यातील १४ स्वीकृत झाल्या. सर्वसाधारण अर्धा तास चर्चेसाठी ३७ सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यातील २५ प्रश्न स्वीकृत करण्यात आले व त्यातील ६ सूचनांवर अधिवेशनात चर्चा झाली.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये एकूण ७० सूचना प्राप्त झाल्या होत्या व त्यातील २० स्वीकारण्यात आल्या. त्यातील ७ सूचनांवर सभागृहात निवेदने देण्यात आली. या अधिवेशनात सभागृहाला ६२३ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यातून १४२ सूचना मान्य करण्यात आल्या व ३० सूचनांवर सभागृहात कामकाजादरम्यान चर्चा झाली.

विशेष उल्लेख या आयुधाद्वारे सभासदांनी १९९ सूचना दिल्या होत्या. त्यातील १३३ सूचना सभागृहात मांडण्यात आल्या अथवा पटलावर ठेवण्यात आल्या. तसेच ११५ औचित्याच्या मुद्यांपैकी ९१ मुद्दे हे पटलावर ठेवण्यात आले. विधानपरिषद नियम ९७ अन्वये एकूण २६ अल्पकालीन चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यातील २५ मान्य करण्यात येऊन ५ पेक्षा जास्त सूचनांवर सभागृहात चर्चा झाली.

या अधिवेशनात विधानसभेने पारित केलेली एकूण १४ विधेयके विधानपरिषदेतही पारित करण्यात आली. तसेच तीन धन विधेयके ही विधानसभेला शिफारशींशिवाय परत पाठवण्यात आली. विधानपरिषदेला या अधिवेशनात ४ अशासकीय विधेयके प्राप्त झाली होती, त्यातील एक स्वीकृत करण्यात आली. तसेच ८१ अशासकीय ठराव प्राप्त झाले होते. त्यातील ६५ ठराव स्वीकृत करण्यात आले.

यंदाच्या अधिवेशनात वरिष्ठ सभागृह असलेल्या विधानपरिषदेत तीन अध्यादेश पटलावर ठेवण्यात आले होते, तर विधानपरिषदेचे माजी उपाध्यक्ष, माजी मंत्री तथा विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते बबनराव दादाबा ढाकणे, माजी विधानपरिषद सदस्य किसनराव मक्काजी राठोड तसेच माजी सदस्या वीणा प्रेमकुमार शर्मा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून सभागृहाच्या भावना संबंधितांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या.

या अधिवेशन कालावधीत विधान परिषदेच्या नियमित कामकाजाव्यतिरिक्त सकाळी विशेष कामकाजही घेण्यात आले. या कामकाजालाही सदस्यांनी उपस्थित राहून विविध प्रश्नांवर चर्चा केली व शासनाचे लक्ष वेधले.

अधिवेशनात विधानपरिषदेत विविध प्रश्नोत्तरे, लक्षवेधी यांच्या माध्यमातून मराठवाड्यातील पाणी प्रश्न, शिक्षक भरती, गणेश मूर्तिकारांचा प्रश्न, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न, विदर्भातील विविध प्रश्न, पोलीस भरती, शासकीय नोकर भरती, शासकीय रुग्णालयातील औषधसाठा, नागपूरमध्ये एसआरए योजना राबवणे, पीक विमा, पर्यटन, दिव्यांगांना नोकरी, शैक्षणिक संस्थांना अनुदान, शेतकरी कर्जमाफी, अशा विविध प्रश्नांवर साधक-बाधक चर्चा झाली. त्यातील अनेक प्रश्नांवर संबंधित मंत्रिमहोदयांनी शासनाच्या वतीने माहिती दिली व अनेक प्रश्नांवर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार असल्याचे घोषित केले.

अपघातग्रस्त रुग्णांना त्वरित उच्च दर्जाचे उपचार आणि वैद्यकीय सेवा मिळावी याकरिता राज्यात आवश्यक त्या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर्स उभारणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी विधानपरिषदेत दिली. शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री रोखण्यासाठी भरारी पथके उभारणार असल्याची माहिती मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी विधानपरिषदेत दिली, तर शासकीय

कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतीत सरकार सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत अल्पकालीन चर्चेदरम्यान सांगितले.

## लोकायुक्त विधेयकाला मंजुरी

गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनात विधानसभेत मंजूर झालेले लोकायुक्त विधेयक वरिष्ठ सभागृह असलेल्या विधानपरिषदेच्या मान्यतेसाठी प्रलंबित होते. या अधिवेशनात हे विधेयक विधानपरिषदेत मंजूर करण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे यामध्ये भ्रष्टाचारविरोधी कायद्याचा समावेश आहे. याशिवाय महाराष्ट्र वस्तू व सेवा कर, चिटफंड सुधारणा, महाराष्ट्र कॅसिनो निरसन करणे अशी काही विधेयकेदेखील मंजूर झाली.

## पीकविमा, दुष्काळ, अतिवृष्टीवर चर्चा

विधानपरिषदेच्या कामकाजामध्ये प्रश्नोत्तरे व लक्षवेधीच्या माध्यमातून सदस्यांनी राज्यातील अतिवृष्टी, दुष्काळ व पीकविमा संदर्भातील शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या विषयांवर राज्य शासनाचे लक्ष वेधले. या चर्चेत विधानपरिषदेतील सर्वच पक्षांच्या गटनेत्यांनी व सदस्यांनी सहभाग घेतला. या चर्चेला कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर दिले. राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामात पावसाचा खंड यासह विविध नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले, त्याबाबत प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत २४ जिल्ह्यांतील सुमारे ५२ लाख शेतकऱ्यांना सुमारे २,२१६ कोटी रुपये इतका अग्रीम पीकविमा २५% प्रमाणे मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी १,६९० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. सुमारे ६३४ कोटी रुपयांचे वितरण वेगाने सुरू असल्याचे श्री. मुंडे यांनी सभागृहात सांगितले.

## शतक महोत्सवानिमित्त चर्चासत्र

नागपूरमधील हिवाळी अधिवेशन कालावधीत ८ डिसेंबर रोजी सकाळी महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे योगदान' या विषयावर चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राजेंद्र गवई यांच्यासह विधानपरिषद सदस्य, ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते. यावेळी नागपूरमधील ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

या अधिवेशनाच्या माध्यमातून जनतेला न्याय देण्याचे, त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम करायचे आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून राज्याच्या विकासाची बेरीज करू या. विदर्भातील जनतेला या अधिवेशनाकडून अनेक अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी सर्वांनी काम करू या. सर्वांनीच हे अधिवेशन गांभीर्याने घ्यावे. या अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भातील सर्वसामान्यांना न्याय मिळावा, ही आमची भावना आहे. विदर्भाला जोडणारे माध्यम हीच या अधिवेशनाची मोठी उपलब्धता असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या चर्चासत्राच्या उद्घाटनसमारंभातील भाषणात सांगितले.

राज्याला महर्षी कर्वे, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची समाजप्रबोधनाची मोठी परंपरा लाभलेली आहे. त्यांच्या योगदानामुळेच राज्यात शिक्षण चळवळ यशस्वी झाली आहे. समाजप्रबोधनाची ही परंपरा जपण्याचे काम विधानपरिषदेच्या माध्यमातून होत आहे. विधानपरिषदेच्या आजपर्यंतच्या वाटचालीविषयी लवकरच पुस्तकही प्रकाशित करण्यात येणार असल्याचे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले. विधानपरिषदेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला.

## पुरवणी मागण्यांवर चर्चा

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सादर केलेल्या ५५ हजार ५२० कोटी ७७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानपरिषदेतही मंजूर करण्यात आल्या. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांची निर्मिती, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची संधी पोहोचवण्यात येणार आहे. केंद्राच्या योजनांच्या मॅचिंग ग्रॅन्टचाही पुरवणी मागण्यांमध्ये समावेश असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तरात सांगितले. पुरवणी मागण्यांमुळे वाढलेली महसुली व राजकोषीय तूट वर्षअखेरीस उत्पन्नाचे स्रोत वाढवून आणि प्रत्यक्ष खर्चावर नियंत्रण ठेवून कमी करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या चर्चेत सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांनी सहभाग घेऊन सूचना केल्या. कोकण क्षेत्र नियोजन विकास प्राधिकरण स्थापन करून बीज भांडवल म्हणून ५०० कोटी रुपयांचा निधी टप्प्याटप्प्याने देणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी सभागृहात सांगितले. पुरवणी मागण्यांमध्ये आवश्यक निधीचा समावेश असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## राष्ट्रकुल संसदीय वर्गाचा सुवर्णमहोत्सवी अभ्यासवर्ग

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दरवर्षी राष्ट्रकुल संसदीय अभ्यासवर्ग पार पाडत असतो. यामध्ये राज्यातील विविध विद्यापीठांतील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयाचे विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होतात. यंदाही या अभ्यासवर्गाचा सुवर्णमहोत्सव होता. या अभ्यासवर्गात विविध विषयांवर विधिमंडळाचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यासह संसदीय कार्यमंत्री; तसेच विविध विभागाचे मंत्री, विरोधी पक्षनेते, विधिमंडळ सदस्य; तसेच विधिमंडळाचे अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

**– नंदकुमार वाघमारे,**
माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे.

# विधेयकांची यादी

**हिवाळी अधिवेशन २०२३ : विधेयकांची यादी - पूर्वीची प्रलंबित विधेयके : १०, नवीन पुनर्स्थापित : १७, एकूण : २७, दोन्ही सभागृहात संमत : १८, संयुक्त समितीकडे प्रलंबित : ०६, मागे घेण्यात आलेली विधेयके : ०३, एकूण : २७.**

## दोन्ही सभागृहांत संमत विधेयक

- सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक. ४८ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३. (वित्त विभाग) (कॅसिनो, घोड्यांची शर्यत व ऑनलाइन खेळ यांच्या करपात्रतेच्या संबंधात स्पष्टता आणण्याकरिता)
- सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक.४९ - चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३. (वित्त विभाग)
- सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक.४५ - महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३. (गृह विभाग) (महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ याचे निरसन करण्यासाठी) (गृह विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ५१ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ (वित्त विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४७ - महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३. (गृहनिर्माण विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)
- सन २०२२ चे वि.स.वि.क्र.३६ - महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ (सामान्य प्रशासन विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ (महसूल व वन विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.५४ - महाराष्ट्र स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठ विधेयक, २०२३ (उच्च व तंत्रशिक्षण)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ५६ - जी.एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, विधेयक २०२३ (कौशल्य विकास व उद्योजकता)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.५७ - जी.एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, विधेयक, २०२३ (कौशल्य विकास व उद्योजकता).
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) (विद्यापीठाचे कुलगुरू नियुक्ती करण्याच्या पात्रता निकषांची व निवड समिती गठित करण्याची तरतूद विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमांशी अनुरूप करण्याकरिता तरतूद) (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ५० - महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ (कृषी व प.दु.म विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.५८ - महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ विधेयक, २०२३ (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.५९ - महाराष्ट्र ललित कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३ (उच्च व तंत्रशिक्षण)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.६० - महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र ६२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३. (लॉकिंग पिरेड कमी करणे) (गृहनिर्माण विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ६१ - युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई, विधेयक २०२३. (कौशल्य विकास व उद्योजकता)

## संयुक्त समितीकडे प्रलंबित

- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.३४ - महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) व महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा ) विधेयक, २०२३ (उद्योग उर्जा व कामगार विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र ४० - महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैर छापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३.
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४१ - कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३.
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४२- बी-बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३.
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४३- अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.४४.- महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३.

## मागे घेण्यात आलेली विधेयके

- सन २०२३ चे वि.स.वि.क्र.१८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ (सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग)
- सन २०२२ चे वि.स.वि.क्र.३७ - स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)
- सन २०२३ चे वि.स.वि.क्र २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३. (लॉकिंग पिरेड कमी करणे) (गृहनिर्माण विभाग)

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबवण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून ५ डिसेंबर २०२३ रोजी राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे. १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ या ४५ दिवसांच्या कालावधीसाठी हे अभियान सुरू राहणार आहे.**

# माझी शाळा, सुंदर शाळा

**ब्रिजकिशोर झंवर**

राज्यात २०२०-२१ पासून शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' ही पूर्णतः राज्य पुरस्कृत योजना राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ आणि प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे निश्चित करण्यात आली असून सद्य:स्थितीत ४७८ शाळांचा समावेश असलेल्या या योजनेचा पहिला टप्पा कार्यान्वित आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत सध्या केवळ भौतिक सुविधांचे निर्माण या घटकांतर्गत लहान बांधकामे व मोठी बांधकामे याच बाबींकडे लक्ष देण्यात आले असून, त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अभियानाचा अधिक प्रभावी विस्तार होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन / अध्यापन / प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख, अंगभूत कला-क्रीडा गुणांचा विकास आदी अनेक घटकांचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे. अशा महत्त्वपूर्ण घटकांना योग्य त्या प्रमाणात प्राधान्य दिल्यास शाळेचा सर्वांगीण विकास निश्चितपणे होऊ शकतो, असे शासनाचे मत आहे.

या घटकांची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या व्हावी, यासाठी शाळांनी आपापसात स्पर्धा करणे हा त्यासाठीचा सर्वोत्तम उपाय आहे. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबवण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून ५ डिसेंबर रोजी राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे. १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ या ४५ दिवसांच्या कालावधीसाठी हे अभियान सुरू राहणार आहे.




## अभियानाची व्याप्ती

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांनी या अभियानात सहभागी होणे अपेक्षित आहे, यासाठी शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा; तसेच उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारी करण्यात आल्या आहेत, तर बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा, वर्ग 'अ' आणि वर्ग 'ब'च्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा; तसेच उर्वरित महाराष्ट्र कार्यक्षेत्रातील शाळा अशा तीन स्तरांवर हे अभियान राबवण्यात येणार आहे.

## अभियानाची उद्दिष्टे

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्याबरोबरच अध्ययन, अध्यापन व प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर शिक्षणासाठी पर्यावरणपूरक व आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे; क्रीडा, आरोग्य, वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणे; राज्यातून कचऱ्याबाबतच्या निष्काळजीपणाची सवय मोडून काढणे; राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मता याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे; विशिष्ट कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे; त्यांच्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन देऊन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणे; तसेच शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक

यांच्यात शाळेविषयी कृतज्ञतेची आणि उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत.

## अभियानाचे स्वरूप

अभियानात सहभागी होऊन एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या शाळांना गुणांकन देण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे आयोजन आणि त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग यासाठी ६० गुण, तर शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम आणि त्यातील विविध घटकांचा सहभाग यासाठी ४० गुण देण्यात येतील.

यामध्ये विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या आयोजनामध्ये शाळा व परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी १० गुण, विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमातील, व्यवस्थापनातील व निर्णयप्रक्रियेतील सहभागासाठी १५ गुण, शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रमांसाठी १० गुण, शाळेची इमारत व परिसराच्या स्वच्छतेसाठी १० गुण, राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबतच्या उपक्रमांसाठी पाच गुण, तर विविध क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी (देशी खेळांना प्राधान्य) १० गुण देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम आणि त्यातील विविध घटकांच्या सहभागामध्ये आरोग्यासाठी १५ गुण, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकासासाठी १० गुण, भौतिक सुविधा; तसेच अध्यापन, अध्ययनाशी संबंधित प्रयत्नांसाठी पाच गुण, तंबाखूमुक्त, प्लास्टिकमुक्त शाळेसाठी आणि पोषण आहारातील शिल्लक अन्नावर योग्य प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्यासाठी पाच गुण; तसेच माजी विद्यार्थी, पालक, स्थानिक सेवाभावी संस्था इत्यादींच्या सहभागासाठी पाच गुण यांचा समावेश असेल.

अभियानात सहभागी शाळांच्या वर्गवारी आणि स्तरनिहाय कामगिरीच्या आधारे मूल्यांकनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

## पारितोषिके

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तसेच वर्ग 'अ' आणि वर्ग 'ब'च्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दोन्ही वर्गवारीतील शाळांना प्रथम क्रमांकासाठी प्रत्येकी २१ लाख रुपये, दुसऱ्या क्रमांकासाठी ११ लाख रुपये, तर तिसऱ्या क्रमांकासाठी सात लाख रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रातील शाळांसाठी दोन्ही वर्गवारीतील तालुकास्तरावर प्रथम क्रमांकासाठी तीन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दोन लाख रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी एक लाख रुपये; जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी ११ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी पाच लाख रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी तीन लाख रुपये; तसेच विभाग स्तरावरील (आठ विभाग) प्रथम क्रमांकासाठी २१ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११ लाख रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी सात लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

> विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन विविध योजना आणि उपक्रम राबवत आहे. विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी; तसेच शैक्षणिक गुणवत्ता विकसित होण्यासाठी शाळेत आनंददायी वातावरण निर्माण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील अंगभूत गुणांना प्रोत्साहन दिले जात आहे. याच अनुषंगाने स्पर्धात्मक आणि प्रेरणादायी वातावरणातून विद्यार्थ्यांबरोबरच शाळेचाही विकास व्हावा, या उद्देशाने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियान सुरू करण्यात आले आहे.
>
> **- दीपक केसरकर**
>
> **मंत्री, शालेय शिक्षण आणि मराठी भाषा विभाग.**

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रथम क्रमांकाची शाळा, 'अ' व 'ब' वर्ग महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रथम क्रमांकाची शाळा; तसेच उर्वरित महाराष्ट्रातील प्रत्येक विभागातील प्रथम क्रमांकाच्या शाळा या राज्यस्तरावर एकमेकांशी स्पर्धा करतील. या स्पर्धेतून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी दोन्ही वर्गवारीकरिता स्वतंत्रपणे राज्यस्तरीय विजेता निवडण्यात येईल.

त्यामध्ये प्रथम क्रमांकासाठी प्रत्येकी ५१ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१ लाख रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ११ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. पारितोषिकांची ही एकूण रक्कम ६६.१० कोटी इतकी असणार आहे. कोणत्याही स्तरावर जिंकलेल्या पारितोषिकांच्या रकमेचा विनियोग करण्याचा अधिकार शाळांच्या गरजांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन संबंधित शाळेच्या व्यवस्थापन समितीचा असेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शालेय शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती गठित करण्यात आली आहे.

## विविध नावीन्यपूर्ण उपक्रम

मागील दीड वर्षाच्या कालावधीत शालेय शिक्षण विभागाने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांच्या पानांचा समावेश, या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करणे, पुढील वर्षापासून राज्यात मोफत गणवेश आणि बूट व पायमोजे, पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ, पोषण शक्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या आहारात अंड्यांचा समावेश, युरोपियन देशांना कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी कृती गटाची स्थापना, शाळेत आजी आजोबा दिवस साजरा करणे, स्वच्छता मॉनिटर, वाचन महोत्सव, माझी शाळा माझी परसबाग, दत्तक शाळा योजना, त्रुटीपूर्तता झालेल्या शाळांना अनुदान, अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन, शाळांची पुनर्बांधणी, ऐतिहासिक गावांतील शाळा विकसित करणे आदींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. याचबरोबर आदर्श शाळा निर्माण करणे, पीएम श्री योजना, नवभारत साक्षरता कार्यक्रम आदींची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

एकंदरीतच राज्य शासन विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांच्या दर्जेदार शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशीलतेमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीमध्ये अनेक विविध आजारांचा समावेशदेखील करण्यात आला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीच्या लाभार्थीसाठी मोबाइल ॲप तथा व्हॉट्सॲप हेल्पलाइनचा शुभारंभ करण्यात आला आहे. रुग्णांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी संपर्क साधण्यासाठी ८६५०५६७५६७ ही हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. यामुळे रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी वरदान ठरत आहे.**

# मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी **रुग्णांसाठी वरदान !**

**डॉ. शार्दुल भणगे**

महाराष्ट्र शासनाने सुरुवातीपासून महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेवर आपले लक्ष केंद्रित केले होते; परंतु यामध्ये सुरुवातीला केवळ ९६ आजारांवरील उपचार होत असत. काही वेळा अनेक गंभीर किंवा दुर्धर आजारांवरील महागड्या शस्त्रक्रिया महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या निकषात बसत नसत किंवा त्यातून मिळणारी रक्कम ही त्या उपचाराचा अवाजवी खर्च न भागवणारी होती. म्हणूनच या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आधिपत्याखाली असा एक स्वतंत्र कक्ष असावा, ज्या कक्षाच्या माध्यमातून या गंभीर किंवा दुर्धर आजारांवरील उपचारासाठी आर्थिक साहाय्य केले जाईल, अशी संकल्पना रुग्णसेवक मंगेश चिवटे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडली, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. मार्च २०१५ मध्ये श्री. फडणवीस यांनी हा स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचे आदेश दिले.

२०१५ ते २०१९ या कालावधीत कक्षाने उत्तम कामगिरी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्ष पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कक्षाची जबाबदारी रुग्णसेवक मंगेश चिवटे यांच्यावर सोपवण्यात आली. कक्षाचे कामकाजदेखील तत्काळ सुरू झाले. स्वतंत्र कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, पारदर्शकता येण्यासाठी रुग्णालयांच्या नोंदणी, अर्ज छाननी प्रक्रिया, सर्वसामान्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्यात आली, आजारांची संख्या वाढवण्यात आली, सोबतच मिळणाऱ्या मुख्यमंत्री साहाय्यता निधीची रक्कमदेखील प्रत्येक आजारांवरील उपचारासाठी ठरवून देण्यात आली. तसेच त्या रकमेमध्ये वाढदेखील करण्यात आली हे बदल करण्यात आले. प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी ८६५०५६७५६७ हा टोल-फ्री क्रमांक देण्यात आला.



या क्रमांकावर कॉल केल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी मिळवण्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली जाते. यानंतर उपरोक्त भ्रमणध्वनीवर मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीचा अर्ज प्राप्त होणारी लिंक संदेशाद्वारे पाठवली जाते. यासोबतच ८६५०५६७५६७ हा क्रमांक व्हॉट्सॲप हेल्पलाइनसाठीदेखील निर्धारित करण्यात आला आहे. या क्रमांकाच्या व्हॉट्सॲपवर 'Hi' असा संदेश पाठवला असता पहिल्यांदा मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांचा पर्याय आपणास सुचवला जातो. यापैकी कोणतीही एक भाषा निवडणे आपल्याला बंधनकारक असते. भाषानिवडीनंतर अर्जाची स्थिती, आजारांबाबत तपशील आणि नोंदणीकृत रुग्णालये असे तीन पर्याय येतात. यापैकी आपल्याला मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीबाबत जी समस्या असेल, त्यासंदर्भाने आपण या व्हॉट्सॲप हेल्पलाइनवर विचारणा करू शकता. आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रक्रिया आणखी सुलभ करण्यात आली आहे. यासाठी एक ॲप लॉन्च करण्यात आले असून प्रक्रिया गतिमान करण्यासाठी याचा उपयोग होणे अपेक्षित आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी या कक्षातून १ वर्ष ६ महिन्यांच्या कालावधीत २१,९४८ रुग्णांना ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत १८० कोटी रुपयांपेक्षा अधिक अर्थसाहाय्य करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारताच

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी त्यांना दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जुलै २०२२ मध्ये १७८ रुग्णांना ७६ लाख, ऑगस्ट २०२२ मध्ये ३१६ रुग्णांना १ कोटी ४६ लाख, सप्टेंबर २०२२ मध्ये ३८८ रुग्णांना २ कोटी २७ लाख, ऑक्टोबर २०२२ मध्ये ३३५ रुग्णांना २ कोटी ७७ लाख, नोव्हेंबर २०२२ मध्ये ५९४ रुग्णांना ५ कोटी ५२ हजार, डिसेंबर २०२२ मध्ये १,१६५ रुग्णांना ९ कोटी ४९ लाख, जानेवारी २०२३ मध्ये १,१०६ रुग्णांना ९ कोटी ४७ लाख, फेब्रुवारी २०२३ मध्ये १,३७१ रुग्णांना ११ कोटी २१ लाख, मार्च २०२३ मध्ये १,६१२ रुग्णांना १२ कोटी ९२ लाख, एप्रिल २०२३ मध्ये १,२६९ रुग्णांना १० कोटी ४९ लाख, मे २०२३ मध्ये १,४६४ रुग्णांना १२ कोटी २९ लाख, जून २०२३ मध्ये विक्रमी १,८६७ रुग्णांना १५ कोटी ७१ लाख, जुलै २०२३ मध्ये १,६३२ रुग्णांना १३ कोटी ८६ लाख, ऑगस्ट २०२३ मध्ये १,७४८ रुग्णांना १४ कोटी ६३ लाख, सप्टेंबर २०२३ मध्ये १,५८७ रुग्णांना १३ कोटी २३ लाख, ऑक्टोबर २०२३ मध्ये १,८५४ रुग्णांना १५ कोटी ४६ लाख, नोव्हेंबर २०२३ मध्ये १,६७१ रुग्णांना १४ कोटी ८५ हजार, डिसेंबर २०२३ मध्ये १,७९१ रुग्णांना १५ कोटी ३५ लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

## विविध उपचारांसाठी निधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीमध्ये विविध आजारांचा समावेशदेखील करण्यात आला आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलियर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे.

## मोबाइल ॲप तथा व्हॉट्सॲप हेल्पलाइन

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीच्या लाभार्थींसाठी मोबाइल ॲप तथा व्हॉट्सॲप हेल्पलाइनचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला आहे. रुग्णांनी तसेच त्यांच्या नातेवाईकांनी संपर्क साधण्यासाठी ८६५०५६७५६७ ही हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्षाने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत आतापर्यंत गोरगरीब, गरजू रुग्णांना एकूण १५० कोटींपेक्षा अधिक रुपयांच्यावर आर्थिक मदत वितरित केली आहे. आता मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी मिळवणे आणखी सोपे झाले असून, यासाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासणार नाही. सीएमएमआरएफ या ॲप्लिकेशनवर अर्ज भरून मदत मिळवता येणार आहे.

## नवे आयुष्य मिळाल्याची भावना

'साहेब, तुमच्यामुळे मला नवे आयुष्य मिळाले,' अशा शब्दात नाशिकच्या धर्मा सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ आपली भावना व्यक्त केली. श्री. सोनवणे यांच्याप्रमाणेच मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्षामार्फत वैद्यकीय साहाय्यता मिळालेल्या राज्यातील अनेक रुग्णांची अशीच प्रतिक्रिया असणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांचे प्राण वाचवण्यात यश मिळवले आहे. यामुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळाले आहे. गोरगरीब गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षातून अर्थसाहाय्य केले जाते. या निधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले आहे.

(लेखक दै.दिव्य लोकप्रभा येथे उपसंपादक आहेत.)

## रुग्णांना मदतीचा हात




मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना ठरत आहे. गोरगरीब-गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षातून थेट अर्थसाहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचत आहेत. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**शिक्षण घेतल्यानंतर नेमक्या कोणत्या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील, पालकांना आपल्या पाल्याचा कोणत्या शाखेकडे कल आहे हे कळावे, यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून मुंबईमधील ३०० शाळा आणि महाविद्यालयांतील ६० हजार विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभाग शालेय शिक्षण विभाग, शिक्षण संचालनालय आणि मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जाणार आहे. टप्प्याटप्प्याने हा उपक्रम राज्यभर कशा प्रकारे राबवता येईल, याचाही अभ्यास केला जाणार आहे.**

# करिअर मार्गदर्शनाची व्याप्ती

**संध्या गरवारे**

कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबवणे यासाठी शासन प्राधान्य देत असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्किल इंडियाच्या धर्तीवर राज्यात विविध उपक्रम सुरू करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवक व युवतींना अधिकाधिक चांगले प्रशिक्षण घेतल्यानंतर रोजगार प्राप्त व्हावा, यासाठी कौशल्य विकासाचे विविध उपक्रम राज्यभर राबवण्यात येत आहेत.

विभागामार्फत रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना आर्थिक साहाय्य योजना, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण, करिअरविषयक



साहित्य, डिजिटल अभ्यासिका व वेबसाईट विकास योजना, मॉडेल करिअर सेंटर, आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध संस्थांशी सामंजस्य करार, आंतरराष्ट्रीय रोजगार केंद्राच्या माध्यमातून परदेशात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे, आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार नोंदणी, प्रशिक्षण व मार्गदर्शन, राज्यातील इच्छुक उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी रोजगार मेळावे आयोजित केले जात आहेत.

राज्यात ४१८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. यामध्ये दीड लाख विद्यार्थी प्रशिक्षण घेतात. या संस्थांच्या बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे. राज्यातील ३५० तालुक्यांमध्ये ५०० प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र लवकरच नवीन स्टार्टअप धोरण जाहीर करणार आहे, ज्यामध्ये नावीन्यपूर्ण परिसंस्थेला सशक्त बनवणे, नवकल्पनांच्या विविध टप्प्यांना मदत करण्यासाठी आराखडा तयार करणे, स्टार्टअप्सला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षितिज देणे यावर लक्ष केंद्रित करत आहे. सन २०२२-२३ मध्ये २ लाख ८२ हजार, तर सन २०२३-२४ मध्ये नोव्हेंबर २०२३ पर्यंत १ लाख ७५ हजार तरुणांना रोजगार मिळाला आहे. आगामी कालावधीतही रोजगारात वाढ करून जास्तीत जास्त युवक-युवतींना कौशल्य विकसित करून रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. विविध संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारामुळे सहा लाखांपेक्षा अधिक रोजगार उपलब्ध होणार आहेत.

## रोजगार मेळाव्यांच्या संख्येत वाढ

कौशल्य विकास विभागामार्फत जिल्हा व विभागस्तरावर घेतले जाणारे रोजगार मेळावे अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी या मेळाव्यांची तरतूद वाढवण्यात आली असून जिल्हा व विभागीय स्तरावरील रोजगार मेळावे, यासाठीची एक लाख रुपये प्रति रोजगार मेळाव्यावरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. सन २०२२ पूर्वी, दरवर्षी सुमारे २०० रोजगार मेळावे आयोजित केले जात होते. बेरोजगार उमेदवारांना अधिक नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासाठी २०२२-२३ या आर्थिक वर्षात ६०० रोजगार मेळावे आयोजित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात ५५७ रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले

देशाचा विकास गतीने होण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात अनुभवी, कार्यक्षम, सर्जनशील कुशल मनुष्यबळाची अत्यंत आवश्यता आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग; तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे. रोजगाराच्या संधीचे बदलते स्वरूप पाहता ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांना माहिती व मार्गदर्शन वेळेत मिळावे आणि शिक्षण प्राप्त केल्यानंतर तात्काळ रोजगार मिळावा, यासाठी रोजगार मेळावेदेखील मोठ्या प्रमाणात घेण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे.

**- मंगल प्रभात लोढा,**
**मंत्री, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग**

असून, विविध नोकऱ्यांसाठी ५५ हजार ९३० उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात (नोव्हेंबर २०२३ पर्यंत) ३७८ रोजगार मेळावे घेण्यात आले. त्यामध्ये ऑफलाइन २२६ व १५२ ऑनलाइन रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून, विविध नोकऱ्यांसाठी २२,४६४ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

## नामांकित संस्थांबरोबर सामंजस्य करार

रोजगार मेळाव्यांद्वारे अधिक नोकऱ्या उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रभावीपणे आयोजन करण्यासाठी १ हजार १७५ नामांकित उद्योजक, औद्योगिक संघटना व प्लेसमेंट एजन्सीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारांद्वारे सुमारे ६ लाख ८६ हजार बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या एमओयु भागीदारांद्वारे रोजगार मेळ्यांमध्ये (सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षांमध्ये नोव्हेंबर २०२३ पर्यंत) ६८ हजार ८८१ रिक्त पदांमधील ४ हजार ४५२ उमेदवारांना नोकरी मिळाली आहे.

सन २०२३-२४ चालू आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र सरकारने कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगार मेळाव्याद्वारे राज्यातील ३ लाख बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. सन २०२२-२३ मध्ये २ लाख ८२ हजार व सन २०२३-२४ (नोव्हेंबर २०२३ पर्यंत) १ लाख ७५ हजार तरुणांना रोजगार मिळालेला आहे. कौशल्य विकास विभागामार्फत ९ व १० डिसेंबर २०२३ रोजी नागपूर विद्यापीठात राज्यस्तरीय महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या रोजगार मेळाव्यात एकूण ३४० प्रतिष्ठित नियोक्ते आणि कंपनी सहभागी झाले होते. या मेळाव्यात बँकिंग, लॉजिस्टिक, सेल्स मार्केटिंग, इन्शुरन्स, मॅन्युफॅक्चरिंग, हॉस्पिटॅलिटी, कम्युनिकेशन, आटीईएस, अपारंपरिक ऊर्जा, आरोग्यसेवा इत्यादी विविध क्षेत्रातील बेरोजगार तरुणांना ५० हजारांहून अधिक नोकऱ्या उपलब्ध केल्या होत्या. या रोजगार मेळाव्यात २७,७०५ उमेदवारांनी उपस्थित होते. या रोजगार मेळाव्यातून ८,७९८ उमेदवारांची प्राथमिक निवड व ३,८८७ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. या नमो महारोजगार मेळाव्यात नामांकित उद्योजकांनी सहभाग घेतला होता.

## नावीन्यपूर्ण संकल्पनांची माहिती

नागपूर येथील रोजगार मेळाव्यात रोजगाराच्या संधीसोबतच युवक युवतींना नावीन्यपूर्ण संकल्पनांची ओळख व्हावी, यासाठी स्टार्टअप एक्सपोचे आयोजन केले होते. यामध्ये ५० पेक्षा अधिक स्टार्टअप सहभागी झाले होते. त्याद्वारे राज्यातील यशस्वी युवा उद्योजकांची ओळख आणि त्यांनी नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून निर्माण केलेल्या व्यवसायाची माहिती देण्यात आली. स्टार्टअप म्हणजे काय? ते यशस्वी उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शनसुद्धा करण्यात आले. स्टार्टअप सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सोयी सुविधा, इनोव्हेटर्सच्या सगळ्या शंकांचेही निरसनही या मेळाव्यात करण्यात आले. या एक्स्पोमध्ये स्टार्टअप्स साठी इनक्युबेटर, गुंतवणूकदार, ग्राहक, शासनासोबत काम करण्याची संधी, इनक्युबेटर्स साठी महत्त्वाकांक्षी नवउद्योजक, स्टार्टअप्स, इतर इनक्युबेटरकडून प्रशिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

गुंतवणूकदारांना स्टार्टअपसोबत जोडणे, इनोव्हेटर्ससाठी स्टार्टअप योजना, शासकीय लाभ, यशस्वी स्टार्टअप, इनक्युबेटर इत्यादींबद्दल माहिती या एक्स्पोद्वारे देण्यात आली. उपस्थित उमेदवारांना शासनाच्या विविध विभाग व महामंडळांमार्फत राबवण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार योजनांची माहितीसुद्धा उपलब्ध करून देण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित झालेल्या उमेदवारांना राज्यातील शासनाच्या सर्व विभागांची स्वयंरोजगार योजनांची माहिती व्हावी, यासाठी योजनादर्शिका या पुस्तिकेचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये रोजगाराच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली आहे.

## मॉडेल केंद्रे स्थापन

किमान कौशल्य विकास कार्यक्रम, आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांत या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत विविध व्यावसायिकांमध्ये नोकरीवर असलेल्या प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांचे कौशल्य आणि योग्यता वाढवून नियमित रोजगार उपलब्ध करून देणे. राज्यात केंद्र शासन पुरस्कृत मॉडेल करिअर केंद्र स्थापन करण्यात आले असून या प्रकल्पामध्ये रोजगाराशी संबधित सेवांचे आधुनिकीकरण करण्यासाठी मॉडेल केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत.

याअंतर्गत १ लाख ४४ हजार हून अधिक युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येत आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी आंतरराष्ट्रीय रोजगार सुविधा केंद्राच्या माध्यमातूनही परदेशात नोकरी मिळवण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत मार्गदर्शन करण्यात येत आहे. फक्त शिक्षण घेऊन नोकरी नाही आणि नोकरी नाही म्हणून अनुभव नाही हे देखील दुष्टचक्र कमी व्हावे, यासाठी रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना सन १९७३-७४ पासून राबवण्यात येत आहे.

वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे आणि त्यांना रोजगार उपलब्ध व्हावे, यासाठी शासन विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत. रोजगाराभिमुख शिक्षण देऊन रोजगार मेळावे भरवून प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत सेवायोजना कार्यालय संघटना, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार नोंदणी, योजना व धोरण, मनुष्यबळ नियोजन, रोजगाराच्या विशेष योजनांची अंमलबजावणी, शासनाच्या सर्व विभागातील विविध योजनांचे संनियंत्रण, समन्वयाचे काम करण्यात येत आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**अपघातांच्या वाढत्या प्रमाणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासन विविध प्रयत्न करत आहे. वेगवेगळ्या उपाययोजनांमधून रस्ता सुरक्षाविषयी जनसहभाग वाढवण्यात येत आहे. रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण बघता या काळात ‘रस्ता सुरक्षा’ ही काळाची गरज बनली आहे. वाहनांची वाढती संख्या, कमी वयात वाहन चालवण्याचे वाढते प्रमाण आदींमुळे अपघातही वाढत आहेत. अशा परिस्थितीत वाहतूक नियमांचे धडे लहान वयापासूनच द्यायला पाहिजे. शालेय अभ्यासक्रमांमध्ये रस्ता सुरक्षा विषय शिकवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू झाले आहेत.**

# रस्ता सुरक्षा, जीवन रक्षा!

**निलेश तायडे**

केवळ चालताना डाव्या बाजूने चला, असे सांगून आता जमणार नाही, तर सिग्नलचा रंग, कुठला रंग काय सांगतो, रस्ता ओलांडताना व वाहन चालवताना घ्यावयाची काळजी, वाहतुकीचे फलक, बोधचिन्हांचा अर्थ आदी उद्‌बोधनही करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाची आयुष्याची ‘रस्ता सुरक्षा, जीवन रक्षा’ ही ‘टॅगलाइन’ असणे गरजेचे आहे.

### वाहतुकीच्या नियमांची जनजागृती

रस्ता सुरक्षा मोहीम दरवर्षी मार्च महिन्यात राबवण्यात येते. मात्र रस्ता सुरक्षा ही शासनाचीच जबाबदारी नसून यामध्ये जनसहभागही तेवढाच महत्त्वाचा आहे. रस्ता सुरक्षा ही केवळ काही दिवसांपुरती राबवण्याची मोहीम नाही. तर ती एक लोकचळवळ व्हायला पाहिजे. या विषयावर मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक आहे. रस्ता अपघात केवळ शहरांमध्ये नाही, तर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. कोविड काळात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद होती, नंतरच्या काळात काही प्रमाणात सुरू झाली. अशा वेळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक वाहने खरेदी केली. प्रत्येकाने स्वत: वाहन खरेदीकडे कल वाढवला. परिणामी, वाहनांची संख्या वाढून अपघातांची संख्याही वाढली आहे. अपघात न होण्यासाठी वाहतुकीच्या नियमांची जनजागृती करून अपघात कमी करता येणे शक्य आहे.

### ३६ ‘फेसलेस’ सेवांचा लाभ

रस्ता सुरक्षेसाठी सर्वच परिवहन कार्यालयात वाहन चालकांच्या चाचणीसाठी कॅमेरा बेस्ड अत्याधुनिक वाहन चालक चाचणी पथांची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच क्षमतेपेक्षा जास्त जादाभार वाहून नेणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी ‘पोर्टेबल वे ब्रिजेस’ची उभारणी करण्यात येत आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून अपघात कमी करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. राज्यात १७ ठिकाणी स्वयंचलित वाहन परवाना तपासणी मार्ग, २३ ठिकाणी स्वयंचलित वाहन योग्यता प्रमाणपत्र केंद्र उभारण्यात



येणार आहे. वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्राची मुदत संपण्यापूर्वी वाहन चालकाला पूर्वकल्पना देण्याबाबत यंत्रणाही उभारण्यात येणार आहे. जेणेकरून वाहन चालकाला वाहनाच्या फिटनेसबाबत आधी कळेल व फिटनेसअभावी वाहनाचा होणारा अपघात टाळता येईल. दुचाकी वाहन चालकांना हेल्मेटविषयी विविध माध्यमांतून जनजागृती करून चालकांना हेल्मेट वापरण्यास बाध्य करण्यात येत आहे. मुंबई शहर व जवळपास मोठ्या शहरात हेल्मेट वापरण्यात येतात. हे प्रमाण उर्वरित राज्यात वाढवणे गरजेचे आहे. यासोबतच परिवहन विभाग नागरिकांना परिवहनविषयक अन्य सुविधाही घरबसल्या देत आहे. नागरिकांना परिवहन कार्यालयात न जाता ३६ 'फेसलेस' सेवांचा लाभही देण्यात येत आहे.

## रस्ता सुरक्षा समित्या

रस्ते अपघात टाळणे, रस्ता सुरक्षा या विषयावर जनजागृतीपर मोहिमा राबवणे, रस्ता सुरक्षेबाबत करण्यात आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे, जिल्ह्यातील अपघातप्रवण ठिकाणांचा शोध घेऊन त्यामध्ये उपाययोजना करणे आदींसाठी १३ मे २०१५ च्या अधिसूचनेनुसार राज्य रस्ता सुरक्षा परिषद व जिल्हा रस्ता सुरक्षा समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या विषयाची गंभीरता लक्षात घेता जिल्हा पातळीवर दोन रस्ता सुरक्षा समित्या आहेत. एक समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून दुसरी जिल्ह्यातील ज्येष्ठ संसद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली आहे. संसद सदस्य असलेल्या समितीची व्याप्ती मोठी आहे. या समितीचे सदस्य सचिव जिल्हाधिकारी आहेत. जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळांची माहिती घेऊन त्यामध्ये तातडीने दुरुस्ती करण्यात येते, यासाठी जिल्हा नियोजन समितीचा निधीही उपयोगात आणण्यात येत आहे.

## राज्य रस्ता सुरक्षा परिषद


केंद्र शासनानेही रस्ता सुरक्षेसाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये दंडाची रक्कम वाढवली आहे. रस्ते अपघात ५० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्टही केंद्र शासनाने ठेवले आहे. राज्यामध्ये अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनानेही विविध उपाययोजना केल्या आहेत. राज्य रस्ता सुरक्षा परिषदेची १२वी बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ३ एप्रिल २०२३ रोजी पार पडली. यामध्ये विविध निर्णय घेण्यात आले.

## एकीकृत वाहतूक व्यवस्थापन प्रणाली

रस्ते अपघात कमी करण्यासाठी ज्या रस्त्यांवर अतिवेगाने वाहने चालवली जातात, अशी ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी 'स्पीड डिटेक्शन कॅमेरा' लावण्यात येत आहे. समृद्धी महामार्गावर अपघात जास्त होत असल्याचे मागील काळात निदर्शनास आले आहे. त्यामुळे या महामार्गावर एकीकृत वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र आहे, त्या ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येऊन दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच 'रम्बलर स्ट्रिप'



बसवण्यात येत आहे. अपघात हे बहुतेक वेळा राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्गाला जोडण्यात येणाऱ्या हमरस्त्यांच्या ठिकाणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा हमरस्त्यावर सुरुवातीला व शेवटी; तसेच ज्या ठिकाणी प्रमुख रस्ते खेडेगावातून जातात, त्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात दिवे लावण्यात आले आहेत. जेणेकरून पुढे असणाऱ्या महामार्गावरील वाहने दिसतील व अपघात होणार नाही.



## समुपदेशन केंद्र

सर्व प्रमुख रस्त्यांवर वेग मर्यादा दर्शवणारे सूचना फलक लावण्यात आले असून उर्वरित ठिकाणी लावण्यात येत आहे. एकाच रस्त्यावर वेगवेगळ्या वेग मर्यादा असण्याची शक्यता असते, त्यानुसार वाहन चालकांना संबंधित रस्त्याची वेगमर्यादा समजण्यासाठी पुरेशा संख्येने व दर्शनीय ठिकाणी सूचना फलक लावण्यात येत आहेत. याबाबतचा आढावा दर तीन महिन्यांतून एकदा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने घ्यावयाचा आहे. दुर्दैवाने अपघात झाल्यास अपघातानंतर जखमींना 'गोल्डन अवर'मध्ये वैद्यकीय मदत वेळेत मिळण्यासाठी एअर ॲम्ब्युलन्सची सेवा सुरू करण्यासाठीसुद्धा प्रयत्न करण्यात येत आहे. रस्ता सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येत आहे. वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांचे समुपदेशन करण्यासाठी टोल नाक्यांवरही केंद्र उभारण्यात येत आहे. त्यामुळे वाहन चालकांना वाहतुकीचे नियम समजतील व अज्ञानामुळे होणारे अपघात टाळता येतील.

अशाप्रकारे शासन 'रस्ता सुरक्षा' या विषयावर गंभीरतेने काम करत आहे, विविध उपाययोजना करत आहे. रस्ता सुरक्षा ही केवळ काही दिवसांपुरती घ्यावयाची नसून कायमस्वरूपी करावयाची आहे. ती काळाची गरज आहे. त्यामुळे रस्ता सुरक्षा आता जनचळवळ बनली पाहिजे.

विभागीय संपर्क अधिकारी

**सर्व भारतीयांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी देणारे भारतीय संविधान आहे. भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवण्याचा संकल्प आहे. भारतीय संविधानाची निर्मिती करताना भारतातील धर्म, जात, पंथ, भाषा, प्रांत, संस्कृती, रुढी-परंपरा, भौगोलिक वेगळेपण अशा अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ ठेवण्याचे काम भारतीय संविधान करत आहे.**

# संविधान साक्षरतेचा जागर

**डॉ. अशोक चौसाळकर**

भारतीय संविधानाला अधिक मजबूत करण्यासाठी जनजागृतीतून संविधान कायदा, सार्वभौमत्व लोकशाही उन्नत राखण्यास मदत होईल. संविधानाच्या उद्देश पत्रिकेत स्वातंत्र्य दर्जाची व संधीसमता प्रतिष्ठेची हमी देणारी बंधुता; तसेच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची अपेक्षा केलेली आहे.

भारतीय संविधान माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करून देते. समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. मानवी हक्क आणि त्यांचे संरक्षण व त्याचा प्रसार करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या साक्षरतेची गरज आहे. भारतीय संविधानाप्रति निष्ठा, आपुलकी, जिव्हाळा, बांधिलकी, आस्था निर्माण करण्यासाठी; तसेच भारतीय लोकांचा घटनेवरील अधिक विश्वास वाढवण्यासाठी संविधान साक्षरतेचा जागर झाला पाहिजे.

आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्राला स्वत:चे असे संविधान तयार करणे आवश्यक असते. कारण संविधान हा त्या राज्याचा मूलभूत कायदा असतो आणि त्या कायद्याप्रमाणे त्या राज्याची शासन यंत्रणा काम करत असते. म्हणून आधुनिक राज्याला कायद्याचे राज्य असे म्हटले जाते, आणि आधुनिक शासनाला घटनात्मक शासनपद्धती असे म्हटले जाते. संविधान दोन प्रकारचे असते - लिखित आणि अलिखित. लिखित संविधान देशाच्या संविधानसभेने तयार केलेले असते तर अलिखित संविधान देशाच्या घटनात्मक परंपरा आणि संकेत यावर आधारलेले असते. ब्रिटनचे संविधान हे अलिखित आहे, तर अमेरिकेचे संविधान हे लिखित स्वरूपाचे आहे. ज्या संविधानात घटनादुरुस्ती करणे सोपे असते त्या संविधानाला लवचिक व ज्यामध्ये दुरुस्ती करणे अवघड असते, त्याला परिदृढ संविधान म्हटले जाते. अमेरिकेमध्ये स्वातंत्र्ययुद्धानंतर सुमारे २४० वर्षांपूर्वी तेथील संविधान सभेने अमेरिकेचे संविधान बनवले आणि आजही ते लागू आहे. अमेरिकन वसाहतींना एकत्र आणून तिचे एकात्म राज्य बनवण्यामध्ये आणि तिला




सर्वशक्तिमान महासत्ता बनवण्याचे काम अमेरिकन राज्यघटनेने केले आहे. २६ जानेवारी २०२४ रोजी भारतीय राज्यघटना ७५व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहे. भारतीय लोकांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडवून आणण्याचे काम भारतीय राज्यघटनेने केलेले आहे.

प्राचीन काळी ग्रीस देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या राज्यघटना ग्रीक लोकांनी तयार केल्या होत्या. प्राचीन भारतामध्येसुद्धा सहा प्रकारच्या राज्यघटनांचा उल्लेख करण्यात आला आहे. या राज्यघटना म्हणजे, राज्य, द्वैराज्य, वैराज्य, युवराज्य, गणराज्य आणि विरुद्धराज्य. राज्य म्हणजे एका राजाचे राज्य, द्वैराज्य दोन राजांनी मिळून चालवलेले राज्य-महाभारतामध्ये विंद आणि अनुविंद या दोन भावांचा उल्लेख आहे. वैराज्य म्हणजे शत्रू राष्ट्राच्या ताब्यात असणारे राज्य. युवराज्य म्हणजे राजाने आपल्या युवराज पुत्राला वाटून दिलेले राज्य. गणराज्य म्हणजे लोकांच्या हातात असणारे लोकशाही राज्य, आणि विरुद्ध म्हणजे युद्धामुळे देशाचे दोन तुकडे होऊन त्या दोन भागांमध्ये एकमेकांशी शत्रूप्रमाणे वागणारे राज्य. गणराज्याचे दोन भाग होते. एक आयुधजीवी संघ आणि दुसरे राज्यशब्दोपजीवी संघ. या भारतीय गणराज्यात मुक्त विचारस्वातंत्र्य असल्यामुळे भगवान श्रीकृष्ण, भगवान महावीर, भगवान गौतमबुद्ध, कौटिल्य आणि कठोपनिषद लिहिणारे कठ यांनी जन्म घेतला.

प्राचीन ग्रीसमध्ये ॲरिस्टॉटल या विचारवंताने त्या काळात उपलब्ध असणाऱ्या सुमारे १७४ संविधानांचा अभ्यास करून आपला 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहिला. त्याच्या मते संविधान नागरिकांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. कारण संविधानामध्ये ग्रंथित असणारी जी महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्याची छाप नागरिकांच्या मनावर पडते. त्याने संविधानाची खालील तीन कार्ये सांगितली आहेत.

१) संविधानात केलेल्या तरतुदींप्रमाणे त्या राज्याची शासनयंत्रणा संघटित केली जाते व त्यात नमूद केलेल्या उद्दिष्टाप्रमाणे ती कार्य करू लागते.

२) संविधानात नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये ग्रंथित केलेले असतात आणि नागरिक या अधिकारांचा उपभोग घेऊ शकतात.

३) संविधानाच्या उद्दिष्टानुसार प्रत्येक नागरिकाला चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करणे हे या राज्याचे कर्तव्य आहे.

ॲरिस्टॉटलने असे मत व्यक्त केले की, जोपर्यंत राज्यघटना त्यात नमूद केलेल्या तत्त्वाप्रमाणे वागते आणि कोणतेही अतिरेक टाळून सुवर्णमध्याचे तत्त्व स्वीकारते त्यावेळी ती चांगल्या प्रकारे काम करते; पण राज्यात राहणाऱ्या विविध सामाजिक वर्गात जर विसंवाद निर्माण झाला आणि राज्यकर्ते उघड-उघड अन्याय करू लागले, तर या घटनेचा ऱ्हास होणे अपरिहार्य ठरते.

भारतामध्ये इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर वेगवेगळ्या कायद्यांच्या आधारे त्यांनी राज्यकारभार चालवला. या कायद्यांमध्ये तीन सुधारणा कायदे महत्त्वाचे होते. त्यातील पहिला कायदा हा मोर्ले-मिंटो कायदा हा होता. या कायद्यानुसार राज्य आणि केंद्रीय विधिमंडळात भारतीयांना प्रतिनिधित्व मिळाले व मुसलमानांना विभक्त मतदारसंघ मिळाले. १९१९ साली मॉंटेग्यू चेम्सफर्ड कायदा करण्यात आला. या कायद्याप्रमाणे द्विदल शासन पद्धती अमलात आली. राज्य व केंद्रीय विधिमंडळात भारतीयांची संख्या वाढली व त्यांना राज्य मंत्रिमंडळात काही पदे देण्यात आली. मध्यंतरीच्या काळात १९२८ साली कॉंग्रेसने नियुक्त केलेल्या मोतीलाल नेहरू समितीने राज्यघटनेचा आराखडा तयार केला. १९३५ साली ब्रिटिश सरकारने १९३५ चा कायदा संमत करून राज्यस्तरावर विधानसभा निर्माण केल्या आणि प्रांतांना प्रांतिक स्वायत्ता प्रदान केली. त्याप्रमाणे १९३७ साली भारताच्या ११ प्रांतांत लोकनियुक्त मुख्यमंत्री सत्तारुढ झाले. पुढे १९४६ साली भारतात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ३० जून १९४८ पूर्वी भारताला स्वातंत्र्य देण्याची ब्रिटिश सरकारने घोषणा केली. इंग्रज सरकारची त्रिमंत्री योजना कॉंग्रेस आणि मुस्लीम लीगला मान्य झाली नाही. राज्य विधानसभांमधून संविधानसभेचे सभासद निवडण्यात आले. त्यांची एकूण संख्या २९९ होती व संस्थानांचे ७० सभासद मिळून संविधानसभा बनणार होती; पण मुस्लीम लीग संविधानसभेत सामील झाले नाही. भारताची भारत आणि पाकिस्तान अशी दोन राज्यांमध्ये फाळणी झाली आणि भारताच्या संविधानसभेने संविधान बनवण्यास सुरुवात केली. वेगवेगळ्या विषयांची चर्चा करण्यासाठी अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यातील मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, १५ ऑगस्ट १९४७ ते २६ जानेवारी १९५० या काळात भारताला डोमिनियनचा दर्जा होता व राज्यकारभार १९३५च्या कायद्याप्रमाणे चालत होता. प्रथम माऊंट बॅटन व नंतर राज गोपालचारी हे भारताचे गव्हर्नर जनरल होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान तयार झाले आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते लागू करण्यात आले. त्या दिवसापासून भारत स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही गणराज्य बनले.

भारतासारख्या मागास आणि १५० वर्षे गुलामीमध्ये राहणाऱ्या देशास नव्या राज्यघटनेची आवश्यकता होती. १९३५ चा कायदा हा नव्या राज्यघटनेची जागा घेऊ शकत नव्हता. कारण त्यामध्ये राज्यघटनेचे राजकीय तत्त्वज्ञान मांडण्यात आलेले नव्हते. त्यामुळे भारतीय राज्यघटना ही १९३५ च्या कायद्याची सुधारित आवृत्ती आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. प्रख्यात अमेरिकन लेखक ऑस्टिन याने असे म्हटले आहे की, भारतीय राज्यघटना हा भारतीय समाजामध्ये सर्वांगीण सुधारणा करणारा दस्तऐवज आहे. भारतीय राष्ट्राज्याची ती कोनशिला आहे. कारण भारतीय राष्ट्राराज्याची जडणघडण राज्यघटनेमध्ये अनुस्यूत असलेल्या तत्त्वांच्या आधारेच होणार आहे.

भारतीय राज्यघटनेची खालील चार महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

१) मूलभूत अधिकार आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे २) संसदीय लोकशाही ३) संघराज्यवाद ४) न्यायालयीन स्वातंत्र्य.

भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान, घटनेचा सरनामा, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये समाविष्ट झालेले आहेत. घटनेच्या सरनाम्यामध्येच असे घोषित करण्यात आले आहे की, भारत हे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाही गणराज्य आहे. येथे संविधानकर्त्यांनी आपल्या देशाचे स्वरूप आणि उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. भारत हे स्वतंत्र आणि सार्वभौम गणराज्य असेल. हे गणराज्य धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद समाजवाद यावर विश्वास ठेवणारे असेल. आपल्या नागरिकांना स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता प्रदान करणारे असेल. या सरनाम्यातील तरतुदींचा उद्देश आपल्या गणराज्याच्या पुढील विकासाची दिशा स्पष्ट करण्याचा होता.

नागरिकांचे मूलभूत अधिकार हा संविधानातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये नागरिकांना मोठ्या प्रमाणामध्ये अधिकार देण्यात आलेले आहेत. या अधिकारावर जर गदा आली, तर नागरिकाला न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. यामध्ये समतेचा अधिकार आहे आणि समतेच्या अधिकाराध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग यांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. एकूण आरक्षण शेकडा ६० टक्क्यांच्या आसपास आहे. या आरक्षणाला क्षतिपूरक न्याय असे म्हटले जाते. अनेक कारणांनी शेकडो वर्षे मागास राहिलेल्या लोकांना ही खास सवलत देण्यात आलेली आहे. फक्त अनुसूचित जाती आणि जमातीसाठी लोकसभा आणि विधानसभामध्ये राजकीय आरक्षण देण्यात आलेले आहे. आरक्षणाच्या धोरणामुळे लक्षावधी लोकांचा विकास झाला आहे. हे सामाजिक न्यायाचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे मागास समाजातील लोकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली आणि ही प्रक्रिया राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यामध्ये उपकारक ठरली आहे. घटनेमध्ये कलम १९ प्रमाणे नागरिकास स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामध्ये विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क महत्त्वाचा आहे. कलम-२१ मध्ये जिवंत राहण्याचा हक्क आहे. १४,१९ व २१ या कलमांनाच

सर्वोच्च न्यायालयाने सुवर्ण त्रिकोण म्हटले आहे. कलम - २५ ते ३० मध्ये भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांचे अधिकार विषद केले आहेत. त्यामधून धार्मिक स्वातंत्र्य अभिव्यक्त होते. अधिकार व्यक्तीला स्वतंत्र म्हणून जगण्यास मदत करतात. आणि ज्यावेळी व्यक्तीच्या या अधिकारांना बाधा पोहोचवली जाते, त्यावेळी तिला न्यायालयामध्ये दाद मागण्याचा अधिकार आहे. व्यक्तिगत सुरक्षेसाठी व्यक्ती हेबियस कॉर्पसच्या अंतर्गत दाद मागू शकते. ज्या राज्यात हा अधिकार नाही, त्यास लोकशाही राज्य म्हणता येणार नाही. हा अधिकार म्हणजे ज्यावेळी एखाद्या व्यक्तीस पोलीस किंवा इतर कोणीही अटक करतात, त्यावेळी त्या व्यक्तीच्या जवळचे लोक २४ तासात त्या व्यक्तीस न्यायालयामध्ये हजर करावे, असा आदेश न्यायालयाने काढावा म्हणून विनंती करतात आणि त्या व्यक्तीविरुद्ध प्रथमदर्शनी पुरावा नसेल तर तिची सुटका करून घेतली जाते.

राज्याची मार्गदर्शक तत्त्वे हा आपल्या घटनेतील एक महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये सामाजिक न्याय आणि समाजवाद ही तत्त्वे महत्त्वाची मानलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, यात नमूद केलेली तत्त्वे ही उद्याचे अधिकार आहेत. आर्थिक क्षमता नसल्यामुळे जरी आपण ते प्रत्यक्षामध्ये अमलात आणू शकलो नसलो तरी उद्या ते आपल्याला अमलात आणायचे आहे. कारण ते भारतीय घटनेचे हृदय आहे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

सामाजिक विषमता कमी करून सर्वांना न्याय देणे, स्त्रिया आणि बालक यांचे कल्याण करणे, शिक्षण मोफत आणि सक्तीचे करणे, पंचायत राज्य संस्था स्थापन करणे, सर्वांसाठी समान नागरी कायदा करणे, दुभत्या आणि जुंपलेल्या गोवंशाच्या हत्येला बंदी घालणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ यांच्या कार्याचे विभाजन करणे. यातील काही तरतुदींची अंमलबजावणी झाली आणि अजून बऱ्याच तरतुदींची अंमलबजावणी व्हायची आहे. मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व यासाठी आहे की, त्यांनी उद्याच्या विकसित सुजाण आणि समताधिष्ठित भारताचे चित्र त्यात रेखाटले आहे व आपणास त्या दिशेने जायचे आहे.



भारताने अध्यक्षीय लोकशाहीऐवजी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. या व्यवस्थेत अध्यक्ष नामधारी असतो आणि सर्व सत्ता प्रधानमंत्र्यांच्या हातात असते. लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळालेले असते त्या पक्षाचा नेता प्रधानमंत्री बनतो. तो लोकसभेला जबाबदार असतो. प्रधानमंत्र्यांवर अविश्वासाचा प्रस्ताव आणून लोकसभा त्यास साध्या बहुमताने दूर करू शकतो. संसदेमध्ये सर्व विषयांची चर्चा होते. ही व्यवस्था लवचिक असून जनतेच्या जास्त जवळ आहे.

संघराज्यवार हे भारतीय राज्यघटनेचे तिसरे वैशिष्ट्य आहे. राज्याचे एकात्म आणि संघराज्य असे दोन प्रकार असतात. ज्या देशाचा आकार मोठा असतो आणि ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक आणि भाषिक विविधता असते, त्या राज्यामध्ये संघराज्य स्थापन केले जाते. संघराज्यात केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणी स्वतंत्र आणि लोकप्रिय सरकारे असतात आणि त्यांच्यामध्ये अधिकारांचे वाटप केले जाते. त्यांना देण्यात आलेल्या विषयावर कायदे करण्याचा राज्य सरकारला हक्क असतो. भारतीय राज्यघटनेत भारताला राज्यांचा संघ असे संबोधिले आहे. संघराज्यात वेगवेगळ्या प्रांतांना त्यांची स्वायत्तता जपता येते आणि त्यांच्या राज्यातील परिस्थितीला अनुकूल अशा विकास योजना राबवता येतात.

स्वतंत्र न्यायव्यवस्था कोणत्याही लोकशाहीसाठी आवश्यक असते. भारतात राज्यस्तरावर उच्च न्यायालये व केंद्रस्तरावर सर्वोच्च न्यायालय असते. सर्वोच्च न्यायालय घटनेचा अर्थ लावते, राज्याराज्यातील तंट्याबद्दल निकाल देते आणि वेगवेगळ्या खटल्यांची सर्वोच्च न्यायालय अंतिम सुनावणी करते. न्यायालयाचा सर्वात मोठा अधिकार म्हणजे संसदेने संमत केलेल्या कायद्याचे पुनर्निरीक्षण करणे, संविधानाचे आणि नागरिकांच्या हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयाकडे आहे. देशाच्या लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करणे ही न्यायालयाची जबाबदारी आहे.

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, कोणत्याही प्रगतिशील देशासाठी संविधान आवश्यक आहे. ज्या देशात संविधानात केलेल्या तरतुदींनुसार राज्यकारभार चालतो आणि गरज पडेल त्यावेळी संविधानात आवश्यक तेवढी दुरुस्ती केली जाते, त्या देशामध्ये सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित होते आणि तो देश एका नव्या दिशेने वाटचाल करू लागतो.

**(लेखक हे ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

**संविधानाच्या प्रास्ताविकेत (उद्देशिकेत) 'आम्ही भारताचे लोक...' या वाक्यात 'आम्ही' हा शब्द विचारपूर्वक वापरला असावा...मात्र, आजही 'आम्ही भारतीय' अशी भावना जनमानसात निर्माण होण्यासाठी बरेच प्रयत्न होणे गरजेचे आहे. केंद्र व राज्य शासन सर्वांना समान सामाजिक पातळीवर आणण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध योजना राबवत आहेत. विविधतेत एकता असलेले भारतीय एक आहेत ही राष्ट्रीय भावना रुजवण्याचे कामही शासन करत आहे.**

# विविधतेत एकता

**श्रद्धा मेश्राम**

आपण आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) युगात वावरत आहोत. जिथे तुमच्या मेंदूप्रमाणे सॉफ्टवेअर काम करते. तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडून आणण्याचे काम सॉफ्टवेअर करत आहे. कार्यक्षमता, उत्पादकता वाढवणे, ग्राहक सेवा, आरोग्यसेवा, वाहतूक आणि वित्त यांसारख्या उद्योगांमध्ये क्रांती घडवण्याचे काम आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या मदतीने अनेक देश करत आहेत. आधुनिक युगात काम करत असताना कोणतेही सॉफ्टवेअर तुमचा प्रदेश, जात, धर्म विचारत नाही. तुम्ही अमर्याद कामासह प्रगती करू शकता. मानवाने माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगतीचा उच्चांक गाठला आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

मात्र आपण इतिहासात डोकावून पाहिले तर...आपण अशा देशात राहतो जिथे माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी जात विचारली जात होती. त्यामुळे शिक्षणाचा अभाव आणि प्रगती तर शक्यच नाही. अशा परिस्थितीत अनेक वर्षे भारताचा प्रवास सुरू होता. मात्र, शारीरिक आणि मानसिक गुलामगिरीतून आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) पर्यंतचा हा प्रवास संविधानाच्या माध्यमातून झाला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही, १९३५ च्या सुधारित वसाहती कायद्यावर आधारित देशाचा कारभार सुरू होता.

ब्रिटिश साम्राज्य आणि कायदे जाऊन भारतीय लोकांनी स्वत:साठी असलेल्या कायद्याची म्हणजेच संविधानाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली तो दिवस म्हणजे प्रजासत्ताक दिन होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवीमूल्यांचा संविधानाच्या माध्यमातून भारतीयांच्या जीवनात समावेश करण्यात आला आहे.

## प्रजासत्ताक दिन आणि डॉ. आंबेडकर

एक प्रास्ताविक, आठ अनुसूची, २५ भाग आणि ३९५ कलम (मूळ प्रतीत) समावेश असलेले संविधान भारतीयांनी अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत संविधान सभेत अर्पण केले. असा उल्लेख प्रास्ताविकेत आहे. जगातील सर्वात दीर्घ वाक्य आणि मानवी तत्त्वे - मूल्यांचा सार ज्यात आहे ते म्हणजे संविधानाचे प्रास्ताविक (उद्देशिका).

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारण्यात आले, तर संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. प्रजासत्ताक दिन 'राष्ट्रीय सण' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली जाते. भारतीय स्वातंत्र्यासाठी आहुती दिलेल्या शहिदांचे स्मरण केले जाते.

संविधानाच्या प्रास्ताविकेत (उद्देशिकेत) 'आम्ही भारताचे लोक...' या वाक्यात 'आम्ही' हा शब्द विचारपूर्वक वापरला आहे. केंद्र व राज्यशासन सर्वांना समान सामाजिक पातळीवर आणण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकांसाठी विविध योजना राबवत आहेत. विविधतेत एकता असलेले भारतीय एक आहेत, ही राष्ट्रीय भावना रुजवण्याचे कामही शासन करत आहे.

संविधानामुळे ब्रिटिशांचे कायदे संपुष्टात आणून लोकशाही अस्तित्वात आली. संविधान निर्मितीसाठी घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. २९६ सदस्यांपैकी २०७ सदस्यांनी यात भाग घेतला होता. या घटना समितीअंतर्गत अनेक उप-समित्या होत्या. घटनेची मसुदा समिती २९ ऑगस्ट १९४७ साली नेमण्यात आली. या समितीवर संविधानाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी होती.

डॉ. राजेंद्र प्रसाद संविधान समितीचे अध्यक्ष होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष होते. 'अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही', असे डॉ. आंबेडकर यांनी घटना समितीच्या पहिल्या भाषणात सांगितले. संविधान समितीच्या अंतर्गत समित्यांमध्ये कार्यपद्धती नियम समिती, सुकाणू समिती, अर्थ आणि कर्मचारी समिती, अधिकार पत्र समिती, सभागृहाची समिती, सभागृह कामकाज क्रम समिती, राष्ट्रध्वज अर्थ समिती, घटना कायदेमंडळ कार्य समिती, संस्थाने समिती, मूलभूत हक्क, अल्पसंख्याक आणि आदिवासी तसेच वर्जित प्रदेश, मूलभूत हक्क, अल्पसंख्याक आणि आदिवासी तसेच वर्जित प्रदेश सल्लागार समिती, अल्पसंख्याक उपसमिती, मूलभूत हक्क उपसमिती, ईशान्य सीमावर्ती आदिवासी प्रदेश आणि आसाम वर्जित; तसेच अंशतः वर्जित प्रदेश उपसमिती, वर्जित आणि अंशतः वर्जित (आसाम खेरीज) प्रदेश उपसमिती, केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय घटना समिती जवाहरलाल नेहरू, मसुदा समिती अशा एकूण १९ उपसमित्या होत्या.

## घटना समितीचे शिल्पकार

बंगालच्या फाळणीनंतर डॉ. आंबेडकर यांचे सदस्यत्व संपुष्टात येऊनही त्यांना पुन्हा संसदेचे सदस्यत्व बहाल करून संविधान समितीत घेण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या मसुदा समितीत एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादी

कृष्णस्वामी अय्यर, डॉ. के. एम. मुन्शी, सय्यद मोहम्मद सादुल्ला, एन. माधव राव (बी. एल. मित्तर यांनी प्रकृती अस्वस्थतेमुळे राजीनामा दिल्याने एन. माधव राव यांची नियुक्ती करण्यात आली)., टी. टी. कृष्णम्माचारी (डी. पी. खेतान यांचे १९४८ ला निधन झाल्याने कृष्णम्माचारी यांनी त्यांची जागा घेतली) असे एकूण ७ सदस्य होते.

घटना समितीचे कामकाज २ वर्ष ११ महिने १७ दिवस सुरू राहिले. समितीची ११ अधिवेशने आणि १६५ दिवस कामकाज चालले. मसुदा समितीच्या ४४ सभा झाल्या. या समितीने संविधानाचा मसुदा तयार केला आणि तो ४ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेला सादर केला.

टी. टी. कृष्णम्माचारी संविधान सभेत म्हणतात, 'मसुदा समितीत एका सदस्याने राजीनामा दिला, त्यांचे पद भरले नाही, एका सदस्याचा मृत्यू झाला, त्यांचे पद भरले नाही, एक सदस्य अमेरिकेस गेले, त्यांचेही पद भरले नाही, एक सदस्य संस्थानिक संबंधीच्या कामात गुंतून राहिले. दोन सभासद दिल्लीपासून दूर होते. प्रकृती ठीक नसल्याने तेही येऊ शकले नाही. शेवटी झाले असे की, घटनेचा मसुदा तयार करण्याचे काम एकट्या डॉ. आंबेडकर यांच्याकडे आले, त्यांनी ज्या पद्धतीने काम पार पाडले. त्यामुळे ते आदरास पात्र आहेत,' असे ते म्हणाले. शेवटी सभेत उपस्थितांनी त्यांना देशाच्या नागरिकांच्या वतीने 'शिल्पकार' ही पदवी बहाल केली.

बरेचसे विचारविमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती (हिंदी आणि इंग्रजी) २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसांनंतर भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी सकाळी १० वाजून १८ मिनिटांनी भारत प्रजासत्ताक म्हणून उदयास आला. त्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली.

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. आंबेडकर यांनी घटना समितीसमोर केलेल्या शेवटच्या भाषणात ते म्हणतात, 'राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.'

## विविध देशांतील घटनांचा अभ्यास

जगातील सर्व आधुनिक देशांच्या घटनांचा आणि कायद्यांचा डॉ. आंबेडकर यांनी अभ्यास केला होता. अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांची संविधाने (घटना) आपल्यापेक्षा फारच लहान आहेत. आपल्या मूळ संविधानात (१९५० साली) ३९५ परिच्छेद आहेत, तर (१९५० साली) अमेरिकन संविधानात केवळ ७, कॅनडाच्या संविधानात १४७, ऑस्ट्रेलियाच्या १२८ आणि दक्षिण आफ्रिकेच्या १५३ अनुच्छेद आहेत. तसेच आपल्या संविधान सभेला २,४७३ दुरुस्त्यांचा विचार करावा लागला आहे, जो इतर देशांना नाही. इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशाची भौगोलिक परिस्थिती, सामाजिक, जातीय, आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक स्थिती आणि गुलामगिरीत १०० वर्षे राहिलेला देश, सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक विविधता या गोष्टींचा विचार संविधानाचा मसुदा तयार करताना करण्यात आला.

### धर्मनिरपेक्ष राज्य संविधानाचे मुख्य वैशिष्ट्य

आदिवासी, बहुजन, पीडित, शोषित आणि सर्व धर्मातील जातीतील महिलांच्या उद्धारासाठी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचे ऋण मानले जातात. मात्र भारतात लोकशाही अस्तित्वात आणून ती अधिक प्रबळ करण्यासाठी त्यांनी संविधानाच्या रूपाने कायदा दिला.

वर्षानुवर्षे जातिव्यवस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या अस्पृश्यतेचा कलंक देशाला लागला होता. ते संपूर्ण पुसून टाकण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून करून भारतीयांच्या कोट्यान्‌कोटी कुळांचा उद्धार डॉ. आंबेडकरांनी केला आहे. इतिहास विसरून पुढे जाण्याचा प्रयत्न केला, तर वर्तमानातील प्रगती आणि सुरू असलेला संघर्ष समजून घेता येणार नाही.

डॉ. आंबेडकर यांनी प्रशासकीय यंत्रणेबाबत मार्गदर्शक तत्त्वे नमूद करताना छत्रपती शिवाजी महाराज राबवत असलेल्या अष्टप्रधान मंडळ आणि प्रशासकीय बाबींचा विचार केला असल्याचे इतिहासकार आणि तज्ज्ञांनी नमूद केले आहे; तसेच डॉ. आंबेडकर संविधान सभेच्या एका भाषणात म्हणतात, 'भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, संघ हे दुसरे काही नसून संसदच होते, तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादींबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधिमंडळाच्या नियमावधीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत...'

असे भारतीय इतिहासाचे दाखले असताना इतर देशांच्या संविधानाचा सार घेऊन भारताचे संविधान तयार केले किंवा कॉपी केले असे म्हणणे चुकीचे ठरेल.

देश प्रजासत्ताक झाल्यावर संविधानाने दिलेल्या राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन होण्यासाठी प्रयत्न व्हावे, यासाठी अनेक बाबींचा समावेश घटनेत करण्यात आला आहे.

डॉ. आंबेडकर यांनी संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात सांगितले की, 'राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल, तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.'

सहायक संचालक (माहिती)

**जागतिक स्तरावर भारतीय लोकशाही शासन प्रणालीचे विशेष महत्त्व आहे. या लोकशाहीचा उत्सव म्हणजे निवडणुका होय. त्या पारदर्शक आणि निर्भय, मुक्त वातावरणात पार पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी यंत्रणा असते ती निवडणूक आयोग होय. स्वतंत्र भारत देशात केंद्रीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. त्यामुळे तो दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.**

# राष्ट्रीय मतदार दिवस

**वंदना थोरात-वारेगावकर**

यावर्षी राष्ट्रीय मतदार दिवसाचा उत्साह जास्त आहे, कारण या वर्षात देशाच्या आणि महाराष्ट्राच्या कायदेमंडळात लोकप्रतिनिधींची निवड करणाऱ्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामध्ये सर्वात प्रभावी ठरणारा घटक कोणता असेल तर तो आहे मतदार, ज्याच्या मतांनी अनेकांचे सत्तेत येण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येते, तर काहींचे ते स्वप्न हे फक्त स्वप्नच राहते इतकी ताकत आहे ती मतदारांच्या मतदानाच्या संख्येत. त्यामुळे तर इतका महत्त्वपूर्ण अधिकार लाभलेल्या मतदाराचा तितकाच व्यापक आणि सक्रिय सहभाग या सर्व मतदान प्रक्रियेत असलाच पाहिजे. हा सहभाग वाढवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत विविध नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात येत असतात. राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त प्राधान्याने नवमतदारांना मतदान ओळखपत्र दिले जाते. त्याचसोबत विविध माध्यमांतून मतदार जागृतीचे उपक्रम राबवले जातात.

## मतदार नोंदणी प्रक्रिया

लोकशाही सक्षमीकरणाची पहिली पायरी असते मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावणे आणि त्यासाठी आवश्यक आणि महत्त्वाचे असते ते मतदारयादीत आपले नाव असणे. मतदारयादीत तुमच्या नावाची मतदार म्हणून नोंद असणे ही आपला मतदानाचा अधिकार बजावण्यातील सर्वात महत्त्वाची प्राथमिक बाब आहे. त्यामुळेच आगामी निवडणुकीत आपला मताधिकार बजावण्यासाठी आपले नाव मतदारयादीत असणे आवश्यक आहे. मतदारयादीत एकदा नाव नोंदवले की ते कायमचे तसेच राहणार असे समजून काही जण आपले नाव या वर्षीच्या अद्ययावत यादीत आहे की नाही याची खातरजमा करत नाहीत; पण निवडणूक आयोगामार्फत मतदारयादी दरवर्षी अद्ययावत होत असते. हे



अद्ययावतीकरण, शुद्धीकरण करताना त्यातील मृत झालेल्या मतदारांची नावे वगळली जातात. तसेच स्थलांतर केलेल्या मतदारांची नावेही वगळली जातात. त्यामुळे आपले नाव https://electoral- search. eci.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन तपासू शकतात. तसेच नवयुवा मतदारांच्या नोंदणीसाठी मतदार नोंदणी अभियान राबवण्यात आले असून मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन सुविधा https://voters.eci.gov.in/ किंवा Voter Helpline APP ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

माझ्या मताने काय फरक पडतो किंवा मी कशाला मतदान करू या विचारांनी अनेकदा मतदार या उपयुक्त अधिकाराचा तितक्या प्रभावीपणे वापर करताना दिसत नाहीत. मात्र आपल्या दैनंदिन जगण्याशी निगडित अनेक प्रश्नांची सोडवणूक ही लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे त्यांची योग्य निवड ही आपल्यासाठी उपयोगाची ठरते. आपल्या पसंतीने लोकप्रतिनिधींची निवड करण्याची सुसंधी मतदारांना मतदानाच्या या अधिकारातून सहजी मिळत असते. 'हातभर तक्रारीचा बोटभर उपाय' या संकल्पनेतून स्वीपच्या माध्यमातून मतदारांना हेच समजून सांगण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला आहे.



## मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

मतदार नोंदणीसाठी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्माचा दाखला, भारतीय



पासपोर्ट, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, आधार कार्ड, जन्मतारखेची नोंद असलेले इयत्ता दहावी किंवा बारावीचे निकालपत्र यांपैकी कोणत्याही एका दस्तऐवजाची स्वप्रमाणित छायांकित प्रत जोडावी. तसेच वरीलपैकी एकही दस्तऐवज नसल्यास जन्मतारखेचा उल्लेख असलेला कोणताही दस्तऐवज जोडावा.

पत्त्याच्या पुराव्यासाठी भारतीय पासपोर्ट, आधारकार्ड यासह जमिनीच्या मालकीसंदर्भात वितरित केलेला दस्तऐवज, राष्ट्रीय, शेड्युल्ड बँक किंवा टपाल विभागाचे चालू असलेल्या खात्याचे पासबुक, पाणी, वीज तसेच स्वयंपाकाच्या गॅस जोडणीचे किमान एका वर्षाच्या आतील बिल, नोंदणीकृत भाडे करार, नोंदणीकृत विक्री करार (यांपैकी कोणत्याही एका दस्तऐवजाची स्वप्रमाणित छायांकीत प्रत जोडावी. तसेच वरीलपैकी एकही दस्तऐवज नसल्यास पत्त्याचा उल्लेख असलेला कोणताही दस्तऐवज जोडावा). पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) त्यात छायाचित्राची पार्श्वभूमी म्हणजेच बॅकग्राऊंड शक्यतो पांढऱ्या रंगाचा किंवा फिकट रंगाचा असावा.

तपशिलांतील बदलासाठी नाव, पत्ता, जन्मदिनांक, छायाचित्र, लिंग, मोबाइल क्रमांक, मतदार ओळखपत्र इत्यादी तपशिलांतील बदलासाठी अर्ज क्रमांक ८ भरायचा असतो.

## मतदार नोंदणीची पात्रता

मतदार म्हणून वयाची १८ वर्ष पूर्ण केलेली भारतीय नागरिक असलेली प्रत्येक व्यक्ती नोंदणी करण्यासाठी पात्र आहे. तसेच १ जानेवारी २०२४ रोजी किंवा त्याआधी १८ वर्षे पूर्ण करणारे भारतीय नागरिक; तसेच २०२४ या वर्षातील एप्रिल, जुलै, ऑक्टोबर या महिन्यांच्या १ तारखेला किंवा त्याआधी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिकांचे आगाऊ अर्ज स्वीकारण्यात येतील. (मात्र या अर्जावर त्या-त्या तिमाहीत प्रक्रिया पूर्ण केली जाईल.)

## विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, मतदार जागृती उपक्रम

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची जनजागृती होऊन या कार्यक्रमाला पात्र मतदारांचा व्यापक प्रतिसाद मिळावा यासाठी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम; तसेच मतदार नोंदणी, तपशिलातील दुरुस्त्या आणि मतदारयादीत नाव तपासून पाहण्याचे महत्त्व, यासंबंधी नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध असलेले अर्ज, सोयीसुविधा आणि व्यासपीठे, यासंदर्भात नागरिक आणि निवडणूक यंत्रणांची जबाबदारी यांविषयी आयोगामार्फत विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

यावर्षी पहिल्यांदाच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासाठी जाहिरातींची निर्मिती स्वीप टीम अंतर्गत केली गेली. या जाहिरातींमधून मतदार नोंदणी, तपशिलातील दुरुस्त्या, मतदार तादीत नाव तपासून पाहण्याचे महत्त्व आणि तृतीयपंथी, बेघर आणि देहव्यवसाय करणाऱ्या महिलांच्या मताधिकाराविषयीचे संदेश राज्यातील जनतेपर्यंत पोहोचवले गेले.

या सर्व जाहिराती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, यासाठी वृत्तवाहिन्या आणि सिनेमागृहातील प्रसारणाचे नियोजन केले गेले. यंदाही पोस्टर, बॅनर, समाजमाध्यमांच्या पोस्ट, संदेश अशा स्वरूपातील प्रचार साहित्य आणि आशयनिर्मिती केली गेली. त्यात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम आणि त्याअंतर्गतच्या उपक्रमांची माहिती देणाऱ्या प्रचार साहित्याचा समावेश होता. यासोबतच रेल्वे, बस अशा प्रवाशी यंत्रणा, वाहतूक यंत्रणा; तसेच वीज, गॅस अशा जीवनावश्यक सेवा पुरवठा यंत्रणांसोबत भागिदारी केली गेली. या सेवा आणि मताधिकाराची सुसंगती जोडून प्रचाराचे तसे साहित्यही तयार केले गेले.

या व्यतिरिक्त मतदार नोंदणी, तपशिलातील दुरुस्त्या आणि मतदार तादीत नाव तपासून पाहण्याचे महत्त्व याविषयीचा संदेश प्रभावीरीत्या पोहोचावा, यासाठी *'हातभर तक्रारींचा बोटभर उपाय'* आणि *'अठरावं वरीस मोक्याचं'* या कल्पक ओळींचा वापर करून, प्रचार साहित्य तयार केले गेले. विविध उपक्रमांद्वारे मतदान नोंदणी आणि मतदानाचे महत्त्व अधोरेखित करून मतदारांचा मतदानातील सहभाग वाढवण्यासाठी भरीव प्रयत्न केला जात आहे. या सर्व प्रयत्नांची खरी फलश्रुती ही मतदानाचा टक्का मतदार म्हणून आपण जागरूक राहत १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्यातच आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**राज्य शासन सातत्याने युवा पिढीसाठी जागरूकपणे विविध प्रकारच्या योजना राबवत आहे. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी युवकांना विविध क्षेत्रातील ओळख निर्माण करण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे. नव विज्ञान, माहिती, तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी जागतिक स्तरावरील प्रशिक्षण देण्याचा युवक कल्याण विभागाचा प्रयत्न आहे.**

# युवक कल्याणार्थ योजना

**राजू धोत्रे**

## युवा प्रशिक्षण केंद्र

राज्यातील युवकांना आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, स्पर्धेच्या युगात शक्तिशाली स्पर्धक म्हणून पुढे येण्याच्या उद्देशाने युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील १३ ते ३५ वयोगटातील युवक-युवती या केंद्रातील प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतात. या युवा केंद्राद्वारे राज्यातील सर्व जिल्हा क्रीडा कार्यालये, युवा मंडळे, संस्था यांना माहिती पुरवली जाते. तसेच संबंधित संस्थांकडून कार्यरत युवांची नावे मागवण्यात येतात आणि कार्यक्रम समितीमार्फत युवा प्रशिक्षणातील विविध उपक्रमांकरिता प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाते.

## युवा सप्ताह

१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन देशभर राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. युवकांना प्रेरित करणाऱ्या स्वामी विवेकानंदांचे विचार आजच्या युवक-युवतींना समजावे, त्यांच्या विचारांनी प्रेरित व्हावे, यासाठी राज्य शासनाने १२ ते १८ जानेवारी २०२४ या कालावधीत राष्ट्रीय युवा सप्ताह साजरा करण्यात आला.

## राज्य, जिल्हा युवा पुरस्कार

राज्यातील व जिल्ह्यातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन, पाठबळ मिळावे, यासाठी प्रतिवर्षी राज्य व जिल्हा स्तरावर युवा पुरस्कार दिला जातो. त्यानुसार प्रतिवर्षी जिल्हा व राज्यस्तरावर एक युवक, एक युवती तसेच एका नोंदणीकृत संस्थेस युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

**पुरस्काराचे स्वरूप :** जिल्हा स्तरावर एक युवक व एक युवतीस रोख रु. १०,०००/- प्रति संस्थेस रु. ५०,०००/- गौरवपत्र, सन्मानचिन्ह; तसेच राज्य स्तरावर क्रीडा विभागाच्या क्षेत्रीय विभागानुसार प्रत्येक विभागातील एक युवक व एका युवतीस रोख रु. ५०,०००/- संस्थेस रु. १,००,०००/-; तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## युवा वसतिगृह

राज्याच्या युवा धोरणांतर्गत राज्यातील युवांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होता यावे, त्यांना वसतिगृहाची, निवासाची अडचण कुठेही येऊ नये. हा उद्देश लक्षात घेऊन राज्य शासनाने सहा महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ४ कोटी रुपये अनुदानाच्या मर्यादेत १०० युवक-युवतींसाठी युवा वसतिगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली.

## युवा महोत्सव

युवकांचा सर्वांगीण विकास, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवक-युवतींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे, यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्य स्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षातील क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## युवा महोत्सवाचे आयोजन

राज्याच्या युवा धोरणांतर्गत राज्याची संस्कृती व परंपरा जतन करण्यासाठी; तसेच राष्ट्रीय एकात्मता व युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राज्यातील १३-३५ वयोगटातील युवक व युवतींसाठी जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये लोकनृत्य, लोकगीत, एकांकिका (इंग्रजी व हिंदी) शास्त्रीय गायन (हिंदुस्थानी), शास्त्रीय नृत्य, सतार, बासरी, तबला, वीणा इत्यादी स्पर्धात्मक बाबीं तर अस्पर्धात्मक बाबींमध्ये राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहेत. यातील पात्र युवक/युवतींना राष्ट्रीय युवा महोत्सवातील बाबींसाठी राज्याचा प्रातिनिधिक संघ म्हणून सहभागी करण्यात येते. अस्पर्धात्मक दोन कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर पाठवण्यात येतात.

## प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

राज्यातील युवक कल्याण क्षेत्रात परिणामकारक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने युवकांना जीवनात ध्येय निश्चित करण्यास मदत करण्यासाठी व ते गाठण्यासाठी प्रेरित करण्याकरिता युवकांमधील नेतृत्व गुणांचा व व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. प्रशिक्षण कार्यक्रम प्रतिवर्षी प्रतिशिबिर ३.१५ लाख रुपयांच्या मर्यादेत यशदा येथे शासकीय संस्थेमार्फत ६ शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. १३ ते ३५ वयोगटातील राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील (एक युवा स्त्री व पुरुष) जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त सदर प्रशिक्षणास पात्र असणार आहेत.

## राज्य युवा विकास निधी

राज्यातील उदयोन्मुख युवांना उज्ज्वल भविष्याच्या संधी वृद्धिंगत करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन व आर्थिक साहाय्य देण्याची गरज लक्षात घेऊन राज्य शासनाने राज्य युवा विकास निधीची स्थापना केली आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**सावित्रीबाई फुले यांचा जन्म तीन जानेवारी १८३१ रोजी झाला. सावित्रीबाईंनी १८४८ साली शाळेचे काम सुरू केले होते. तेव्हापासून १८९७ पर्यंत म्हणजे जवळपास ५० वर्षे त्या अखंडपणे कार्यरत राहिल्या. आज स्त्रिया जेव्हा कोणत्याही क्षेत्रात भरारी घेतात, तेव्हा त्या भरारी घेणाऱ्या पंखांमध्ये बळ सावित्रीबाईंनी भरले आहे, याची जाणीव झाल्यावाचून राहत नाही.**

# समाजशिक्षिका सावित्रीबाई

**डॉ. विजय चोरमारे**

महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना पावणे दोनशे वर्षांपूर्वी स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला, तत्कालीन सनातनी समाजाच्या विरोधाचा सामना करून स्त्रियांच्या शिक्षणासाठीचे दरवाजे उघडावे लागले. पावणे दोनशे वर्षांनंतर फुले दाम्पत्याच्या संघर्षाला आलेली गोड फळे दिसत आहेत. त्यामुळे सर्व क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंबहुना अनेक क्षेत्रात त्यांच्या एक पाऊल पुढे टाकून काम करताना दिसत आहेत. स्त्रियांनी काबीज केले नाही, असे एकही क्षेत्र राहिलेले नाही.

## देशातील पहिली शाळा

जोतिराव आणि सावित्रीबाईंनी एक जानेवारी १८४८ रोजी पुण्यामध्ये बुधवार पेठ परिसरातील भिडे वाड्यात मुलींसाठी देशातील पहिली शाळा सुरू केली. ज्या काळात स्त्रियांना शिकण्यास विरोध होता, त्या काळात स्त्रीशिक्षणाचे पाऊल उचलण्यात आले होते. स्त्रीशिक्षणाच्या विरोधात असलेल्या कर्मठ समाजाने जोतिराव आणि सावित्रीबाईंना खूप त्रास दिला होता. शाळेत जाणाऱ्या सावित्रीबाईंच्या अंगावर शेण आणि दगड भिरकावले होते. सावित्रीबाईंनी त्याच दगडांनी मुलींच्या शिक्षणाची वाट निर्माण केली आणि शेणातून त्या वाटेवर फुले अंथरली.

भिडे वाड्याच्या ठिकाणी होणारे राष्ट्रीय स्मारक हे अन्य स्मारकांसारखे केवळ स्मारक किंवा नवे पर्यटन स्थळ असणार नाही. तमाम महाराष्ट्राचे आणि देशवासीयांचे ते प्रेरणास्थान बनेल. जगभरातील पर्यटक जेव्हा भारतात येतील तेव्हा त्यांची पावले भिडे वाड्याच्या स्मारकाकडे वळतील. त्यांच्यापुढे महाराष्ट्रातील आणि भारतातील





स्त्रियांच्या शिक्षणासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाची गाथा उलगडत जाईल. राजकीय हेतूने अनेक सुमारांचे उदात्तीकरण केले जाण्याच्या काळात ज्या फुले दाम्पत्याने महाराष्ट्राला आणि देशाला पुरोगामी विचारांची दिशा दिली त्यांचे कर्तृत्व तिथे उलगडले जाईल. त्या दृष्टिकोनातून या स्मारकाचे महत्त्व अनन्यसाधारण असेल.

## बालहत्या प्रतिबंधक गृह

जोतिरावांच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाई खांद्याला खांदा देऊन उभ्या राहिल्या. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही अनिष्ट रुढी-प्रथांनाही त्यांनी आळा घातला. बाल-जरठ विवाहातील प्रथा त्या काळात होती, त्यामुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनवले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुटुंबातल्याच कुणातरी थोराच्या वासनेची शिकार बनत. कुटुंबातूनच लादलेले मातृत्व आणि गरोदर विधवा म्हणून समाजाकडून होणारा छळ अशा दुहेरी कात्रीत या महिला सापडत. जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्येचा मार्ग पत्करत किंवा भ्रूणहत्या करत. या समस्येवर उपाय म्हणून जोतिराव-सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनीच ते चालवण्यात पुढाकार घेतला आणि ते समर्थपणे चालवले. अभागी विधवांचे त्या बाळंतपण करत. बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

विधवांचे केशवपन करण्याची क्रूर प्रथा रद्द करण्यासाठी जोतिराव-सावित्रीबाईंनी पुढाकार घेतला. त्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करून त्यांचा



संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी सावित्रीबाईंनी प्रयत्न केले. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा सक्रिय सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनीच सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

तान्हुबाई बिर्जे या पहिल्या महिला, संपादक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र १९०६ ते १९१२ पर्यंत म्हणजे तब्बल सहा वर्षे चालवले. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून मांडला. तान्हुबाई बिर्जे यांचा जन्म पुणे येथे १८७६ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण सावित्रीबाईंच्या शाळेत झाले. त्यांचे वडील देवराव कृष्णराव ठोसर हे मूळचे नाशिक जिल्ह्यातील गंगापूरचे. मराठा कुटुंबातील देवराव ठोसर पोलीस खात्यात उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. ते सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. महात्मा फुले यांचे मित्र होते. तान्हुबाई बिर्जे यांच्यावर सावित्रीबाई फुले यांचा अधिक प्रभाव होता. सत्यशोधक समाजाच्या अनेक बैठका त्यांच्या घरी होत. महात्मा फुले मार्गदर्शन करत, तेव्हा तान्हुबाई उपस्थित असत. त्यांचा विवाह सत्यशोधक पद्धतीने सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते वासुदेवराव बिर्जे यांच्यासोबत १८९३ मध्ये पुण्यात झाला. ते 'दीनबंधू'चे संपादक होते. त्यांच्या मृत्यूनंतर तान्हुबाईंनी संपादक म्हणून 'दीनबंधू'ची जबाबदारी स्वीकारली. सावित्रीबाईंच्या या शिष्या मराठी वृत्तपत्र सृष्टीतील पहिल्या महिला संपादक होत.

### सत्यशोधक चळवळीचा आधारस्तंभ

सावित्रीबाई उत्तम समाजसेवक होत्या. सामाजिक क्षेत्रात तळमळीने काम करत. मुंबई, पुण्यात १८९६ आणि १८९७ साली प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. त्याच साथीत ९ फेब्रुवारी १८९७ला कामगारांना मदत करताना नारायण मेघाजी लोखंडे यांचा मृत्यू झाला. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळीचा ते मोठा आधारस्तंभ होते. चळवळीतील जवळचा सहकारी गेल्याने सावित्रीबाईंना मोठा धक्का बसला. मुंबई पाठोपाठ पुण्यात साथ पसरू लागली. लोकांना प्लेगविषयी फारशी माहिती नव्हती, त्यामुळे प्रचंड घबराटीचे वातावरण पसरले. प्लेगवर उपाययोजना काय करायच्या याविषयीही माहिती नव्हती. त्यात समाजामध्ये देवीचा कोप यासारख्या अंधश्रद्धा होत्या. साहजिकच प्लेगच्या आजाराने माणसे मरत होती, तेव्हा ते देवीच्या कोपाने मरत आहेत, अशी अनेकांची भावना झाली.

पुण्यात मृत्यूचे थैमान सुरू झाल्यावर अनेक लोक; तसेच बडे राजकीय नेतेही पुणे सोडून दुसरीकडे राहायला निघून जात होते. उंदरांमार्फत प्लेगचा प्रसार होत होता, उंदीर मरून पडलेले लोकांना दिसायचे. लोक बिथरून जायचे. ताप येऊन काखेत गाठ यायची आणि माणसे मरायची, हे सावित्रीबाई अवतीभोवती पाहत होत्या. अशा परिस्थितीत सावित्रीबाईंसारखी समाजसेविका स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. सावित्रीबाईंनी स्वतः आपल्या मुलाला दक्षिण आफ्रिकेतून तार करून बोलावून घेतले. डॉक्टर यशवंत फुले ब्रिटिश मिलिटरीमध्ये नोकरी करत होते. रजा घेऊन आलेल्या यशवंतकडून परिस्थिती समजून घेऊन सावित्रीबाईंनी कामाला सुरुवात केली. हा संसर्गजन्य रोग जीवघेणा असल्याने आईने धोका पत्करू नये, असे डॉ. यशवंतचे म्हणणे होते; पण त्यावर सावित्रीबाईंना वाटायचे, आज जोतिराव असते तर ते शांत बसले नसते. लोकांच्या दुःखापुढे त्यांना आपल्या जिवाची पर्वा नव्हती. लोकांसाठी काम करण्यावर त्या ठाम होत्या. पुण्यात हडपसरजवळ यशवंत यांच्या सासऱ्यांची शेती होती. हा भाग तेव्हा पुणे शहराच्या वेशीवर होता. इथल्या माळावर काही झोपड्या बांधल्या आणि त्यांनी दवाखाना सुरू केला. विशेषतः मुली आणि महिला घरोघरी जाऊन कोणाला ताप आला असेल किंवा प्लेगची लक्षणे दिसत असतील, तर त्या पेशंट्सना दवाखान्यात घेऊन येत आणि यशवंतच्या मदतीने उपचार करत.

तत्कालीन परिस्थितीत जातींमध्ये भेदाभेद असताना वाडी वस्तीत उपचार पोहोचणे दुरापस्त होते. अशा परिस्थितीत सावित्रीबाईंनी प्लेगच्या साथीमध्ये स्वतंत्रपणे तळागाळातल्या लोकांसाठी काम सुरू केले. सावित्रीबाईंनी पांडुरंग बाबाजी गायकवाड नावाच्या बहुजन समाजातल्या प्लेगच्या रुग्णाला वाचवल्याची नोंद कागदोपत्री आहे. मुंढव्याच्या वस्तीत पांडुरंग प्लेगने आजारी असल्याची माहिती सावित्रीबाईंना मिळाली. ११ वर्षांच्या पांडुरंगाला त्यांनी चादरीत गुंडाळून पाठीवर घेतले. मुंढव्यापासून ८ किलोमीटर चालत त्यांनी ससाणेनगर गाठले. माळावरच्या दवाखान्यात येऊन त्याच्यावर उपचार केले. पांडुरंग वाचला खरा; पण दरम्यानच्या काळात सावित्रीबाईंना प्लेगची लागण झाली होती. काम करताना तापाने सावित्रीबाई फणफणल्या. अखेर १० मार्चला अविरतपणे काम करत असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

**स्वामी विवेकानंद (१२ जानेवारी १८६३ ते ४ जुलै १९०२) हे एक आधुनिक धर्मचिंतक, तत्त्वज्ञ आणि संन्यासी म्हणून तर जगप्रसिद्ध आहेतच; परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला याहून आणखी कितीतरी आयाम आहेत. त्यांचा जन्मदिवस हा 'युवक दिन' म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आजकालच्या युवकांच्या दृष्टीने स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यातील प्रेरकत्वाचा विचार करणे प्रस्तुत ठरेल.**

# स्वामी विवेकानंद : व्यक्तिमत्त्व आणि प्रेरकत्व

**डॉ. रघुनाथ कडाकणे**

स्वामी विवेकानंद (पूर्वाश्रमीचे नरेंद्रनाथ दत्त) यांचा जन्म कलकत्त्यातील एका उच्चभ्रू घराण्यात झाला. त्यांचे वडील कलकत्त्याच्या उच्च न्यायालयात वकिली करत. ते पुरोगामी दृष्टिकोन बाळगणारे आणि बुद्धिप्रामाण्य मानणारे होते. आई मात्र कमालीची श्रद्धाळू आणि धर्मपरायण होती. त्यांचे आजोबा संस्कृत आणि पर्शियन भाषेचे पंडित होते. पण ऐन तारुण्यातच त्यांनी संसारत्याग करून संन्यास स्वीकारला होता.

दुसरी गोष्ट म्हणजे, कलकत्ता ही त्याकाळी ब्रिटिशांच्या अमलाखाली असलेल्या भारताची राजधानी होती. त्यामुळे साहजिकच ब्रिटिश आचारविचारांचा ठळक प्रभाव त्या नगरीच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणावर पडलेला होता. नरेंद्रनाथ दत्त या युवकाच्या व्यक्तिमत्त्वावर अशा सर्व तत्कालीन घटकांचा मिश्रप्रभाव झाल्याचा दिसतो. मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूशन, प्रेसिडेन्सी कॉलेज, ख्रिश्चन कॉलेज इत्यादी ठिकाणी मिळालेल्या शिक्षणाचा भाग त्यात आहेच; परंतु नरेंद्रनाथ दत्त ते स्वामी विवेकानंद हे जे एका व्यक्तीचे अद्‌भूतरम्य असे व्यक्तिमत्त्व संक्रमण आहे त्याचा मागोवा घेत असताना दोन प्रमुख प्रभावशक्ती कार्यरत असल्याचे दिसते. एक म्हणजे स्वतः नरेंद्रनाथांचा जन्मजात पिंड-स्वभाव, त्यांना लाभलेले कौटुंबिक आणि सामाजिक पर्यावरण, त्यांनी केलेले विस्तृत आणि सखोल अध्ययन तसेच भारतीय उपखंडात आणि पश्चिमेकडील अनेक देशांत - खास करून, युरोप-अमेरिकेत- केलेले अखंड भ्रमण, तर दुसऱ्या बाजूला रामकृष्ण परमहंस यांचा त्यांना लाभलेला निकटतम सहवास, त्यांची अखंड ध्यान-धारणा, साधना-उपासना आणि यातून त्यांना घडलेला जीवन-साक्षात्कार. एकंदरीत या दोन प्रमुख गोष्टींच्या एकत्रित परिणामातून स्वामी विवेकानंदांचे व्यक्तिमत्त्व साकार झाल्याचे दिसते.



स्वामी विवेकानंदांच्या धर्मकार्याची चर्चा सातत्याने होतच असते; परंतु येथे आपल्याला चर्चा करायची आहे ती त्यांच्या युवा-व्यक्तिमत्त्वाची. तसे पाहिले तर जेमतेम ३९ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले; पण इतक्या अल्पायुष्यातदेखील त्यांनी काय काय प्राप्त केले? पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी अखंड आणि अगाध असे ज्ञानार्जन केले. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवत गीता अशा आपल्या प्राचीन वाङ्‌मयाबरोबरच आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, साहित्य, कला आदींचाही त्यांनी सखोल व्यासंग केला. डेविड ह्युम, इमॅन्युएल कांट, गोत्तिलेब फित्शे, बारूच स्पिनोझा, जॉर्ज हेगेल, आर्थर शोपेनहायर, ऑगस्ट कॉम्ट, जॉन स्टुअर्ट मिल, चार्ल्स डार्विन आणि हर्बर्ट स्पेन्सर आदी पाश्चात्त्य विचारवंतांच्या साहित्याचा त्यांनी कसून अभ्यास केला. विशेषकरून हर्बर्ट स्पेन्सर यांनी मांडलेल्या 'उत्क्रांतीवादा'चा त्यांच्यावर अधिक प्रभाव पडला आणि त्याच्या 'एज्युकेशन' या ग्रंथाचा त्यांनी बंगाली भाषेत अनुवादही केला.

नरेंद्रनाथांनी बंगाली, इंग्रजी आणि हिंदीसह इतर अनेक भाषा अवगत केल्या. मुळात त्यांची एकाग्रता आणि स्मरणशक्ती अतिशय उच्च कोटीची होती. याची अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनचरित्रात सापडतात. त्याकाळी प्रसिद्ध झालेले 'ब्रिटानिका' या विश्वकोशाचे बारा खंड त्यांनी वाचले होते आणि त्यातली बरीचशी माहिती त्यांनी मुखोद्‌गत केली होती. तसेच थॉमस हार्डी या इंग्रजी लेखकाची 'पिकविक पेपर्स' ही कादंबरी त्यांनी सहज म्हणून एकदोनदा वाचली होती आणि पुढे सहा महिन्यांनी तिच्यातला काही अंश जसाच्या तसा म्हणून दाखवला होता. आजच्या भाषेत सांगायचे तर नरेंद्रनाथांची ज्ञानसाधना

ही आंतरविद्याशाखीय स्वरूपाची होती; पण त्यासोबतच त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताचेदेखील प्रशिक्षण घेतले होते. आणखी विशेष म्हणजे मैदानी खेळांतही त्यांनी तितक्याच उत्साहाने सहभाग घेतला होता. तरुणांनी आधी शरीरसौष्ठव प्राप्त केले पाहिजे आणि त्यासाठी मैदानी खेळ हे आवर्जून खेळले पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते.

एकीकडे नरेंद्रनाथांचा बौद्धिक, शारीरिक आणि कलात्मक विकास होत असतानाच श्री रामकृष्ण परमहंस यांच्याशी त्यांची भेट झाली आणि त्यांच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. त्यांच्या जीवनातले आध्यात्मिक पर्व सुरू झाले. ईश्वरास्तित्व, ध्यान धारणा, आत्मसाक्षात्कार अशा गोष्टींनी त्यांचे आयुष्य आरपार बदलून गेले.

त्यानंतर त्यांच्या आयुष्यातले आणखी एक पर्व सुरू झाले ते परिव्राजनाचे. त्या अवस्थेत त्यांनी कन्याकुमारीपासून ते हिमालयापर्यंत अखंड भारत आपल्या डोळ्यांनी पाहिला आणि मनात साठवला. भारतातील नैसर्गिक, सामाजिक, धार्मिक, भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्या दरम्यान ते सर्व जातीधर्मांच्या लोकांत मिसळले आणि राहिले. भारताची एकंदरीत स्थिती त्यांनी जाणून घेतली. परिव्राजक असतानाच्या काळात त्यांनी वेगवेगळी नावे धारण केली; परंतु अमेरिकेच्या जागतिक धर्मपरिषदेला जाण्याच्या काही दिवस आधी नरेंद्रनाथांनी 'स्वामी विवेकानंद' हे नाव धारण केले. एव्हाना ते एक ज्ञानसंपन्न, अनुभवसंपन्न आणि सर्वांगांनी परिपूर्ण असे व्यक्तिमत्त्व बनलेले होते.

स्वामी विवेकानंदांची सबंध जगाला जी ओळख झाली ती अर्थातच १८९३ साली अमेरिकेतील शिकागो शहरात भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेमुळे. खरंतर ती धर्मपरिषद भरवण्यामागे अमेरिकेचा उद्देश होता तो आपल्या धर्माचे आणि राष्ट्राचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा; परंतु त्या परिषदेत स्वामी विवेकानंदांनी सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभावाचे तत्त्व अगदी ठासून सबंध जगाला सांगितले. 'लेडीज ॲण्ड जंटलमेन' अशा औपचारिक इंग्रजी अभिवादनाचा उपयोग न करता 'सिस्टर्स ॲण्ड ब्रदर्स' ऑफ अमेरिका अशा अनोख्या शब्दांचा उत्स्फूर्तपणे उच्चार करून त्यांनी सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आपल्या अमोघ वाणीने त्यांनी विश्वबंधुत्वाची साद घातली. त्या परिषदेत सहभागी झालेल्या विविध देशांच्या धर्मप्रतिनिधींमध्ये ते सर्वात प्रभावी वक्ते ठरले आणि आपल्या भाषणांच्या माध्यमातून भारताकडे आणि भारतीयांकडे बघण्याची एक नवी दृष्टी त्यांनी पाश्चिमात्य जगाला दिली.

युरोप-अमेरिकेतील आपल्या वास्तव्यकाळात त्यांनी तिकडच्या असंख्य गोष्टी पाहिल्या, अभ्यासल्या आणि आत्मसातही केल्या. जॉन हेन्री राईट, मॅक्समुलर, पॉल ड्यूसन, रोमाँ रोलाँ अशा अनेक महत्त्वाच्या व्यक्तींना ते भेटले.



विवेकानंदांच्या अफाट ज्ञानाने प्रभावित होऊन अमेरिकेतील हार्वर्ड व कोलंबिया या प्रख्यात विद्यापीठांनी त्यांच्यासाठी पौर्वात्य अभ्यासासाठीची स्वतंत्र अध्यासने देऊ केली; पण त्यांनी ती नम्रपणे नाकारली. आंतरबाह्य संन्यस्त वृत्तीने जगत असल्यानेच ते आयुष्यभर निर्मोही आणि निर्विकारपणे जगले. कधी एखाद्या प्रसंगी त्यांनी राजमहालात वास्तव्य केले, तर दुसऱ्या प्रसंगी अन्नपाणी आणि निवाऱ्याशिवाय रस्त्यावरही त्यांनी दिवस काढले.

आता आपल्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न हा आहे की आजकालच्या युवकांनी स्वामी विवेकानंदांकडून काय शिकावे? पाहायला गेले, तर असे कितीतरी गुण स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्त्वात आहेत जे सध्याच्या तरुण-तरुणींनी आवर्जून आत्मसात केले पाहिजेत. दुर्दम्य आत्मविश्वास, उमदा आशावाद, अविचल वृत्ती, आत्मसमर्पण, अखंड ज्ञानसाधना, आत्मशोध आणि सत्यशोधाची अतीव असोशी, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्ञान-तत्त्वज्ञान; तसेच विज्ञान-तंत्रज्ञानाशी योग्य सांगड घालण्याची अजोड क्षमता, प्रखर देशाभिमान आणि विश्वबंधुत्व यांचा सुयोग्य मेळ घालण्याची तळमळ अशा एक ना अनेक गोष्टी निश्चितच आपल्या सर्वांकरिता अनुकरणीय आहेत.


आजकालचे अनेक युवक-युवती कमालीचे निराश झालेले आहेत, आत्मविश्वास गमावून बसले आहेत. बरेचसे व्यसनाधीन झालेले आहेत, बहुतेकजण तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेले आहेत. ऊठसूट आपली 'सेल्फी' टिपण्याचा त्यांना छंद जरूर आहे; पण आपले 'स्वत्व'च ते गमावून बसलेले आहेत. कळत-नकळत ते स्वतःपासून, समाजापासून आणि एकूणच जगापासून तुटत चाललेले आहेत. अशावेळी त्यांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श आपल्या डोळ्यांपुढे ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. कारण हताश झालेल्याला नवी आशा देण्याचे, हतबल झालेल्याला नवे बळ देण्याचे, दिशाहीन झालेल्याला योग्य दिशा देण्याचे, वैचारिक कुपोषण झालेल्याला उमदा जीवनदायी विचार देण्याचे, भावनिक दौर्बल्य आलेल्यांना भाव व संपन्न बनवण्याचे, एकूणच स्वत्व आणि सत्व हरवलेल्याला 'स्व'भान आणि जीवनसत्व पुरवण्याचे असीम सामर्थ्य स्वामी विवेकानंदांच्या अद्‌भुत व्यक्तिमत्त्वात आहे. थोडक्यात ज्याला विवेक आणि आनंद यांचा मेळ आपल्या आयुष्यात घालावयाचा आहे, त्याने स्वामी विवेकानंदांच्या जीवनकार्याचा ध्यास घ्यायलाच हवा.

**(लेखक हे राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे इंग्रजी विभागाचे प्रमुख आहेत.)**

# राजमाता जिजाऊ...

(१२ जानेवारी १५९८ – १७ जून १६७४)

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री व शहाजीराजे भोसले यांच्या ज्येष्ठ पत्नी. महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे; कारण त्या केवळ स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या माता नव्हत्या, तर दीनदुबळ्यांच्या, रयतेच्या मातोश्री होत्या. त्यांचे मूळ घराणे सिंदखेडच्या जाधवराव देशमुखांचे, सुखवस्तू शूर जहागीरदारांचे होते. जिजाऊंची जन्मतारीख व साल यांविषयीची निश्चित माहिती उपलब्ध नाही; तथापि परंपरेचा दाखला देऊन त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी झाला, असे काही इतिहासकार मानतात. वडील लखूजी जाधव हे निजामशाहीतील मातब्बर सरदार होते. त्यांच्या चाकरीत असलेले मालोजी भोसले यांचे चिरंजीव शहाजी यांच्याशी इ. स. १६०९-१०





दरम्यान दौलताबाद किल्ल्यात जिजाऊंचा विवाह झाला, असे शिवभारतकार सांगतो. त्या प्रसंगी मुर्थजा निजामशाह हजर होता. पुढे काही कारणाने भोसले व जाधव या घराण्यांत वैमनस्य आले. जिजाऊ व शहाजीराजे यांचा मुक्काम सुरुवातीस काही वर्षे वेरूळातच होता. पुढे शहाजी आपला मोकासा (जहागिरी) सांभाळून निजामशाहीच्या नोकरीत रुजू झाले. त्या वेळी जिजाऊंची त्यांच्यासोबत भ्रमंती चालू होती.

राजमाता जिजाऊ शहाजीराजांच्या पुण्याच्या जहागिरीत इ. स. १६३६ पूर्वीच राहावयास आल्या. पुण्याच्या मुक्कामात त्यांनी बाल शिवाजींना लष्करी शिक्षणाबरोबर रामायण, महाभारत, भागवत आदींतील कथा सांगितल्या. विशेषत: शांतिपर्वातील राजकीय विचार आणि महाभारत युद्ध यांतील कथा सांगितल्या. जिजाऊंनी विश्वासू सरदारांच्या मदतीने पुणे जहागिरीची उत्तम व्यवस्था लावली. पुण्यात लालमहाल प्रासाद बांधला, ओसाड जमीन लागवडीखाली आणली. त्यांनी कसबापेठेतील गणपतीची पूजाअर्चा नियमित सुरू केली. इतर मंदिरांतूनही दिवाबत्तीची व्यवस्था केली; तसेच खेड-शिवापूर येथे एक वाडा बांधला. तेथे शहाबाग नावाची उत्तम बाग तयार केली. शहाजींच्या राजकारणाचे, धोरणांचे त्यांना ज्ञान होते. पुणे प्रांताच्या राज्यकारभारातील बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालून त्यांनी अनेक वेळा न्यायनिवाडे केले. याविषयींचे अनेकविध उल्लेख तत्कालीन पत्रव्यवहारांतून पाहावयास मिळतात. राजगडावर त्यांचा मुक्काम असताना खंडोबाच्या जेजुरी येथील मार्तंडभैरव मंदिराच्या गुरवपणाविषयी तंटा निर्माण झाला. त्याचा निवाडा जिजाऊंनी केला होता. त्यावर 'मातोश्री साहेब (जिजाऊंनी) जे आश्वासन दिले आहे, तसेच माझेही आश्वासन राहील', असे १३ जुलै १६५३च्या पत्रात छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराज मातोश्रींच्या निर्णयास विरोध करत नसत. जिजाऊ महाराजांच्या राज्य कारभारात अखेरपर्यंत (१६७४) जातीने लक्ष घालीत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. राज्य कारभारात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनुपस्थितीत त्या राज्याची सर्व जबाबदारी सांभाळत असत. महाराज आग्राभेटीवर गेले असता त्यांनी सर्व कारभाराचा शिक्का जिजाऊंच्या हाती सुपूर्द केला होता आणि त्यांना सहकार्य करण्याचे अभिवचन विश्वासू कारभाऱ्यांकडून घेतले होते. जिजाऊ स्वाभिमानी, धाडसी, करारी, दृढनिश्चयी आणि स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकानंतर १२ दिवसांनी त्यांचे पाचाड (रायगड) येथे निधन झाले.

संदर्भ : देशपांडे, सु. र. मराठेशाहीतील मनस्विनी, पुणे, २००५.
https://vishwakosh.marathi.gov.in

# महानायक सुभाषचंद्र बोस

**(२३ जानेवारी १८९७ – १८ ऑगस्ट १९४५)**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते आणि आझाद हिंद सेनेचे सरसेनापती. 'नेताजी' ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. सुभाषबाबूंचे घराणे मूळचे माहिनगरचे (बंगाल). त्यांचे वडील जानकीनाथ वकिलीच्या व्यवसायानिमित्त कटकला (ओरिसा) आले. तेथेच सुभाषचंद्रांचा जन्म झाला. आई प्रभावतीदेवींनी बालवयात त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचे आहेत. रॅवेंशा विद्यालयाचे मुख्याध्यापक बेनी माधवदास यांचाही त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला.

सुभाषचंद्र बोस यांच्यावर स्वामी रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा फार मोठा प्रभाव शाळेत असतानाच पडला होता. दोघांच्या अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी तेव्हा केले होते. मिशन शाळेत गोऱ्या व हिंदी विद्यार्थ्यांमध्ये करण्यात येणारा भेदाभेद आणि विवेकानंदांचे लिखाण यांमुळे राष्ट्रप्रेम निर्माण झाले व पुढे गोऱ्यांच्या उद्दाम वर्तनाचे (उदा., प्रा. ओटन) प्रसंग अधिकाधिक घडले तसतसे ते वाढत गेले. याउलट विवेकानंद-रामकृष्णांच्या ग्रंथांमुळे त्यांना अत्यंत उत्कट अशी धार्मिक ओढ वाटू लागली. वयाच्या १५व्या वर्षापासूनच ते कटक आणि नंतर कलकत्त्याला भेटणाऱ्या साधू, बैरागी, योगी इत्यादींना प्रश्न विचारून त्यांच्याकडून आपल्याला खरा मार्ग सापडेल का, याचा शोध घेऊ लागले. ध्यान, हटयोग यांतही त्यांना गोडी वाटू लागली. विषयासक्तीवर पूर्ण नियंत्रण मिळवून साक्षात्कार प्राप्तीचा मार्ग दाखवणारा कोणी गुरू त्यांना या दोन्ही शहरांत भेटला नाही.

कॉलेजमधील पहिले वर्ष संपल्यानंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत १७व्या वर्षी ते आणि त्यांच्यासारखे त्यांचे चारपाच मित्र गुरूच्या शोधार्थ निघाले. गया, काशी, हरद्वार, हृषिकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी ते सर्वजण हिंडले; परंतु हवा असलेला गुरू तर मिळाला नाहीच, उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ, शिवाशीव इ. पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. विवेकानंदांच्या शिकवणुकीने त्यांची मानवाच्या समानतेवरील श्रद्धा दृढ झाली.

प्रा. ओटन यांच्या व तशाच एका गोऱ्या प्राध्यापकाच्या उर्मट वर्तवणुकीने अपमानित झालेल्या प्रेसिडेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हरताळ पुकारला. त्याचे नेतृत्व स्वीकारणे सुभाषचंद्र बोस यांना भाग पडले. पुढील आयुष्याचे वळण लागण्याची ही नांदी होती; पण या प्रकरणी त्यांना महाविद्यालयातून



काढून टाकण्यात आले. पुढे अशुतोष मुखर्जींच्या मदतीने त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला (१९१७). ते तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.ए. झाले (१९१९). त्याच वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार ते आय.सी.एस.साठी इंग्लंडला गेले. महात्मा गांधींनीच त्यांना कलकत्त्याला चित्तरंजन दासांकडे (१९२१) पाठवले. मृत्यूपर्यंत सु. चार वर्षे सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय गुरू चित्तरंजनच होते. या सुमारास इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या कलकत्त्यामधील आगमनावर बहिष्कार टाकण्याची मोहीम आखण्यात आली. सुभाषबाबूंनी तीत पुढाकार घेतला (१९२१). त्यात त्यांना चित्तरंजन दासांबरोबर सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. कारावासानंतर ते काही दिवस बेंगॉल नॅशनल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि 'स्वराज्य' या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे चित्तरंजन दास कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली.

भारतातील राजकीय परिस्थितीचा सुमारे सहा महिने अभ्यास करून नंतर ते सक्रिय राजकारणात पडले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही जवाहरलाल नेहरूंबरोबर त्यांची नियुक्ती झाली (१९२८). दोघांनी मिळून इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना केली (१९२८). त्याच वर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव काँग्रेस अधिवेशनात मांडला. जवाहरलालांसह सुभाषबाबूंनी त्यास विरोध केला आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडावा असे सुचविले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या वेळी सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली. गांधी-आयर्विन करारानंतर (१९३१) त्यांची मुक्तता झाली व ते कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाले.

जानेवारी १९३२ मध्ये सशस्त्र क्रांतिकारक चळवळीशी संबंध जोडून सरकारने त्यांना पुन्हा स्थानबद्ध केले; पण प्रकृतीच्या कारणास्तव तुरुंगातून मुक्त करताना त्यांना देशातून हद्दपार केल्याचे सांगण्यात आले. उपचारासाठी परदेशी जाणे त्यांना भाग होतेच. १९३३-३६ अशी तीन वर्षे ते व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे राहिले. या काळात त्यांनी यूरोपातील राजकीय परिस्थितीचा सर्वांगीण आढावा घेतला. फॅसिझम व साम्यवाद या दोन विचारसरणींतील उपयुक्त गोष्टी एकत्र करून एक नवीन विचारप्रणाली अनुसरावी, असे त्यांचे मत होते. त्यांनी डी व्हॅलेरा, केमाल आतातुर्क अशा नेत्यांना भेटून त्या दृष्टीने चाचपणीही केली. याच यूरोपच्या दौऱ्यात व्हिएन्ना येथे विठ्ठलभाई पटेलांचे सान्निध्य त्यांना लाभले (एप्रिल-ऑक्टोबर १९३३). विठ्ठलभाईंनी आपल्या मृत्युपत्रामध्ये आपल्या

संपत्तीचे विश्वस्त म्हणून त्यांना नेमले.

हद्दपारीच्या आज्ञेचा भंग करून सुभाषचंद्र बोस भारतात आले (१९३६). त्यांना पुन्हा पकडण्यात आले. १९३५ च्या कायद्यान्वये नव्या कौन्सिलच्या निवडणुका झाल्यानंतरच त्यांची मुक्तता करण्यात आली (१९३७). हरिपुरा येथे होऊ घातलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी राष्ट्रीय नियोजन समिती १९३७ च्या ऑक्टोबरमध्ये नियुक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संघराज्यात्मक घटनेचा प्रखर विरोध करून राष्ट्रीय सामर्थ्यवादावर भर दिला. देशाच्या परिस्थितीत काँग्रेसचे धोरण जहाल असावे व काँग्रेसने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा बदलत्या राजकारणात अनुकूल फायदा करून घ्यावा, या उद्देशाने ते अध्यक्षपदासाठी पुन्हा उभे राहिले. महात्मा गांधींच्या विरोधास न जुमानता त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक त्यांनी लढवली व पट्टाभिसीतारामय्या यांचा पराभव करून ते अध्यक्ष झाले (१९३९). आपल्या अध्यक्षीय भाषणात 'सहा महिन्यांत युद्धाचा भडका उडेल', असे भाकित त्यांनी केले. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. त्यांनी हा आपलाच पराभव आहे असे मानले. बहुसंख्य सभासदांनी गांधींचे नेतृत्व मान्य केल्यामुळे सुभाषबाबूंनी एप्रिलमध्ये अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि मेमध्ये फॉर्वर्ड ब्लॉकची स्थापना करून स्वमताचा प्रचार चालू ठेवला. काँग्रेसने सुभाषबाबूंविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून बंगाल प्रांतिक परिषदेतून त्यांची उचलबांगडी केली व पुढे तीन वर्षे कोणत्याही पक्षीय अधिकारपदासाठी निवडणूक लढवण्यावर त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. १९ आणि २० मार्च १९४० मध्ये फॉर्वर्ड ब्लॉक व किसान सभा यांचे संयुक्त अधिवेशन रामगढ येथे भरविण्यात आले व ६ एप्रिल १९४० पासून राष्ट्रीय आंदोलनाचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर नागपूर (१८ जून १९४० च्या) अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली, परंतु संकल्पित सत्याग्रहाच्या पूर्वीच त्यांना स्थानबद्ध करण्यात आले (२ जुलै १९४०). आपल्याला मुक्त केले नाही, तर अन्नत्याग करू, अशी त्यांनी धमकी दिली. सरकारने त्यांना सोडून त्यांच्या राहत्या घरात नजरकैदेत ठेवले. आपण आध्यात्मसाधना करणार आहोत, असे भासवून त्यांनी एकांतवास पत्करला आणि एक दिवस वेषांतर करून भगतरामसह पेशावरमार्गे काबूल गाठले (२६ जानेवारी १९४१). तेथून ते जर्मनीत गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी हिंदी लोकांना ब्रिटिशांविरुद्ध लढ्यास प्रवृत्त केले आणि बर्लिन आकाशवाणीवरून ते देशबांधवांना सातत्याने आवाहन करीत राहिले. बँकाक येथे जून १९४२ मध्ये भारतीयांची एक परिषद भरली होती. त्यात सुभाषबाबूंना पूर्व आशियात येऊन नेतृत्व करण्याची विनंती केलेली होती. त्याप्रमाणे जर्मनीहून जपानला येताना ते द. आफ्रिका-मादागास्करपर्यंत जर्मन यूबोटीने व पुढे सुमात्रापर्यंत जपानी पाणबुडीने गेले व पेनँग ते टोकिओ हा प्रवास त्यांनी विमानाने केला (१६ मे १९४३). जपान येथे आल्यानंतर त्यांनी स्वातंत्र्यासाठी देशाबाहेर दुसरी आघाडी तेथे उघडली.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना करण्यात आली. सुभाषबाबू स्वतः राष्ट्रप्रमुख, प्रधानमंत्री, संरक्षण मंत्री व सरसेनापती झाले. या शासनाला जपान, जर्मनी, इटली, ब्रह्मदेश आदी अकरा राष्ट्रांनी मान्यता दिली. या सरकारने इंग्लंड-अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारून स्वतःची तिकिटे व नोटाही काढल्या. जपानने अंदमान, निकोबार व जित बेटांचा ताबा या सरकारकडे सोपवला. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेना भारताच्या दिशेने पुढे गेल्या. इंफाळ येथे लढाईला तोंड फुटले, परंतु तेथे आझाद हिंद सेनेला नैसर्गिक आपत्तींमुळे माघार घ्यावी लागली.

जपानने १५ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली. त्या वेळी त्यांनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. मांचुरियाहून त्यांना धाडण्याची व्यवस्था फिल्ड मार्शल ताराऊ याने केली. सायगावहून १७ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांनी प्रयाण केले. मार्गावर १८ ऑगस्ट रोजी तैपे (तैवान) येथील विमानतळावर विमानास अपघात होऊन त्यांचे निधन झाले असे समजण्यात येते. या अपघाताची कारणे अशी होती : विमानात एकूण ९ माणसांऐवजी १३ उतारू घेतले होते. विमानतळ तुलनात्मकदृष्ट्या फार छोटा होता आणि या वेळी वैमानिकाची मनःस्थिती अस्थिर व भांबावलेली होती. शिवाय वैमानिकाने फॉर्मोसा विमानतळाचा कधीच अनुभव घेतला नव्हता.

जपानने शरणागती पतकरल्यामुळे मानसिक धक्का - २,६०० वर्षांत जपानचा हा पहिलाच पराभव होता. सरकार असून नसल्यासारखे - यामुळे निधनाची वार्ता जाहीर केली नाही. निधनाचे वृत्त दीर्घकाळ अज्ञात राहिल्यामुळे लोकांत पुढे शंका निर्माण झाली.

सुभाषबाबूंचे एकूण जीवनच देशभक्त क्रांतिकारकाचे व म्हणून रोमांचकारी आहे. परदेशात जाऊन इतर मित्रराष्ट्रांच्या साह्याने त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले, हे त्यांच्या धडाडीचे, संघटना कौशल्याचे, समयसूचकतेचे व मुत्सद्देगिरीचे निदर्शक आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्वभाव दृढनिश्चयी व प्रसंगी कठोरही होत होता तथापि त्यांचे वागणे मात्र सौजन्यशील व सौहार्दाचे असे. मुळात त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे होता. दूरदृष्टी, जबरदस्त, आत्मविश्वास, धडाडी आणि निर्भयता यामुळे कोणत्याही प्रसंगी ते डगमगले नाहीत. आझाद हिंद सरकारच्या स्थापनेनंतर त्यांनी स्वीकारलेले राष्ट्रगीत हेच स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत बनले. त्यांची भाषणे, पत्रे, स्फुटलेखन इ. स्वातंत्र्योत्तर काळात समग्ररीत्या प्रसिद्ध झाले. न इंडियन पिल्ग्रिम : न् अनफिनिशड ऑटोबायॉग्राफी अँड कलेक्टेड लेटर्स - १८९७-१९२१ हे त्यांचे आत्मवृत्त प्रसिद्ध झाले आहे (१९६५).

**संदर्भ : १. Roy, Dilip, Kumar, Netaji The Man : Reminiscences, Bombay, १९६६ २. Tatsuo Hayashida, Netaji Subhas Chandra Bose : His Great Struggle and Martyrdom, New Delhi, 1970. ३. Toye, Hugh, Subhash Chandra Bose : The Springing Tiger - a study of a Revolution, Bombay, 1962. ४. नगरकर, वसंत, भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, पुणे, १९८१. ५. वाळिंबे, वि. स. गरुड झेप, पुणे, १९६८.**

**– देशपांडे, ना. र. नगरकर, व. वि.**
**https://vishwakosh.marathi.gov.in**

# झाले बहु..होतील बहु..परि या सम हा..!

मराठी माणसावर होत असलेल्या अन्यायावर व्यंगचित्राचा कुंचला आणि लेखणीच्या माध्यमातून 'मार्मिक' फटकारे देत अनेक आव्हानांचा 'सामना' करणाऱ्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती २३ जानेवारीला असते. बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे बहुपेडी होते. त्यामुळेच एक साधा व्यंगचित्रकार, पत्रकार ते जागतिक दर्जाचा झुंजार, परखड असा नेता, हा विस्मयचकित करणारा प्रवास बाळासाहेबांना गाठता आला. प्रखर वक्ता, निर्भिड संपादक, जागतिक दर्जाचे व्यंगचित्रकार अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले बाळासाहेब माणूस म्हणूनही तितकेच महान होते. त्यांच्या माणुसकीचे किस्से जगभरात प्रसिद्ध आहेत ते त्याचमुळे.

महाराष्ट्रात मराठी माणसांची मने आणि मनगटे बाळासाहेबांनी आपल्या विचारांनी चेतवली. मराठी माणसाला न्याय दिला. सन्मानाने जगण्याची एक उर्मी दिली. आजही जगात कुठेही गेलात, तर महाराष्ट्रातून आलोय, हे समजल्यानंतर तिकडून हमखास विचारणा होते ती बाळासाहेबांविषयी! इतके बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे गारूड अफाट आहे. मराठी माणसाला न्याय देणारी शिवसेना ही संघटना देशातील एक प्रमुख राजकीय पक्ष बनवण्याची किमया बाळासाहेबांनी करून दाखवली. प्रखर व परखड हिंदुत्ववादी भूमिकेमुळे एक वेगळी ओळख ते निर्माण करू शकले. या हिंदुत्वाला सहजतेची जोड असल्याने बाळासाहेबांचे हे हिंदुत्व तळागाळात पोहोचले. बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा करिश्मा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात प्रकर्षाने जाणवला. 'सामना'मधल्या धारधार अग्रलेखांचे राजकीय वर्तुळात साहजिकच पडसाद उमटत असतात. 'बालासाब ने किसको ललकारा?', 'सामना में क्या लिखा है?', अशी आदरयुक्त विचारणा मिडिया व राजकीय वर्तुळातील नामांकित लोक नेहमीच करायचे हा एक सुखद अनुभव होता. अनेक जण आयुष्यात कधीच बाळासाहेबांना भेटलेदेखील नव्हते. मात्र बाळासाहेबांच्या कार्यशैलीमुळे त्यांचा ऋणानुबंध जोडला गेला होता. बाळासाहेबांच्या आशीर्वादाने कोणाला रुग्णवाहिकेची मदत, कोणाला शिक्षणासाठी मदत, कोणाला पैशापाण्याची मदत ही झालेली असायची. अशी हिंदी भाषक पट्ट्यातील ज्ञात अज्ञात मंडळी जेव्हा 'बालासाब' म्हणून बाळासाहेबांबद्दल भरभरून आदराने बोलायची, तेव्हा त्यांच्या अफाट व्यक्तिमत्त्वाचा परिचय अधिकच



जवळून अनुभवता यायचा. बाळासाहेब दिल्लीत कधी आले नाहीत. मात्र दिल्लीचे राजकारण एका डरकाळीने हादरवून टाकणारा नेता, अशी त्यांची ओळख अखेरपर्यंत राहिली. मराठी माणसाचे कल्याण, हिंदुत्व यासोबतच जातीनिरपेक्ष नेतृत्वाची पिढी घडवण्याचे श्रेय निःसंशय बाळासाहेबांकडे जाते. बाळासाहेबांनी सार्वजनिक जीवनात कधीच कुणा कार्यकर्त्याला जात विचारली नाही. 'पोटाला जात नसते मग जातीला पोट का चिकटवता?', असा त्यांचा रोकडा सवाल असे. त्यामुळेच केवळ महाराष्ट्रातीलच नाही, तर देशातील राजकारणात जात न विचारता 'सोशल इंजिनीअरिंग'द्वारे उपेक्षित घटकांना सत्तेत आणणारा करिश्माई नेता म्हणून बाळासाहेबांकडे पाहिले जाते. महाराष्ट्रात पहिल्यांदा युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर समाजातील अनेक उपेक्षित जाती जमातींच्या तरुणांना बाळासाहेबांनी संधी दिली. बहुजन समाजातील होतकरू तरुणांना सातत्याने प्रोत्साहन दिले. त्यामुळेच युतीचे मंत्रिमंडळ हे अठरापगड जातींचे मंत्रिमंडळ म्हणून ओळखले गेले.

महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या अस्मिता त्यांनी कायम तेवती ठेवली. छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांचे आराध्यदैवत. बाळासाहेबांच्या प्रेरणेनेच संसद भवनात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य असा पुतळा उभारला गेला. आजही सातासमुद्रापार 'मराठी मानूश' म्हणून जी मराठी माणसाला ओळख आहे त्याचे श्रेय बाळासाहेबांना जाते. राजकारणासोबतच, साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा या सर्वंच क्षेत्रात बाळासाहेबांनी आपले स्नेह जपले. अनेकांना प्रोत्साहन दिले. जगण्याची प्रेरणा दिली. आयुष्यभराचा आधार दिला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिवशीच योगायोगाने बाळासाहेबांचीही जयंती असते. नेताजींनी ब्रिटिशांविरोधात आझाद हिंद सेनेची स्थापना करून स्वातंत्र्यांचे रणशिंग फुंकले होते. नेताजींप्रमाणेच स्वातंत्र्योत्तर हिंदुस्थानात बाळासाहेब ठाकरेंनी ज्वलंत हिंदुत्वाचा अग्निकुंड पेटवला. मरगळलेल्या मराठी माणसांची मने, मनगटे चेतवली. गोरगरिबांच्या सर्वसामान्यांच्या घरापर्यंत सत्ता नेली. झुणका भाकर सारखी योजना राबवून गोरगरिबांच्या पोटाला आधार दिला. माणसातल्या माणूसपणाला जागून बाळासाहेब जगले. म्हणूनच आजही ते सर्वांच्या आदरस्थानी आहेत. आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या ते कायमच आदरस्थानी राहतील. त्यामुळेच म्हणावेसे वाटते. *झाले बहु होतील बहु परि यासम हा..*

**– नीलेश कुलकर्णी,**
ब्युरो चीफ, सामना, नवी दिल्ली.


# ‘सत्याग्रही’ महात्मा गांधी

**(२ ऑक्टोबर १८६९ – ३० जानेवारी १९४८)**

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. गांधींचे आजोबा उत्तमचंद यांना पोरबंदर संस्थानची दिवाणगिरी मिळाली होती. गांधींचे वडील करमचंद हे प्रथम पोरबंदर संस्थानचे व नंतर राजकोट संस्थानचे दिवाण होते. आई पुतळीबाई व वडील हे दोघेही शीलसंपन्न व धर्मनिष्ठ होते.

कस्तुरबा आणि मोहनदास यांचे वय सारखेच होते. या दोघांचा विवाह वयाच्या १३व्या वर्षी झाला. ही विद्यार्थीदशा होती. घरचे वातावरण शीलसंपन्नाचे होते. १८८७ साली ते मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. १८८५ मध्येच करमचंद यांचे निधन झाले. बेचरजी स्वामी यांनी पुतळीबाईंना सांगितले, की मोहनदासाला उच्च वैद्यकीय शिक्षणाकरिता इंग्लंडला पाठवावे; परंतु वैद्याला मृत शरीराला स्पर्श करावा लागतो हे बरे नव्हे, म्हणून बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला पाठवावे असे वडीलबंधूंनी ठरवले. ते १८८८ मध्ये इंग्लंडला गेले. या वेळी हिरालालचा जन्म झाला. रामदास व देवदास नंतर काही वर्षांच्या अंतराने झाले. इंग्लंडमध्ये असताना गांधींनी शाकाहारी मंडळ स्थापन केले. ते १० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षाही ते उत्तीर्ण झालेच होते.

भारतात आल्यावर त्यांनी मुंबई येथे वकिली सुरू केली; पण जम बसेना. पोरबंदराच्या एका मुसलमान व्यापाऱ्याने दक्षिण आफ्रिकेतील कज्जासाठी गांधींची गाठ घेतली व एका वर्षाच्या कराराने, १८९३ च्या एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेत नेले. दरबानचा लक्षाधीश व्यापारी दादा अब्दुल्ला याने प्रिटोरिया येथील व्यापारी तय्यबजी यावर ४०,००० पाऊंडची फिर्याद केली होती. गांधींनी त्या दोघांचे मन वळवून कज्जाचा निकाल सामोपचाराने करवून घेतला. आफ्रिकेत सुमारे २० वर्षे गांधी राहिले. वकिलीचा अनुभव घेतला. दोन्ही पक्षांच्या अंतःकरणात शिरून व समजूत घालून, कज्जाचा निकाल करणे यात गांधी तरबेज झाले. दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील बिनगोऱ्या जमातींवरील विशेषतः हिंदी लोकांवरील, त्याचप्रमाणे तेथील मजुरांवरील होणाऱ्या गोऱ्या सत्ताधाऱ्यांच्या जुलमांविरुद्ध आपल्या सत्याग्रहाचा किंवा निःशस्त्र प्रतिकाराचा दीर्घकालपर्यंत प्रयोग करण्याची संधी त्यांनी साधली. तेथील हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती इ. जमातींची अंतःकरणे काबीज केली. अनेक यूरोपीय मित्रही मिळवले.



गांधींनी स्वतः अनेक वेळा असा अपमान व मारहाण सोसली. हिंदू लोकांच्या काही सवलती काढून घेणारे अपमानकारक बिल तेथील विधिमंडळात १८९४ मध्ये आले. गांधी त्या वेळी आफ्रिका सोडून स्वदेशी परतणार होते, परंतु आयत्या वेळी परत येण्याचा बेत रहित करून तेथेच राहून लढा देण्याचा संकल्प त्यांनी सोडला. नाताळ इंडियन काँग्रेस नावाची संस्था त्याकरिता स्थापन केली. १९१२ साली गोपाळकृष्ण गोखले हे जनरल स्मट्सने काळा कायदा रद्द करावा, म्हणून आफ्रिकेत गेले. तेव्हापासून गांधी व गोखले यांचा स्नेह जमला. गोखले यांस गांधींनी आपले राजकीय गुरू म्हणून अत्यंत पूज्य मानले.

गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून इंग्लंडमार्गे ९ जानेवारी १९१५ रोजी मुंबईस परत आले. नामदार गोखले यांनी भारतात गेल्यावर एक वर्षापर्यंत सार्वजनिक चळवळीत न पडता केवळ तटस्थपणे परिस्थिती समजावून घ्या, असे त्यांना बजावून सांगितले होते. अहमदाबाद येथे साबरमती तीरावर २५ मे १९१५ रोजी सत्याग्रहाश्रम स्थापन केला. गांधींनी १९१७ मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बिहारमधील चंपारण्यास भेट दिली.

१९२० साली नागपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात असहकारितेचे आंदोलन सुरू करण्याचा ठराव मान्य करण्यात आला. खिलाफतीचे पुनरुज्जीवन करण्याची चळवळही याच चळवळीबरोबर उभारली. देशभर सभा, मिरवणुका, प्रभात फेऱ्या निघू लागल्या. कायदेमंडळांवर देशातील शेकडो प्रतिनिधींनी बहिष्कार घातला. हजारो लोकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या. अनेक वकिलांनी व बॅरिस्टरांनी वकिलीची कामे सोडली. परदेशी मालावर व ब्रिटिश कापडावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन देशभर पसरले. राष्ट्रीय शिक्षणाच्या खासगी संस्था स्थापण्यात आल्या. परंतु ब्रिटिश सरकारने दडपशाही सुरू केली. लक्षावधी लोकांना कारावासात टाकले. गांधींनी या अनत्याचारी असहकारितेची शेवटची पायरी म्हणून सामुदायिक कायदेभंग व करबंदी करण्याच्या चळवळीचा संकल्प सोडला. बार्डोली तालुक्यात ही चळवळ सुरू करावयाचे ठरवले. गांधींनी बार्डोली येथेच आपला मुक्काम ठेवला; परंतु उत्तर प्रदेशात चौरीचौरा येथे दंगे होऊन लोकांनी जाळपोळ केली व त्यात पोलिसांची हत्या झाली. त्यामुळे गांधींनी काँग्रेसच्या मुख्य कार्यकारिणीची बार्डोली येथे ११ व १२ फेब्रुवारी १९२२ रोजी बैठक बोलावून बार्डोलीचा सत्याग्रह तहकूब केला. महात्मा गांधींना त्यानंतर १० मार्च रोजी अहमदाबाद येथे पकडण्यात येऊन राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात आली.

भारतातील राजकीय असंतोष केंद्राच्या व प्रांतांच्या विधिमंडळांत शिरलेल्या स्वराज्य पक्षाद्वारे वारंवार प्रकट होऊ

लागला हे पाहून नवे आंदोलन उद्‌भवण्याच्या अगोदरच राजकीय स्वयंनिर्णयाचे हक्क वाढवावे म्हणून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सायमन आयोग नेमण्याचे ठरवले. ३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन आयोग मुंबई बंदरात उतरला. तेव्हापासून त्याविरुद्ध निदर्शने सुरू झाली. देशभर ब्रिटिशविरोधी निदर्शनांचे थैमान सुरू झाले. काँग्रेसने सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता.

१२ मार्च १९३० रोजी सकाळी ६:३० वाजता साबरमती आश्रमातून गांधींनी स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही, अशी प्रतिज्ञा करून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रही वीरांसह यात्रा सुरू केली. ६ एप्रिलला यात्रा संपली. गांधींनी बेकायदेशीर रीतीने मीठ गोळा केले. देशभर मिठाचा कायदा मोडणारे सत्याग्रह आंदोलन उभे राहिले. ४ मे १९३० रोजी पहाटे गांधींना कराडी या गावी अटक झाली. येरवड्याच्या तुरुंगात सरकारने त्यांची रवानगी केली. देशामध्ये लक्षावधी लोक कायदेभंग करून कारावासाची शिक्षा भोगू लागले. २५ जानेवारी १९३१ रोजी शांततामय वातावरण निर्माण करण्याकरिता लॉर्ड आयर्विन यांनी गांधींची बिनशर्त सुटका केली. गांधी आणि आयर्विन यांच्यात वाटाघाटी सुरू होऊन ५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार झाला.

भारताच्या राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काचा प्रश्न चांगल्या रीतीने सोडवण्याकरिता इंग्लंडमध्ये नोव्हेंबर १९३१ मध्ये भारतीय प्रतिनिधींची गोलमेज परिषद भरली. गांधी त्या परिषदेस उपस्थित राहिले. भारतात आल्यावर ३ जानेवारी १९३१ रोजी गांधींना अटक झाली. त्यानंतर वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, राजेंद्रबाबू, सुभाषचंद्र बोस, डॉ. अन्सारी, आझाद, कस्तुरबा, कमला नेहरू इ. राष्ट्रीय नेत्यांना ब्रिटिश सरकारने अटक करून त्यांची कारागृहात रवानगी केली. १८ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आग्रहावरून अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ दिल्याचे जाहीर केले. हे ऐकल्यानंतर गांधींनी २० सप्टेंबर रोजी या प्रश्नावर प्राणांतिक उपोषण सुरू केले. डॉ. आंबेडकरांशी त्यांनी वाटाघाटी केल्या. तारीख २६ रोजी गांधींचा जीव वाचवण्याकरिता डॉ. आंबेडकरांनी तडजोड केली व येरवडा करार झाला. १२ जुलै १९३३ रोजी गांधींनी सामुदायिक सत्याग्रहाचे आंदोलन मागे घेतले, परंतु त्यांनी १९३४ मध्ये वैयक्तिक कायदेभंग सुरू केला. जानेवारी १९३४ मध्ये बिहार येथे भयंकर धरणीकंप झाला. हजारो लोक



मेले, लाखो घरे जमीनदोस्त झाली. गांधींनी भूकंपग्रस्त भागात फिरून लोकांची सेवा केली. गांधींनी शेट जमनालाल बजाज या आपल्या एका थोर अनुयायाच्या सांगण्यावरून वर्धा येथील सेवाग्राम येथे आश्रम स्थापन केला.

प्रांतिक व केंद्रीय निवडणुकींमध्ये १९३७ मध्ये बंगाल व पंजाब सोडून बहुतेक प्रांतांमध्ये काँग्रेस बहुमताने निवडून आली. सात प्रांतांमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळांचे राज्य झाले होते. दुसरे जागतिक महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. युद्ध सहकार्य नाकारून गांधींच्या सल्ल्याप्रमाणे या काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. बॅ. जिनांच्या सल्ल्यानुसार मुस्लीम लीगने काँग्रेस मंत्रिमंडळ बरखास्त झाल्यामुळे देशभर मुक्तिदिन साजरा केला. १९४१ च्या एप्रिलमध्ये गांधींनी पुन्हा वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीची मुंबई येथे बैठक बोलावली. त्या बैठकीत त्यांनी भारत स्वतंत्र झाला आहे, असा निर्णय जाहीर केला आणि छोडो भारत आंदोलन देशभर सुरू केले. गांधींनी लोकांना सांगितले की, 'करा किंवा मरा'. ९ ऑगस्ट रोजी गांधींसह शेकडो नेत्यांची धरपकड झाली आणि त्यांना कारागृहात डांबण्यात आले. गांधींना पुणे येथील आगाखान बंगल्यात स्थानबद्ध केले. त्यांच्याजवळ कस्तुरबा, महादेव देसाई, डॉ. गिल्डर, डॉ. सुशील नायर, सरोजिनी नायडू इत्यादींना ठेवले. महादेव देसाई हे गांधींचे चिटणीस. त्यांना तेथेच मृत्यू आला.

गांधींच्या पत्नी कस्तुरबा या हृदयविकाराने आजारी होत्या. २२ फेब्रुवारी १९४३ रोजी त्यांना मृत्यू आला. ६ मे १९४४ साली गांधीजींची बिनशर्त मुक्तता झाली. २ ऑक्टोबर १९४४ रोजी एक कोटी बारा लाखांचा कस्तुरबा निधी सेवाग्राम येथे गांधींच्या स्वाधीन करण्यात आला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे स्वातंत्र्य जाहीर झाले.

३० जानेवारी १९४८चा दिवस उजाडला. काँग्रेसने सत्तेचा स्वीकार न करता जनतेच्या दारिद्र्याचे प्रश्न सोडवावेत, विधायक कार्यक्रमाला वाहून घ्यावे, म्हणून लोकसेवक संघ योजना गांधींनी तयार केली. ग्रामराज्य हा भारतीय स्वराज्याचा पाया बनावा, असे भारताच्या संविधानाचे तत्त्व तीत समाविष्ट केले. राष्ट्रीय मंत्रिमंडळात पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांच्यात तीव्र मतभेद उद्‌भवले होते. गांधीजींनी सरदारांना पटवले, की ही फूट देशास अहितकारक आहे. संध्याकाळी पाच वाजले. बिर्ला भवनमधून गांधी प्रार्थना स्थानाकडे जावयास निघाले. प्रार्थना स्थानाकडे जातानाच पुण्याचे नथुराम गोडसे हे नारायण आपटे या साथीदारासह त्या प्रार्थनेच्या सभेत शिरले. गांधींच्या जवळ जाऊन प्रणाम करून नथुराम गोडसेने गांधींच्या अंगावर गोळ्या झाडल्या. गांधी 'हे राम' म्हणत धरणीवर पडले आणि गतप्राण झाले. 'राष्ट्रपिता' म्हणून सर्वश्रेष्ठ अद्वितीय बहुमान गांधींना प्राप्त झाला.

https://vishwakosh.marathi.gov.in

**२९ नोव्हेंबर २०२३ रोजी भौगोलिक उपदर्शन पत्रिका (जिओग्राफिकल इंडिकेशन्स जर्नल) मध्ये महाराष्ट्रातील नऊ उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या भौगोलिक मानांकनात लातूर जिल्ह्यातील पानचिंचोलीच्या पटडी चिंचेला, बोरसुरी येथील बोरसुरी तूर डाळीला आणि आशिव येथील कास्ती कोथिंबीरचा समावेश आहे.**

# कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन

**युवराज पाटील**

लातूर म्हटलं की किल्लारी भूकंप, लातूर म्हटलं की रेल्वेने पाणी आणलेलं.. पण अनेक संकटाची मालिका येऊनही त्यावर मात करून नवनवे विक्रम प्रस्थापित करणारा लातूर जिल्हा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण आहे. लातूरचा शैक्षणिक पॅटर्न असो की, लातूरचा आरोग्य पॅटर्न असो... कृषीच्या बाबतीत लातूरची ओळख मात्र तूर, सोयाबीन उत्पादनाचे आगार म्हणून आहे. कृषी क्षेत्रात नवे प्रयोग करणारा जिल्हा म्हणून लातूरची ओळख प्रस्थापित होत आहे.

एखाद्या विशिष्ट वस्तूशी निगडित मानांकन वा चिन्ह ज्याचा संबंध भौगोलिक स्थान किंवा उगमस्थानाशी (उदा. शहर, प्रदेश, देश) असतो त्या मानांकनास 'भौगोलिक मानांकन' असे म्हणतात. भारत जागतिक व्यापार संघटनेचा एक भाग असल्याने १५ सप्टेंबर २००३ पासून मालाचे भौगोलिक मानांकन (नोंदणी आणि संरक्षण) कायदा १९९९ लागू करण्यात आला. भौगोलिक मानांकनामुळे, भौगोलिक मानांकनप्राप्त वस्तूचे नाव अधिकृत वापरकर्त्यांव्यतिरिक्त इतर कोणीही वापरू शकत नाही. २००४-०५ साली दार्जिलिंगच्या चहाला भारतातील पहिले भौगोलिक मानांकन मिळाले होते.

## भौगोलिक चिन्हांकन म्हणजे काय ?

हे मानांकन त्या विशिष्ट परिसरातील मूळ कृषीविषयक, नैसर्गिक किंवा उत्पादित माल ओळखण्यासाठी वापरतात. या मालाचा उगम त्या विशिष्ट प्रदेशातीलच असतो. भौगोलिक चिन्हांकन (जी.आय.) मानांकन हे एखादी वस्तू/पदार्थ/उत्पादन हे खास दर्जाचे किंवा एकमेवाद्वितीय असल्याची पावती आहे.

## जी. आय. नोंदणीचे फायदे कोणते ?

जी.आय. मानांकनप्राप्त उत्पादनांना कायदेशीर संरक्षण मिळते. जी.आय. मानांकनप्राप्त उत्पादनाच्या नोंदणीकृत उत्पादकांशिवाय होणाऱ्या जी.आय. मानांकनाच्या अनधिकृत वापरावर पायबंद घालता येतो. जी.आय. मानांकनप्राप्त उत्पादनांच्या निर्यातीला कायदेशीर संरक्षणाखाली चालना मिळते. उत्पादकांच्या आर्थिक समृद्धीला चालना मिळते. 'जागतिक व्यापार संघटने'च्या इतर सदस्य देशांमध्ये कायदेशीर संरक्षण मिळवण्यास यामुळे मदत होते.



## जी.आय. नोंदणीसाठी कोण अर्ज करू शकतो ?

कायद्याने किंवा कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेली कोणतीही संस्था, संघटना, अधिकारी यंत्रणा किंवा कोणताही उत्पादक यांच्यापैकी कोणीही जी.आय. नोंदणीसाठी अर्ज करू शकते. जी.आय. नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने उत्पादकांच्या हिताचेच प्रतिनिधित्व करणे आवश्यक असते. विहित नमुन्यातच अर्जदाराने अर्ज करणे गरजेचे असते. नोंदणी अधिकारी, भौगोलिक निर्देशन कार्यालय, चेन्नई (Registrar, Geographical Indication Registry Office, Chennai) यांच्याकडे विहित शुल्कासह अर्ज पाठवला जाणे आवश्यक असते.

## जी.आय. मानांकनाचा नोंदणीकृत मालक कोण असतो ?

काही लोकांनी, उत्पादकांनी अधिकृतरीत्या स्थापन केलेली संघटना किंवा कोणतीही अधिकृत यंत्रणा जी.आय. उत्पादनाची नोंदणीकृत मालक असते.'जी. आय. मानांकनाचे नोंदणीकृत मालक' म्हणून त्यांचे नाव जी.आय. मानांकन नोंदवहीत दाखल केलेले असले पाहिजे.

## जी.आय. मानांकनाचा अधिकृत वापरकर्ता कोण असतो ?

नोंदणीकृत जी.आय. मानांकनप्राप्त वस्तूंचा अधिकृत वापरकर्ता म्हणून त्या वस्तूचे उत्पादन केलेला उत्पादक असतो.

## जी.आय. मानांकनासंदर्भात उत्पादक कोण असतो ?

उत्पादक हे तीन प्रकारचे माल हाताळणाऱ्या व्यक्ती असतात. शेतमालाचे उत्पादन करणारे, त्यावर प्रक्रिया करणारे, त्याचा व्यापार किंवा व्यवहार करणारे.

## जी.आय. नोंदणी करणे सक्तीचे आहे का ?

जी.आय. नोंदणी करणे सक्तीचे नाही. मात्र नोंदणी केल्यामुळे कायदेशीर उल्लंघनाच्या वेळी कारवाई करण्यासाठी

अधिक चांगले कायदेशीर संरक्षण प्राप्त होते.

### नोंदणीकृत जी.आय.चा वापर कोण करू शकते?

नोंदणीकृत जी. आय. वापराचे सर्व अधिकार अधिकृत वापरकर्त्यालाच असतात.

### जी.आय. नोंदणी किती काळापर्यंत वैध असते? तिचे नूतनीकरण करता येते का?

जी.आय. नोंदणी ही १० वर्षांसाठी केली जाते. त्यापुढे दर १० वर्षांसाठी आपण सातत्याने नोंदणीचे नूतनीकरणही करू शकतो. जर नोंदणीकृत जी.आय.चे नूतनीकरण झाले नाही, तर नोंदवहीमधून त्याची नोंद काढून टाकली जाते.

### नोंदणीकृत जी.आय.चे उल्लंघन झाले असे कधी म्हटले जाते?

जी.आय.प्राप्त मालाच्या मूळ भौगोलिक परिसरासंदर्भात दिशाभूल केली जाते, त्या वेळी नोंदणीकृत जी.आय.चे उल्लंघन झाले असे म्हटले जाते. एखादे उत्पादन ज्या जी.आय.शी संबंधित असते, त्याऐवजी ते उत्पादन दुसऱ्याच भौगोलिक चिन्हांकनाचे प्रतिनिधित्व करत असल्याची चुकीची माहिती जाते, त्या वेळीही नोंदणीकृत जी.आय.चे उल्लंघन झाले असे म्हटले जाते.

### उल्लंघनासंदर्भातील कारवाई कोण सुरू करू शकते?

जी.आय.चे नोंदणीकृत मालक किंवा अधिकृत वापरकर्ते उल्लंघनासंदर्भातील कारवाई सुरू करू शकतात.

### नोंदणी झालेल्या जी.आय.च्या मालकीचे हस्तांतरण, संक्रमण (प्रेषण) इत्यादी करता येऊ शकते ?

जी.आय. ही सार्वजनिक मालमत्ता असते. ती संबंधित मालाच्या उत्पादकांच्या मालकीची असते. तिची मालकी दुसऱ्यांना देणे, तिचे संक्रमण (प्रेषण) करणे, परवानाकरण (Licensing), गहाण ठेवणे, प्रतिज्ञापत्र करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारे या सार्वजनिक मालमत्तेच्या बाबतीत करार करणे शक्य नसते. मात्र जर अधिकृत वापरकर्त्याचा (जी.आय.ची नोंदणी करताना त्या अर्जावर जिचे नाव आहे, अशा व्यक्तीचा) मृत्यू झाला, तर त्याने नमूद केलेल्या त्याच्या वारसाला त्याचे हक्क प्राप्त होतात.

### एखाद्या उत्पादनाला मिळालेले जी. आय. किंवा त्या जी.आय. उत्पादनाचा अधिकृत वापरकर्ता यांची नोंद नोंदवहीतून काढून टाकता येते का?

एखाद्या उत्पादनाचा जी. आय. किंवा त्या उत्पादनाचा अधिकृत वापरकर्ता म्हणून असलेल्यांची नोंद नोंदवहीमधून काढून टाकण्याचे अधिकार अपिलीय मंडळाला किंवा भौगोलिक निर्देशन कार्यालयाच्या नोंदणी अधिकाऱ्याला (रजिस्ट्रारला) असतात. हा आदेश समजल्यापासून तीन महिन्यांच्या आत यासंदर्भातील याचिका संबंधित व्यक्ती दाखल करू शकते.










### जी.आय. हा ट्रेडमार्कहून (व्यापार चिन्हाहून) कशा प्रकारे भिन्न आहे?

ट्रेडमार्क (व्यापार चिन्ह) हे व्यापारासंदर्भात वापरले जाणारे चिन्ह आहे. हे चिन्हांकन एका उद्योगाचा माल किंवा त्याची सेवा यांना इतर उद्योगांपासून वेगळे बनवते. मात्र जी.आय.चा वापर विशिष्ट भौगोलिक परिसरातील खास गुणधर्म असलेला माल ओळखण्यासाठी केला जातो.

महाराष्ट्रातील नऊ उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहेत. त्यातले तीन लातूरचे असल्यामुळे लातूरकरांना विशेष आनंद झाला आहे. पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

या मानांकनामुळे या तीन उत्पादनांना मोठी राष्ट्रीय ओळख निर्माण होईल आणि उत्पादनाला मोठी चालना मिळेल. राष्ट्रीय बाजारात मागणी वाढेल. त्यासाठी दर्जा राखण्याचे आव्हान असेल. हा दर्जा निश्चित राखला जाईल, अशी अपेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक पी.डी. हनबर यांनी व्यक्त केली आहे.

### उत्पादक संघाचा गौरव

बोरसुरी डाळीसाठी बोरसुरी डाळ उत्पादक संघ ता. निलंगाचे अध्यक्ष धोंडीराम रोडे, पटडी चिंचेसाठी पटडी चिंच उत्पादक संघ पानचिंचोली ता. निलंगाचे अध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, कास्ती कोथिंबीरसाठी कास्ती कोथिंबीर उत्पादक संघ, आशिव ता. औसाचे अध्यक्ष नामदेव माने यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

लातूर जिल्ह्यातील बोरसुरी डाळ, पटडी चिंच, कास्ती कोथिंबीर उत्पादक संघाला जी. आय. मानांकन मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना जिल्हाधिकारी म्हणाल्या, या तीन कृषी उत्पादनांच्या भौगोलिक मानांकनाने जिल्ह्याचा बहुमान झाला असून, यातून अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा आणि बळ मिळाले आहे. जिल्हा प्रशासन, कृषी विभाग, या तीनही उत्पादक संघ यांच्या प्रयत्नातून हे जी.आय. मानांकन मिळाले, त्यासाठी सर्वांचे अभिनंदन करून या तीनही कृषी उत्पादनाचे उत्तम ब्रँडिंग व्हावे, यासाठी प्रशासन स्तरावरूनही आपण प्रयत्न करू, अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.

जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

**आजपर्यंत आपण वनस्पतींचा बगिचा बघितला असेल, फुलांचा बगिचा बघितला असेल, फळांची बाग बघितली असेल; पण पुस्तकांचा बगिचा, कवितेची भिंत असे शब्द ऐकायलाच किती छान वाटतात, ते जर प्रत्यक्षात बघायला व अनुभवायला मिळाले, तर झाडांच्या हवेशीर सान्निध्यात पुस्तक वाचायला कोणाला आवडणार नाही, हाच विचार करून; तसेच वाचन संस्कृतीची आवड निर्माण व्हावी, नागरिकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने 'पुस्तकांचे गाव' या धर्तीवर 'पुस्तकांचा बगिचा' ही राज्यातील पहिली नावीन्यपूर्ण संकल्पना एरंडोल नगरपरिषदेने सुरू केली आहे.**

# पुस्तकांचा बगिचा

**विकास नवाळे**

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल येथील आनंदनगरमधील ३३ गुंठे ही खुली जागा अनेक वर्षे पडून होती. या जागेचा उपयोग चांगल्या लोकोपयोगी कामासाठी व्हावा, या उद्देशाने हा 'पुस्तकांचा बगिचा' साकार झाला आहे. बगिचा म्हटले की, डोळ्यासमोर येतात ती हिरवीगार झाडे, रंगीबेरंगी फुले, व्यायामाचे साहित्य आणि घसरगुंडीवर खेळणारी लहान मुले; पण नगरपालिकेने विकसित केलेल्या या पुस्तकांच्या बगिच्यात मात्र पुस्तकेच पुस्तके पाहायला मिळतील. राज्यातील अनेक प्रसिद्ध कवींच्या कविता वाचायला मिळतील. अनेक विचारवंतांची मार्गदर्शक वाक्य आपल्याला वाचन प्रेरणा देत राहतील. शारीरिक समृद्धीसोबत वैचारिक समृद्धी जतन करणाऱ्या या पुस्तकांच्या बगिच्याचा राज्यातील पहिला प्रयोग सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे.

बगिच्यात आधीपासूनच असलेल्या मोठ्या झाडांच्या खाली ओटे तयार केले असून झाडांवर पुस्तकांचे बॉक्स लावण्यात आले आहेत. त्यांना महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व लेखकांची नावे दिलेली आहेत उदा. इंदिरा संत वाचक ओटा, कुसुमाग्रज कट्टा, व. पु. काळे वाचक दालन इ., या पुस्तकांच्या बॉक्समध्ये ललित साहित्य, चरित्र, आत्मचरित्र, कवितासंग्रह, प्रवास वर्णने, इतिहास, कादंबरी अशा विविध विषयांवरील जवळपास १००० पुस्तके ठेवण्यात आली आहेत. उद्यानात येणारे नागरिक, स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थ, लहान मुले, महिला या बॉक्समधून आपल्या आवडीचे पुस्तक काढून ओट्यावर बसून वाचू शकतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तयार केली गेली आहे. बगिच्यात प्रवेश करताच समोरच कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या कवितेसह पुस्तकाचे भव्य शिल्प मन वेधून घेते. थोडे पुढे गेले की हिरवागार बगिचा दृष्टीस पडतो. एका बाजूला विविध विचारवंतांनी पुस्तकांवर व्यक्त केलेले विविध विचार भित्तीचित्रित केले आहे, तसेच वाचन व पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करणारे भित्तीचित्रे रेखाटून सजावट करण्यात आली आहे. ठिकठिकाणी प्रसिद्ध कवितेची पोट्रेटदेखील लावण्यात आली आहेत. बगिच्याच्या मध्यभागी एक सुंदर बैठकव्यवस्था वाचकांसाठी स्वतंत्र पुस्तकांसह करण्यात आली आहे. याशिवाय लहान मुलांना खेळण्यासाठी विविध खेळण्यांच्या साहित्यासह बालसाहित्य वाचनासाठी ठेवण्यात आले आहे.






## भव्य पुस्तके शिल्प

बगिच्यात प्रवेश करताच समोरच कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या 'खोपा' कवितेसह पुस्तकाचे भव्य शिल्प मन वेधून घेते. या शिल्पावर झाडांच्या सहवासात वाचन करणाऱ्या मुलांचे चित्र रेखाटून बगिच्याची संकल्पना चित्रित करण्यात आलेली आहे.

## बुक बँक

शहरातील काही दानशूर व्यक्ती किंवा सामाजिक संस्था यांना आवाहन करून बुक बँकदेखील तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये लोक त्यांच्याकडे असलेली पुस्तके या ठिकाणी आणून वाचक इतर नागरिकांसाठी वाचण्यासाठी उपलब्ध करून देत आहेत. आतापर्यंत अनेक वाचकांनी सुमारे ३५० पुस्तके बुक बँकेत जमा केली आहेत.



## कवितेची भिंत

राज्यातील प्रसिद्ध ४४ कवींच्या कवितेचे पोट्रेट तयार करून संरक्षक भिंतीवर लावून कवितेची भिंत तयार करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात मोलाचे योगदान असलेल्या कुसुमाग्रजांपासून ते ना. धो. महानोरांपर्यंत, तर आजच्या पिढीतील नितीन देशमुखांपासून ते प्रशांत केंदळेपर्यंत प्रथितयश कवींच्या कविता आपल्याला येथे वाचायला मिळतील.

## वाचक कट्टे

बगिच्यात व्यायामाचे साहित्य तर आहेच; पण शरीराच्या समृद्धीबरोबर तरुणांच्या मनाला व विचारांना समृद्ध करणारी पुस्तके प्रत्येक झाडाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ही पुस्तके वाचण्यासाठी प्रत्येक झाडाखाली प्रसिद्ध साहित्यिकांच्या नावाने १४ वाचक कट्टे तयार करण्यात आले आहेत.

## सेल्फी पॉइंट

प्रत्येक बगिच्यात नागरिकांना आकर्षित करण्यासाठी जसा सेल्फी पॉइंट तयार करण्यात आलेला असतो, तसा या बगिच्यातदेखील अनेक सेल्फी पॉइंट्स तयार करण्यात आलेले आहेत. हे सेल्फी पॉइंट पुस्तके व झाड यांच्या समन्वयाच्या संकल्पनेच्या आधारावरच तयार करण्यात आलेले असून नागरिक याकडे अधिक आकर्षित होत आहेत. पुस्तकांवर आधारित विविध शिल्पे ठेवून बगिच्याची सजावट करण्यात आली आहे.

## नाना-नानी पार्क

ज्येष्ठ नागरिकांसाठी सुंदर हिरवळीवर संध्याकाळच्या वेळेस वाचन करण्याची स्वतंत्र सोय करण्यात आली आहे. याचा लाभ ज्येष्ठ नागरिक घेत आहेत.

एरंडोल शहरातील नगरपरिषदेने विकसित केलेल्या या पुस्तकांच्या बगिच्याचे सर्वत्र स्वागत होत असून विविध वृत्तपत्रातून तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियामार्फत हा प्रयोग राज्यभर पसरला. त्यामुळे वाचन संस्कृतीला हातभार लावणाऱ्या या संकल्पनेला प्रत्यक्षात अनुभवण्यासाठी मिरज-सांगली, तळेगाव दाभाडे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, अमळनेर; तसेच राज्यातील विविध शहरातील वाचकांनी भेट दिली. तसेच विविध शाळांनी आपल्या शैक्षणिक सहली या पुस्तकांच्या बगिचाला भेट देण्यासाठी आणल्या व अशा भेटी देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.




लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना आकर्षित करणाऱ्या या बगिच्यात लहान मुलांसाठी खेळण्यासोबत बालसाहित्य, तरुणांना व्यायामासाठी ग्रीन जिमसोबत स्पर्धा परीक्षेचे साहित्य, महिलांना रंगीबेरंगी फुले, त्यासोबत विविध कथा कादंबऱ्या, पाककृतीचे साहित्य, तर जेष्ठ नागरिकांसाठी ग्रीन लॉन, नाना-नानी पार्कसोबत विविध प्रवास वर्णने, आत्मचरित्र यांची उपलब्धता करून देणारा हा 'पुस्तकांचा बगिचा' राज्यातील वाचन संस्कृती वाढवण्यासाठी निश्चितच आदर्श ठरेल.

(लेखक हे एरंडोल नगरपरिषद, जि. जळगावचे मुख्याधिकारी तथा प्रशासक आहेत.)

**राज्य मंत्रिमंडळाच्या २९ नोव्हेंबर २०२३ आणि हिवाळी अधिवेशन, नागपूर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मदत व पुनर्वसन, शालेय शिक्षण, अल्पसंख्याक विकास, उद्योग, गृहनिर्माण, महसूल, कौशल्य विकास, वस्त्रोद्योग, सहकार व पणन, इतर मागास बहुजन कल्याण, महिला व बालविकास, उच्च व तंत्रशिक्षण, कौशल्य व रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, ग्रामविकास, मृद् व जलसंधारण, जलसंपदा, शालेय शिक्षण व क्रीडा, गृहनिर्माण, गृह, वित्त, वैद्यकीय शिक्षण, पर्यटन व सांस्कृतिक आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**



# कल्याणकारी निर्णय

### शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार

नोव्हेंबरमध्ये दोन दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेती आणि फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसून ३ हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई देण्यात येईल. यासाठी महसूल, कृषी विभागाने तातडीने कालबद्धरितीने एकत्रितरीत्या सर्व जिल्ह्यांचे पंचनामे पूर्ण करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील यासंदर्भात प्रशासनाने युद्ध स्तरावर काम करावे, अशा सूचना दिल्या.

मदत व पुनर्वसन; तसेच कृषी विभागाने राज्यात पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीट याबाबत सादरीकरण केले. पंचनामे प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांनी सर्व क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत व ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव तत्काळ शासनाकडे पाठवण्याची व्यवस्था करावी, असे औपचारिक निर्देश महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाने सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्याची मंत्रिमंडळाने नोंद घेतली. राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याकरिता निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घेऊन निधी वितरित करण्याचे एकत्रित प्रस्तावावर विभागाने तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने यावेळी दिले.

### माझी शाळा, सुंदर शाळा अभियान

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा; तसेच आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान राबवण्यास मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यात ४७८ शाळांचा समावेश करण्यात आला आहे.



### महामंडळासाठी शासन हमी

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी शासन हमी वाढवून ५०० कोटी रुपये इतकी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सध्या ३० कोटी रुपये इतकी शासन हमी देण्यात येते. या शासन हमीचा कालावधी ८ वर्षांचा राहील.

### सुधारित सेवानिवृत्ती वेतन

औद्योगिक व कामगार न्यायालयाच्या न्यायिक अधिकाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित सेवानिवृत्ती वेतन व अन्य बाबी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### सदनिका हस्तांतरण शुल्कात कपात

झोपडपट्टी पुनर्वसनमधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या १ लाख रुपये इतके हस्तांतरण शुल्क आकारले जाते, आता ते ५० हजार रुपये घेतले जाईल.

झोपडपट्टी पुनर्वसन सदनिका या गरीब झोपडीधारकांना विनामूल्य दिलेल्या असतात. त्याचे हस्तांतरण करताना मुद्रांक शुल्कासमवेत १ लाख रुपये हस्तांतरण शुल्क आकारले जाते. यामुळे सदनिका विकत घेणाऱ्याला आर्थिक भुर्दंड होतो. मुंबईत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या परिषदेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात घोषणा केली होती.

### महामंडळाची जमीन औद्योगिक वसाहतीसाठी

अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील मौजे सावळीविहीर बु. व मौजे सावळीविहीर खु. आणि कोपरगाव तालुक्यातील मौजे चांदेकसारे येथील लक्ष्मीवाडी मळ्यातील शेती महामंडळाची २०३.४६ हे. आर जमीन औद्योगिक क्षेत्र

विकसित करण्याकरिता नवीन औद्योगिक वसाहत विकसित करण्याकरिता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३

महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ राबवून महसुली उत्पन्नात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ शासनमान्य मुद्रांक विक्रेत्यांकडून किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत विक्री केलेल्या कोणत्याही रकमेच्या मुद्रांक पेपरसाठी ही सूट मिळेल.

१ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीतील निष्पादित केलेले; परंतु नोंदणीस दाखल केलेले किंवा न केलेल्या दस्ताबाबत महसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर दंडामध्ये या अभय योजनेत सूट देण्यात येईल. ही अभय योजना १ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशा २ टप्प्यांत राबवण्यात येईल.

## अधिनियमात सुधारणा

शेती महामंडळाच्या खंडकरी शेतकऱ्यांना भोगवटा वर्ग १ जमिनीसाठी अधिनियमात सुधारणा करण्याबाबत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१ अअ (३) अन्वये माजी पात्र खंडकऱ्यांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भोगवटादार वर्ग-१ करण्यासाठी, राज्य शासनाला शेती महामंडळाकडील गावाच्या गावठाण हद्दीपासून ५ किलोमीटरच्या परिसरातील जमिनीबाबत शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

तसेच या अधिनियमाच्या कलम २९ च्या पहिल्या परंतुकामध्ये शर्तभंगासाठी जमिनीच्या चालू बाजारदर मूल्याच्या ५०% ऐवजी ७५% रक्कम विनिर्दिष्ट करणे, कलम २७ खाली वाटप केलेल्या सिलिंग जमिनीकरिता वाटपाच्या १० वर्षानंतर शर्तभंग असल्यास नियमानुकूल केल्यानंतर व रूपांतरण अधिमूल्य भरल्यानंतर वर्ग-१ मध्ये रूपांतर करणे; तसेच अधिनियमातील शास्तीबाबतचे कलम-४०(अ) व्यपगत करणे, यासाठी सुधारणा करण्यात येईल.

## मेट्रो-३ साठी माहिमधील जागा

मुंबईतील माहिम विभागातील जागा मुंबई मेट्रो - ३ प्रकल्पास देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार मेट्रोला ३,८६५ चौ. मीटर शासकीय जागा एमएमआरडीएस नाममात्र दराने ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात येणार आहे.



## ‘दक्ष’ प्रकल्प

राज्यात व्यावसायिक शिक्षण, नावीन्यता आणि कौशल्य विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ‘मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास’ (डेव्हलपमेंट ऑफ अप्लाईड नॉलेज ॲण्ड स्किल्स फॉर ह्युमन डेव्हलपमेंट - दक्ष) हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## जमीन विक्री निविदा प्रक्रियेस मान्यता

नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या भूखंड क्र.१, २ व ८ या जमिनीच्या विक्रीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली. या जमिनीच्या विक्रीबाबत अटी व शर्तींचा पूरक करारनामादेखील या बैठकीत मान्य करण्यात आला. वस्त्रोद्योग धोरणाप्रमाणे सोलापूर येथील नरसिंगजी गिरजी मिल आणि नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या जमिनीची विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विक्रीतून मिळालेल्या निधीतून सोलापूर आणि नागपूर गारमेंट पार्क स्थापन करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम वस्त्रोद्योग विकास कोषात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार एम्प्रेस मिलच्या जमिनीच्या विक्रीची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे.

## संत्रा निर्यातदारांना अनुदान

बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्यावरील त्या देशाकडून आकारल्या जाणाऱ्या आयात शुल्काच्या ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला. बांग्लादेशाने भारतातील संत्र्यावरील आयात शुल्कात वाढ केल्याने तेथील निर्यातीमध्ये घट होत आहे. यामुळे महाराष्ट्रातील संत्रा उत्पादकांना जास्तीत जास्त चांगला दर मिळावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला.



## संतसेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळास मंजुरी

नाभिक समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संतसेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ ही उपकंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या उपकंपनीचे कामकाज महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाकडून चालवण्यात येईल. या उपकंपनीमार्फत २० टक्के बीज भांडवल योजना, एक लाखांपर्यंत थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा, १० ते ५० लाख अशी गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना अशा योजना राबवण्यात येतील.

या महामंडळास ५० कोटी रुपयांचे भागभांडवल मंजूर करण्यात आले असून, दरवर्षी ५ कोटी रुपये विविध योजना राबवण्यासाठी देण्यात येतील. या उपकंपनीसाठी १२ पदांनादेखील मान्यता देण्यात आली आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन

राज्यातील ११६ बाजार समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यास मान्यता देण्यात आली. सध्या राज्यातील ३०६ बाजार समित्यांपैकी १९० ठिकाणी शेतकरी भवनांची सुविधा आहे. राज्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये

शेतकरी हे रात्री अपरात्री आपला शेतमाल घेऊन येतात. त्यांच्या मुक्कामाची; तसेच आवश्यक मूलभूत सोयींची व्यवस्था या शेतकरी भवनात करण्यात येईल.

## कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना



महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटनेतील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या संस्थेत अनाथ, निराधार, बाल गुन्हेगार, भटके, भिक्षेकरी, रस्त्यावरील बालके अशा उपेक्षिलेल्या, नाकारलेल्यांना स्वीकारून त्यांची काळजी घेण्याचे काम केले जाते. या संघटनेच्या वेतनासाठी १०० टक्के अनुदान शासनाकडून देण्यात येते.

## सुधारित मनोधैर्य योजना

बलात्कार, लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसाहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सध्याच्या मनोधैर्य योजनेमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्याच्या मनोधैर्य योजनेत ॲसिड हल्ल्यातील पीडितेला अर्थसाहाय्य देण्यात येते. मात्र आता पेट्रोल, डिझेल, रॉकेल, स्वयंपाकाचा गॅस अशा ज्वालाग्रही पदार्थांच्या हल्ल्यातील महिलांनादेखील पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांची; तसेच या संदर्भाने अन्य घटनांमधील पीडितेला ३ लाखांपर्यंतचे अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येईल.

## महाराष्ट्र ड्रोन मिशन राबवणार

राज्यात ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध विभागांची कामे करण्यासाठी 'महाराष्ट्र मिशन' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. याकरिता ५ वर्षांसाठी आयआयटी मुंबई; तसेच विभागीय आणि जिल्हास्तरीय केंद्रांना उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत निधी दिला जाईल. या मिशनसाठी २३८ कोटी ६३ लाख ४३ हजार इतका अंदाजित खर्च येईल.

## रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ

अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी २२ कोटी ५० लाख रुपयांच्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली. हे विद्यापीठ पुढील शैक्षणिक वर्षांपासून रिद्धपूर येथे एमटीडीसीच्या इमारतींमध्ये तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यात येईल. वर्धा येथे हिंदी भाषेचे विद्यापीठ असून, आंध्र प्रदेशात तेलुगू विद्यापीठ आहे. अन्य प्रांतातदेखील भाषेची विद्यापीठे आहेत. त्यानुसार रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाचे स्वरूप एकल असेल. महाविद्यालयांचे संलग्नीकरण असणार नाही. मात्र या विद्यापीठाची मुंबई, पुणे, पंढरपूर, धुळे, नाशिक, अंबाजोगाई, नांदेड, औंध, गडचिरोली, सावंतवाडी अशी दहा प्रादेशिक उपकेंद्रे असतील. या विद्यापीठासाठी एकूण २४२ पदांची निर्मिती करण्यात येईल.

## खासगी कौशल्य विद्यापीठ स्थापनेस मान्यता

नागपूर व पुणे येथे खासगी कायम स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावरील कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली. अंकुश शिक्षण संस्था यांना नागपूर येथे, तर एस.जी. आर. फाऊंडेशन नागपूर या मंडळास पुणे येथे एच. रायसोनी स्किल टेक् युनिव्हर्सिटी या खासगी कौशल्य विद्यापीठाला मान्यता देण्यात आली.



## स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांसाठी कायदा

राज्यात स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अधिनियम तयार करून एकच कायदा आणण्यास मान्यता देण्यात आली. स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांच्या कामकाजाचे विनियमन करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील तेलंगणा, गोवा, उत्तर प्रदेश, गुजरात, तमिळनाडू या राज्यात स्वयं अर्थसाहाय्यित खासगी विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी एकच अधिनियम आहे. तसेच राज्यातील पारंपरिक विद्यापीठाच्या कामकाजासाठीदेखील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अस्तित्वात आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र खासगी विद्यापीठ अधिनियम तयार करण्यात येईल.

त्यामुळे आतापर्यंत राज्यात स्थापन झालेल्या २८ स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांचे अधिनियम रद्द होतील आणि त्यांना या नव्या अधिनियमांमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

## राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियमास मान्यता

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासनमान्य विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थांचे संनियंत्रण योग्य रितीने करता यावे, यासाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण अधिनियमास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## यात्रास्थळे, तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी योजना

ग्रामीण भागातील यात्रास्थळे आणि तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने राबवण्यास मान्यता देण्यात आली. सध्या ग्रामीण भागातील यात्रा स्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम ही योजना यापुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यात्रास्थळ योजना या नावाने राबवण्यात येऊन सध्याची २ कोटी रुपयांची मर्यादा ५ कोटी रुपये करण्यात येईल. तसेच ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाठी विशेष कार्यक्रम ही योजना यापुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना या नावाने

राबवण्यात येऊन, सध्याची ५ कोटींची मर्यादा २५ कोटी रुपये इतकी करण्यात येईल.

## पुणे मेट्रो टप्पा-१ च्या सुधारित खर्चास मान्यता



पुणे मेट्रो टप्पा-१ साठी सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाचा मूळ खर्च ११,४२० कोटी रुपये होतो. यात वाढ होऊन तो १३,६५६ कोटी इतका सुधारित खर्च झाला आहे. भूसंपादनाकरिता २६१ कोटी ७० लाख, हडपसर व विमाननगर येथील अतिरिक्त पुनर्वसनासाठी २२८ कोटी ८१ लाख; तसेच केंद्र व राज्य करांकरिता १११ कोटी सहा लाख अशी एकूण ६०१ कोटी ५९ लाख रक्कम राज्य शासनाकडून महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशनला बिनव्याजी दुय्यम कर्ज म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाच्या ३३.२८ किलोमीटर लांबी पैकी २३.६६ किमी लांबीची मेट्रो वाहतूक सुरू झाली आहे. तसेच ९.६२ किमीच्या मार्गिकेचे काम सुरू आहे.

## वासुदेव सहकारी सूतगिरणीस अर्थसाहाय्य

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सूर्जी तालुक्यातील वासुदेस सहकारी सूतगिरणीस शासकीय अर्थसाहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली. या संदर्भात वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत निर्णय झाला होता. यात सूतगिरणीस सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांचे कर्ज यांच्या विहित गुणोत्तरानुसार राज्य शासनाचे अर्थसाहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## न्याहळोद योजनेस मान्यता

धुळे जिल्ह्यातील न्याहळोद (पांझरा नदी) गेटेड सिमेंट काँक्रिट बंधाऱ्याच्या कामास मान्यता देण्यात आली. या बंधाऱ्यामुळे २१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, ९८.९१ स.घ.मी. इतकी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. या कामासाठी १६ कोटी ७ लाख ६० हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

## पाडळसे निम्न तापी प्रकल्पास सुधारित मान्यता

जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. तापी नदीवरील या प्रकल्पाचे काम १९९९ पासून सुरू असून, सध्या १२.९७ द.ल.घ.मी. मृत जलसाठा निर्माण झाला आहे. या प्रकल्पामुळे अमळनेर, चोपडा, पारोळा, धरणगाव, धुळे व सिंदखेडा तालुक्यांना लाभ होणार आहे. तसेच ४३ हजार ६०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पासाठी ४ हजार ८९० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

## अभिमत क्रीडा विद्यापीठासाठी शासन हमी

अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन या संस्थेस अभिमत क्रीडा विद्यापीठाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यात येणार असून, त्याकरिता आवश्यक ते वेतन अनुदान देण्याकरिता शासन हमीस मान्यता देण्यात आली.



या संस्थेची स्वतःच्या मालकीची १२५ एकर जमीन असून, अद्ययावत सुविधांनी सुसज्ज असे क्रीडा संकुल आहे. तसेच उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणून पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

## झोपडपट्टी पुनर्वसनातील सदनिका पाच वर्षांनंतर विक्री करता येणार

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लाभार्थींना पाच वर्षांच्या कालावधीनंतर त्यांची सदनिका किंवा गाळा विकण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या ही कालमर्यादा १० वर्षांची आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमात सुधारणा करण्यात येईल. मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशी नुसार पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या पुनर्वसित सदनिका किंवा गाळ्याचा ताबा मिळाल्यापासून सात वर्षांच्या कालावधीनंतर ती विकण्याची परवानगी दिली होती. मात्र या संदर्भातील विधेयकावर यंदाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चा होऊ शकली नाही. दरम्यान सात वर्षांची प्रस्तावित तरतूद कमी करून ५ वर्षे करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत असल्याने याबाबतचा निर्णय घेण्यात आला.



## पोलीस दळणवळण, मोटार परिवहन विभागासाठी आस्थापना मंडळे

पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग आणि मोटार परिवहन विभागासाठी आस्थापना मंडळे गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या गुन्हे अन्वेषण, राज्य गुप्तवार्ता, नागरी हक्क संरक्षण, लाचलुचपत प्रतिबंधक, राज्य राखीव पोलीस दल, दहशतवादविरोधी पथक, महामार्ग वाहतूक, प्रशिक्षण संचालनालय या विभागांना आस्थापने मंडळे आहेत. मात्र मोटार परिवहन विभाग व पोलीस दळणवळण; तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग यांना आस्थापने मंडळे नसल्याने पोलीस अधिनियमात सुधारणा करून त्यांचा समावेश करण्याचा निर्णय झाला.

## वसईतील युनिव्हर्सल स्किल टेक विद्यापीठास मान्यता

वसई येथील विद्या विकास एज्युकेशन

ट्रस्टच्या युनिव्हर्सल स्किल टेक युनीव्हर्सिटीस खासगी कायम स्वयं अर्थसाहाय्यित कौशल्य विद्यापीठ म्हणून स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. हे विद्यापीठ २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होईल.

## अतिवृद्ध निवृत्तिवेतनधारकांच्या वेतनात भरीव वाढ

शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अतिवृद्धांच्या निवृत्तिवेतनामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. निवृत्तिवेतनाचे दर केंद्र शासनाप्रमाणे सुधारित करण्याबाबत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने विनंती केली होती.

## 'मिशन लक्ष्यवेध'

ऑलिम्पिक पदकांचे ध्येय गाठण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याकरिता 'मिशन लक्ष्यवेध' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी १६० कोटी ४६ लाख ३५ हजार रुपये इतका खर्च येणार असून, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत क्रीडा विभागास दिल्या जाणाऱ्या एकूण तरतुदीच्या १० टक्के रक्कम या योजनेवर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. या मध्ये १२ प्रकारच्या खेळांकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या २४० खेळाडूंसाठी राज्यातील ६ ठिकाणी राज्यस्तरीय हाय परफॉर्मन्स सेंटर, राष्ट्रीय दर्जाच्या ७४० खेळाडूंसाठी ३७ विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर आणि राज्य दर्जाच्या २,७६० खेळाडूंसाठी जिल्हास्तरावर १३८ जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत.

## टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी सुधारित मान्यता

सातारा जिल्ह्यामधील कराड तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ७,३७० कोटीच्या खर्चास तिसरी सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. कृष्णा नदीवर टेंभू गावाजवळ बॅरेज बांधून २२ अ.घ.फू. पाणी उचलून सातारा, सोलापूर व सांगली जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील एकूण ८०,४७२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देण्यात येणार होता.

## चासकमान सिंचन प्रकल्पास सुधारित मान्यता

पुणे जिल्ह्यामधील खेड तालुक्यातील चासकमान सिंचन प्रकल्पास तिसरी सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पाकरिता १,९५६ कोटी ९५ लाख इतक्या खर्चाची मान्यता देण्यात आली.

## करारावरील वैद्यकीय प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

राज्यातील शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालये व रुग्णालयातील करार पद्धतीने नियुक्त प्राध्यापक; तसेच सहयोगी प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासकीय वैद्यकीय; तसेच दंत महाविद्यालय व रुग्णालयातील करार पद्धतीने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांना दरमहा १ लाख २० हजार रुपये; तसेच सहयोगी प्राध्यापकांना दरमहा १ लाख १० हजार रुपये मानधन देण्यात येईल. सध्या रिक्त पदांवर कंत्राटी प्राध्यापकांना ५० हजार रुपये व सहयोगी प्राध्यापकांना ४० हजार रुपये मानधन दिले जाते. सेवानिवृत्त अध्यापकांची करार पद्धतीने नियुक्ती झाल्यास त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या १७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णय मधील तरतुदीनुसारच मानधन देण्यात येईल.

## युवकांना पर्यटन, आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षण

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील युवक, युवतींना पर्यटन क्षेत्रात प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली.

यासाठी सोलापूर येथील स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी येथे नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजीच्या मान्यतेने अभ्यासक्रम राबवण्यात येतील. याकरिता या महाविद्यालयात पदनिर्मिती करण्यासदेखील मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील तारकर्ली येथे साहसी जलपर्यटन व आपत्कालीन बचाव प्रशिक्षण देण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कूबा डायव्हिंग ऑफ ॲक्वेटिक स्पोर्ट्स या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. मुंबईतील दादर येथील भारतीय पर्यटन एवंम् यात्रा प्रबंधन संस्थान, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट; तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, कौशल्य विकास विभागांतर्गत असलेल्या विविध संस्थांच्या माध्यमातून युवक, युवतींसाठी पर्यटन व आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षण दिले जाईल. याकरिता २६ कोटी ५५ लाख रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली.

## मिनी अंगणवाड्यांचे श्रेणीवर्धन

एकात्मिक बालविकास सेवेतील सर्व १३ हजार ११ मिनी अंगणवाडी केंद्रामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली.




या अंगणवाडी केंद्रांकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे १३ हजार ११ मदतनीसांची पदेदेखील भरण्यात येतील. प्रत्येकी २५ अंगणवाडी केंद्रांसाठी मुख्य सेविका आणि पर्यवेक्षिका अशी एकूण ५२० पदे निर्माण करण्यात येतील.


## पायाभूत सुविधांच्या कामांसाठी कर्ज

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधांच्या कामांना वेग देण्यासाठी राष्ट्रीय आवास बँकेकडून कर्ज घेण्याच्या नागरी पायाभूत विकास निधी योजनेस मान्यता देण्यात आली.

**– टीम लोकराज्य**

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र

महाराष्ट्र



# राष्ट्रीय मतदार दिन

दि. २५ जानेवारी, २०२४

मताधिकार आम्ही

NVD 2024

## अंतिम मतदार यादी प्रकाशित झाली आहे.

**आजच आपलं नाव यादीत तपासून घ्या.**
**नाव नसेल तर त्वरीत नोंदणी करा**

## राष्ट्रीय मतदार दिनाच्या शुभेच्छा!

ऑनलाइन सेवेसाठी

electoralsearch.eci.gov.in
voters.eci.gov.in
ceo.maharashtra.gov.in
या संकेतस्थळांना भेट द्या किंवा
Voter Helpline हे
मोबाइल ॲप डाऊनलोड करा.




GET IT ON Google Play

Voter

वोटर हेल्पलाइन ॲप

Download on the App Store

**ऑफलाइन सेवेसाठी आपल्या जवळच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या**


**मतदार मदत क्रमांक : १८०० २२ १९५०**

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ







### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट
हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह